CMYK

## विचारपुष्प



आपण स्वत: नित्य आत्मचिंतन करण्याची गरज आहे. रात्री झोपण्यापूर्वी दिवसभराच्या दिनचर्येचा आढावा घेऊन त्यात राहिलेल्या उणिवा दुसऱ्या दिवशी दूर करण्याचा संकल्प केला पाहिजे. दुसऱ्या दिवशी उठल्यानंतर आपण आपल्या कर्तव्यांचे स्मरण करून आपल्या दिनचर्येला जर सुरुवात केली तर इच्छेनुसार जीवनात परिवर्तन घडून येईल.

**हो. वे. शेषाद्री**, रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह


# सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, २६ जुलै २०२५। युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २५७ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


# राज्यात शिक्षकेतर कर्मचारी, प्राध्यापक भरती लवकरच

### प्राध्यापकांचे निवृत्तीचे वय ६५ करणार ● उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील यांची घोषणा

### अमरावतीत प्राचार्यांचे राज्यस्तरीय अधिवेशन

**अमरावती, २५ जुलै**

रखडलेली ५,५०० प्राध्यापक व २,९०० शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीचा मार्ग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिल्याने मोकळा झाला असून, लवकरच ती प्रक्रिया पूर्ण होईल. विद्यापीठातील प्राध्यापकांची रिक्त ७०० पदे भरली जातील. प्राध्यापकांचे निवृत्तीचे वय ६२ वरून ६५ करण्यात येईल आणि असोसिएट प्रोफेसर व प्रोफेसर हा वाद लवकरच संपुष्टात आणला जाईल, अशा महत्त्वपूर्ण घोषणा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी अमरावतीत केल्या.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित अखिल महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल्स असोशिएशन ऑफ नॉन गव्हर्नमेंट कॉलेजेसच्या ४० व्या वार्षिक राज्यस्तरीय अधिवेशनाचे उद्घाटन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख होते. राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद तसेच राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंचचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे, अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, लक्ष्मीनारायण इनोव्हेशन टेक्नॉलॉजी विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरू डॉ. अतुल वैद्य, आ. किरण सरनाईक, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. केशव तुपे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० सुकाणू समितीचे सदस्य अनिल राव, अखिल महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल्स असोशिएशनचे अध्यक्ष डॉ. आबासाहेब देशमुख, अखिल महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल्स असोशिएशनचे उपाध्यक्ष प्राचार्य नंदकुमार निकम आणि सचिव डॉ. सुधाकर जाधवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

डॉ. सहस्रबुद्धे म्हणाले, डॉ. पंजाबराव देशमुख यांची शिक्षण, शेती आणि आरोग्याबाबत जी कल्पना होती तिचाच जवळपास नवीन शैक्षणिक धोरणात समावेश असून, त्यासाठी त्यांचे जेवढे कौतुक करावे तेवढे कमीच आहे.

अधिवेशानानिमित्त काढण्यात आलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन, डॉ. मोनिका उमक यांच्या पुस्तकाचे प्रकाशन आणि अमरावती इंडस्ट्रीयल असोशिएशनचे अध्यक्ष किरण पातुरकर यांनी तयार केलेल्या 'इंडस्ट्री हायर एज्युकेशन लिंकेज प्रोग्राम'या पोर्टलचे उद्घाटन या कार्यक्रमात करण्यात आले. (तभा वृत्तसेवा)



स्मरणिकेचे प्रकाशन करताना चंद्रकांत पाटील, डॉ. सहस्रबुद्धे, हर्षवर्धन देशमुख, अनिल राव, डॉ. बारहाते व अन्य

### नव्या शैक्षणिक धोरणात प्रत्यक्ष प्रात्यक्षिकावर भर

नव्या शैक्षणिक धोरणात संशोधनाला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. मातृभाषेतून, व्यवसायाभिमुख शिक्षण आणि भारतीय ज्ञान परंपरेची माहिती हे या धोरणाचे वैशिष्ट आहे. या धोरणात प्राचार्य आणि प्राध्यापकांची भूमिका महत्त्वाची असून, त्यासाठी या धोरणाचा गाभा समजून घेणे व माणूस समजून घेणे महत्त्वाचे आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात पुस्तकी ज्ञानासोबतच प्रत्यक्ष प्रात्यक्षिकावर अधिक भर दिला आहे. या देशातले शिक्षण हे जगाचे शिक्षण ज्या दिशेने जात आहे, त्या दिशेने नेण्याचा प्रयत्न आहे. बेरोजगारांच्या फौजा निर्माण करणारे शिक्षण बदलायचे आहे, या शब्दांत त्यांनी नव्या शैक्षणिक धोरणाचे समर्थन केले. आपल्या भागातील उद्योग व व्यवसायाला आवश्यक असलेले मनुष्यबळ तयार करण्यासाठी तशा प्रकारचे अभ्यासक्रम तयार करावे, असे आवाहन करून हसतखेळत त्यांनी प्राध्यापकांच्या कानपिचक्या घेतल्या.

## निवृत्तीनंतर शासकीय पद स्वीकारणार नाही

**अमरावती, २५ जुलै**

**सरन्यायाधीश भूषण गवईंची स्पष्टोक्ती**

सरन्यायाधीक्ष पदावरून निवृत्त झाल्यानंतर कुठलेही शासकीय पद स्वीकारणार नाही, असे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी स्पष्ट केले. दर्यापूर तालुक्यातील दारापूर या त्यांच्या मूळगावी शुक्रवारी ते बोलत होते. न्या. गवई म्हणाले की, ऑक्सफर्ड विद्यापीठासह विदेशात अनेक ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार मांडण्याची संधी मला मिळाली. दारापूरचा पूत्र म्हणून आपल्याला त्याचा अभिमान आहे. माझ्या पुढच्या वाटचालीसाठी आपल्या सर्वांच्या शुभेच्छा आणि प्रेम पाठीशी आहेच. मी ऋणातून मुक्त होऊ इच्छित नाही. जास्तीत जास्त वेळ मी दारापूर आणि अमरावती, नागपूरमध्ये घालवणार आहे. सरन्यायाधीश झाल्यानंतर प्रथमच ते दारापूर येथेआले होते. गावकऱ्यांसाठी हा भावुक क्षण होता. अनेकांनी दादासाहेब गवई यांच्या आठवणींना उजाळा दिला.

# मंत्रिमंडळात फेरबदल; अजित पवारांकडून दुजोरा

### ● कोकाटे, सूरज चव्हाण बद्दलही दादांनी स्पष्टच सांगितले

**मुंबई, दि.२५ जुलै**

राज्य मंत्रिमंडळात लवकरच फेरबदल होणार असून काही मंत्र्यांना घरचा रस्ता दाखवला जाणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. याबाबत पत्रकारांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना प्रश्न विचारले असता या संदर्भातील सर्व अधिकार हे मुख्यमंत्री यांचे असतात. त्यामुळे मंत्रिमंडळात कोणाला ठेवायचे आणि कोणाला काढायचे? त्याचा सर्वस्वी निर्णय मुख्यमंत्री घेत असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. माणिकराव कोकाटे यांच्या संदर्भात आपण सोमवारी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार असून या संदर्भात मंगळवारपर्यंत निर्णय होईल, असे देखील त्यांनी स्पष्ट केले.

अखिल भारतीय छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय घाडगे यांना मारहाण करणाऱ्या सूरज चव्हाण यांच्या संदर्भात अजित पवार यांनी सांगितले की, त्यांना सध्या पदावरून काढण्यात आले आहे. त्यांनीही अजून माझी भेट घेतलेली नाही. त्यांना भेटून त्यांची देखील बाजू ऐकणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. त्याच बरोबर विधिमंडळात रम्मी खेळण्याचा आरोप झालेले कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावरही योग्य ती कारवाई करणार असल्याचे संकेत पवार यांनी दिले आहेत. या संदर्भात सोमवारी कोकाटे आणि मुख्यमंत्र्यांसोबत आपण चर्चा करणार असल्याचे ते म्हणाले. कोकाटे यांचा राजीनामा, आ. मांडेकर यांच्या भावाकडून झालेला गोळीबार आणि सूरज चव्हाण प्रकरणावर देखील अजित पवार यांनी स्पष्ट सांगितले.



### विजय गाडगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी भेट

या संदर्भात अजित पवार यांनी सांगितले की, छावा संघटनेचे विजय गाडगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी माझी भेट घेतली. त्यांनी लातूरमध्ये घडलेल्या घटनेची सर्व तपशीलवार माहिती माझ्यासमोर म ंडली. त्यांच्या तक्रारी अत्यंत गांभीर्याने ऐकून घेत, मी तात्काळ लातूरच्या पोलिस अधीक्षकांना सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. तसेच, छावा संघटनेच्या इतर मागण्या बाबतही सकारात्मक आणि त्वरित निर्णय घेतला जाईल असा विश्वास मी त्यांना दिला आहे.

# शाळेचे छत कोसळून दहा विद्यार्थ्यांचा मृत्यू

### राजस्थानच्या झालावाड जिल्ह्यातील घटना

**जयपूर, २५ जुलै**

राजस्थानच्या झालावाड जिल्ह्यातील पिपलोदी गावात शुक्रवारी सकाळी शाळेचे छत कोसळले. प्रार्थना सुरू असतानाच प्राथमिक शाळेच्या इमारतीचे छत अचानक कोसळले. यात दहा मुलांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर शिक्षणमंत्री मदन दिलावर यांनी घटनेच्या उच्चस्तरीय चौकशीचा आदेश दिला आहे. ढिगाऱ्याखाली अडकलेले सर्व विद्यार्थी इयत्ता सातवीचे आहेत.

घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी, तसेच बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी ढिगाऱ्याखाली अडकलेल्या मुलांना बाहेर काढण्याचे काम सुरू केले. स्थानिक नागरिकही मदतीसाठी पुढे सरसावले. सर्वांनी एकत्र येऊन ढिगारा हटवला आणि मुलांना बाहेर काढले. ही दुर्घटना झालावाड जिल्ह्यातील मनोहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.





# मुख्यमंत्र्यांचे विकास प्रकल्पांना प्राधान्य

### ▸ दिल्लीत अनेक नेत्यांच्या घेतल्या भेटी ▸ बांबू क्लस्टर; खते आदी प्रकल्पांना गती

**नवी दिल्ली, २५ जुलै**

राज्यातील विविध विकास प्रकल्पांच्या पाठपुराव्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेले दोन दिवस दिल्लीत अनेक नेत्यांच्या भेटी घेतल्या. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय आरोग्यमंत्री आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथसिंग, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान, केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर तसेच नीती आयोगाशी या बैठका झाल्या.

१००० लोकसंख्या असलेल्या गावांना काँक्रिट रस्त्यांनी जोडण्यासाठीच्या प्रकल्पासाठी आशियाई डेव्हलपमेंट बँकेकडून १ अब्ज डॉलर्स (सुमारे ८६५१ कोटी रुपये) इतके आर्थिक सहाय्य मागण्यात आले आहे. दुसरा प्रकल्प महाराष्ट्रातील समुद्रकिनाऱ्याची पातळी वाढत असल्याने त्याचे नैसर्गिक उपायांनी निराकरण करणे हा आहे. यासाठी ५०० मिलियन डॉलर्स (सुमारे ४३२६ कोटी रुपये) इतकी मदत मागण्यात आली आहे. तिसरा प्रकल्प महापालिका शहरांमधून सांडपाण्याचा प्रक्रिया करुन उद्योगांसाठी पुनर्वापर हा आहे.

यासाठी सुमारे ४३२६ कोटी रुपये अर्थसहाय्य मागण्यात आले आहे. उर्वरित दोन प्रकल्पांसाठी जागतिक बँकेकडून मदत मागण्यात आली आहे. या तिन्ही प्रकल्पांसाठी वित्तमंत्रालयाने मंजुरी द्यावी, यासाठीचे निर्देश सीतारामन यांनी या बैठकीत दिले.

## ग्रामीण रस्त्यांसाठी केंद्राकडे प्रस्ताव

**नवी दिल्ली** : महाराष्ट्रात १४,000 कि.मी.चे रस्ते तयार करण्यासाठीचा एक प्रस्ताव महाराष्ट्राने केंद्रीय ग्रामविकास मंत्रालयाकडे दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात शिवराजसिंग यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. हा एकूण प्रस्ताव २.६ बिलियन डॉलर्सचा (सुमारे २२,४९० कोटी रुपये) असून, यातच एडीबीचे सहाय्य घेण्यात येणार आहे.

२५ वर्ष मेंटेनन्स फ्री या तत्त्वावर हे रस्ते उभारण्यात येणार आहेत. नीती आयोगाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बीव्हीआर सुब्रमण्यम आणि सदस्य राजीव गौबा यांची भेट घेतली. एफआरबीएम मर्यादा २५ टक्के असताना महाराष्ट्राने १८ टक्के इतकी ती राखल्याबद्दल नीती आयोगाने प्रशंसा केली.

# लैंगिक संबंध संमतीचे वय कमी करणे मुलांसाठी धोक्याचे

### केंद्र सरकारचे सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र ● वयोमर्यादा १६ करण्यास नकार

**नवी दिल्ली, २५ जुलै**

भारतीय कायद्यानुसार लैंगिक संबंधांसाठी संमतीचे किमान वय १८ वर्षे हा मुलांसाठी संरक्षणाची चौकट तयार करण्याच्या उद्देशाने विचारपूर्वक घेतलेला कायदेशीर निर्णय आहे. लैंगिक संमतीचे वय १८ वरून १६ वर्षे करणे हा मुलांवर अन्याय ठरेल आणि त्यांची सुरक्षा धोक्यात येईल, असे प्रतिज्ञापत्र केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात सादर केले.

लैंगिक संबंधासाठी संमतीचे वय १८ वरून कमी करून १६ वर्षे करण्यात यावे, अशी मागणी करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. यावर न्या. विक्रम नाथ आणि न्या. संदीप मेहता यांच्या न्यायासनाने केंद्र सरकारला यासंदर्भात उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले होते. यावर झालेल्या सुनावणीत केंद्र सरकारच्या वतीने अतिरिक्त महान्यायाभिकर्ता ऐश्वर्या भाटी यांनी गुरुवारी लेखी स्वरुपात प्रतिज्ञापत्र सादर केले. यात म्हटले, की सध्याचे कायदे, विशेषतः लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण करणारा पोस्को कायदा आणि भारतीय न्याय संहिता, अल्पवयीन मुलांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी बनवला आहेत. १८ वर्षांखालील मुलांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण करण्यासाठी ही वयोमर्यादा आवश्यक आहे.



**लैंगिक शोषणाचे प्रकार वाढणार**

सध्याची वयाची तरतूद अल्पवयीन मुलांना लैंगिक शोषणापासून, विशेषतः त्यांच्या ओळखीच्या लोकांकडून केल्या जाणाऱ्या गुन्ह्यांपासून संरक्षण देण्यासाठी आहे. तरुणांमधील प्रेमसंबंध आणि संमतीने शारीरिक संबंधांच्या प्रकरणांमध्ये न्यायालय विवेकाचा वापर करू शकते. परंतु कायद्यात सुधारणा करणे हे लैंगिक शोषणाचे प्रकार वाढविण्यासाठी कारणीभूत ठरू शकते.

**कायद्याचा गैरवापर करणाऱ्यांसाठी पळवाट**

भारतीय संविधानानुसार मुलांना देण्यात आलेल्या संरक्षणांना लक्षात घेऊन वयोमर्यादा निश्चित करण्यात आली आणि ती सौम्य करणे म्हणजे बाल संरक्षण कायद्यांमध्ये झालेल्या दशकांच्या प्रगतीला मागे टाकण्यासारखे आहे. जर या वयोमर्यादेत काही सवलत दिली गेली, तर ते कायद्याचा गैरवापर करणाऱ्यांसाठी, पीडितांच्या भावनिक अवलंबित्वाचा किंवा मौनाचा फायदा घेणाऱ्यांसाठी पळवाट ठरेल. (वृत्तसंस्था)

### वयातील बदलाची पृष्ठभूमी

लैंगिक संबंधासाठी संमतीचे वय १८६० मध्ये १० वर्षे होते. त्यानंतर, १८९१ च्या संमतीच्या वय कायद्यात ते १२ वर्षे करण्यात आले. १९२५ आणि १९२९ मध्ये ते १४ वर्षे करण्यात आले. १९४० मध्ये ते १६ वर्षे करण्यात आले आणि अखेर १९७८ मध्ये ते १८ वर्षे करण्यात आले, जे आतापर्यंत लागू आहे.


VIDYA VIKAS PRATISHTHAN'S

V V P INSTITUTE OF ENGINEERING & TECHNOLOGY, SOLAPUR.

● NAAC Accredited & ISO 9001:2015 Certified ●

72/2B, Pratap Nagar, Soregaon-Dongaon Road, Solapur -413008. Mob.8380030555

ENGINEERING DTE CODE: EN-06321



ADMISSIONS OPEN FOR A.Y. 2025-26

First Year Engg. B.Tech.

DSE, M.Tech. BCA, MCA

मेरिटमधील विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयीन शिष्यवृत्ती

प्रथम वर्ष CAP ROUND- १ करिता ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची दि. २६/०७/२०२५ ते २८/०७/२०२५ पर्यंत.

DTE फॅसिलिटेशन सेंटर (FC) शासन मान्य SCRUTINY CENTER (SC) सुविधा उपलब्ध

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन केंद्र सुरु सात रस्ता, जी.पी. सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ, तुळजापूर, कुर्डूवाडी, बीड, बार्शी, जत, उमदी, माजलगाव, उमरगा याठिकाणी

रविवार व सुट्टीच्या दिवशी ही कॉलेज व सर्व ॲडमिशन मार्गदर्शन केंद्रे सुरु राहतील.

U.G. COURSES OFFERED

| B.Tech. Courses | Intake | Choice Code |
|---|---|---|
| Artificial Intelligence & Data Science | 60 | 632199510 |
| Computer Science & Engineering | 120 | 632124210 |
| Civil Engineering | 30 | 632119110 |
| Electrical Engineering | 60 | 632129310 |
| Electronics & Tele. Engineering | 60 | 632137210 |
| Mechanical Engineering | 30 | 632161210 |

P.G. COURSES OFFERED

| M.Tech. Courses | Intake |
|---|---|
| Computer Science & Engineering | 18 |
| Mechanical (Design) Engineering | 06 |
| AICTE APPROVED NEW COURSES STARTED A.Y. 2025-26 | |
| Computer Applications Courses | Intake |
| BCA (Bachelor of Computer Applications) | 60 |
| MCA (Master of Computer Applications) | 60 |

ठळक वैशिष्ट्ये

- नामांकित कंपनीमध्ये 70% पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना नोकरी
- विविध शैक्षणिक व औद्योगिक संस्थांशी सामंजस्य करार
- मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहांची सुविधा
- सेंट्रलाईज्ड ट्रेनिंग प्लेसमेंट सेलच्या माध्यमातुन प्लेसमेंटच्या संधीत वाढ.
- अत्यंत माफक दरात गुणवत्तापूर्ण शिक्षण
- विद्यार्थ्यांची Employability Skill वाढविण्यावर विशेष भर
- सन 2024-25 मध्ये 39 पेक्षा जास्त कंपन्यांची भेट.
- स्पर्धा परिक्षा UPSC, MPSC, GATE साठी विशेष मार्गदर्शन
- शहरातील सर्व भागातून बस सुविधा उपलब्ध
- मुलींसाठी मोफत शिक्षण

OUR TOP RECRUITERS

Dr. A.N.Gaikwad, CAMPUS Director & Principal | Dr. G.K. Deshmukh, Founder Chairman | Shri. Amol (Nana) Chavan, President

For Admissions Contact: Prof. R.S. Chavan 9822174477 | Prof. J.K. Roman 9545935455

vvpiet@rediffmail.com | www.vvpengineering.org | Follow us on:

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...

### ट्रकच्या धडकेने तरूणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २५ जुलै -**

लघुशंका करून ट्रककडे जाणाऱ्या तरूणास भरधाव जाणाऱ्या ट्रकने जोरदार धडक दिली. या अपघातात त्या जखमी तरूणाचा मृत्यू झाला असून ट्रकचालकाविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सावलाराम देवासी (वय ३४, रा. अनुग्रेह रेसिडेन्सी, गोदुवारा, गुडीयारी, जि. रायपूर) असे मरण पावलेल्या तरूणाचे नाव आहे. याबाबत मयत सावलाराम याचा भाऊ मागीलाल तेजराम देवासी (वय ४०, रा. अनुग्रेह रेसिडेन्सी, गोदुवारा, गुडीयारी, जि. रायपूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमएच २५ एजे०९३५ क्रमांकाच्या ट्रकचालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयत सावलाराम, फिर्यादी मागीलाल आणि परखाराम हे तिघे भाऊ असून ते ट्रकचालक आहेत. २५ जुलै रोजीच्या पहाटे तीनच्या सुमारास केगाव ते हत्तूर या बायपास रोडवरील देगाव परिसरातील देशमुख वस्ती येथे मागीलाल व त्यांचा मोठा भाऊ परखाराम देवासी व चुलत भाऊ सावलाराम देवासी हे लघुशंका करून त्यांच्या वाहनाकडे रस्त्याच्या कडेने जात होते. त्यावेळी एमएच २५ एजी ०९३५ क्रमांकाच्या ट्रकच्या चालकाने ट्रक भरधाव व निष्काळजीपणे चालवून परखाराम व सावलाराम यांना जोरदार धडक दिली. यामध्ये सावलाराम याचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला तर परखाराम हे जखमी झाले. अपघातानंतर ट्रकचालक ट्रक घेऊन पळून गेला. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार जाधव पुढील तपास करीत आहेत.

### दहावीतील विद्यार्थ्यांचा पहिल्या मजल्यावरून पडून मृत्यू

**टेंभुर्णी, दि. २५ जुलै-**

रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल टेंभुर्णी येथे इयत्ता दहावी शिकणारा स्वप्नील मन्मत शिंदे वय पंधरा वर्षे मधल्या सुट्टीनंतर वर्गात जात असताना पहिल्या मजल्यावरून जुन्यासमोर कडून मृत्यू झाल्याचे उपचारांती कळले. अशा प्रकारची माहिती शाळेचे मुख्याध्यापक सुभाष ज्ञानदेव रोकडे यांनी टेंभुर्णी पोलीस स्टेशनला दिली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की दिनांक २४ जुलै रोजी नेहम िप्रमाणे शाळा सकाळी ११ वाजता भरली दुपारी २.३० चा ब्रेक होऊन ३.१० ला शाळा भरली. सर्व मुले आपापल्या वर्गात जात होती. यावेळी अचानक इयत्ता दहावीतील स्वप्निल मन्मत शिंदे हा जिन्यासमोर खाली पडला. त्यावेळी सर्व शिक्षक व विद्यार्थी त्या ठिकाणी गोळा झाले. त्याला लगेच गाडीतून मार्श हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले. त्यावेळेस डॉक्टरांनी मयत झाल्याची घोषित केले. मयत शिंदे हा कंदरहून दररोज सकाळी सहा वाजता शाळेत जाण्यासाठी टेंभुर्णी येत होता. शाळेचे टाइमिंग अकरा ते पावणे पाच असली तरी प्रायव्हेट ट्युशन असल्यामुळे तो लवकर येत होता. त्याला दोन बहिणी असून आई-वडिलांचा तो एकुलता एक मुलगा होता. त्याच्या जाण्याने कंदर परिसरामध्ये हळहळ व्यक्त होत आहे. सदर घटनेची माहिती मुख्याध्यापका रोकडे यांनी स्वतः टेंभुर्णी पोलीस ठाण्यात हजर राहून दिले आहे.






### लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाची शैक्षणिक सहल

**सोलापूर, दि. २५ जुलै-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या तृतीय व चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल कृषी विज्ञान केंद्र, सोलापूर व सोलापूर विज्ञान केंद्र सोलापूर येथे आयोजित करण्यात आली होती. या शैक्षणिक सहलीत विद्यार्थ्यांनी कृषी विज्ञान केंद्र सोलापूर येथे भेट दिली. कृषी विज्ञान केंद्र सोलापूर येथे प्रसाद गोंजारी (विषय विशेतज्ञ प्लँट पॅथोलॉजी) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी विद्यार्थ्याना कृषी विज्ञान केंद्राची कार्यपद्धती, विविध पिकांच्या लागवडीचे तंत्रज्ञान, उत्पन्न वाढीसाठी अद्यावत तंत्रज्ञान, त्यातील किड व रोग व्यवस्थापन यासोबतच ज्वारी व सोयाबीन पासून तयार केलेले विविध मूल्यवर्धित प्रक्रिया पदार्थ, प्रक्रिया उद्योगासाठी आवश्यक यंत्रसामग्री, विविध सेंद्रीय खते निर्मिती तंत्रज्ञान, शेतकऱ्यासाठी आयोजित करण्यात येणारे विविध प्रशिक्षण उपक्रम याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी सोलापूर विज्ञान केंद्र येथील विविध विज्ञानावर आधारित प्रयोग, तारामंडल विभाग, सायन्स गार्डन, टेक्सटाईल माहिती विभाग, इनोव्हेटिव्ह सेंटर आदींना भेट देऊन विज्ञानातील विविध संशोधन व प्रयोग अनुभवले. यासाठी राहुल दास व श्रद्धा माहेश्वरी यांचे मार्गदर्शन लाभले. या सहलीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन, प्रा. अंकिता पवार व प्रा. आशिष सरकाळे यांचे सहकार्य लाभले.



### पिलीव येथे नीट परिक्षेतील यशाबद्दल तनीष गांधी याचा सत्कार

**पिलीव, दि. २५ जुलै -**

पिलीव (ता. माळशिरस) येथील तनीष गांधी याने मिळवलेल्या नीट परिक्षेतील यशाबद्दल आठवणी ९५ संघटनेतर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेचे उपाध्यक्ष नितीन शिंदे, सचिव सचिन गाटे, माजी अध्यक्ष उमेश देशमुख उपस्थित होते.

# पेट्रोल पंपावर पेट्रोलचे पैसे मागताच मारहाण

## जीवे मारण्याची व पंप उडवून देण्याची धमकी

### अक्कलकोटमधील प्रकार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २५ जुलै-**

अक्कलकोट शहरात गुन्हेगारी घटनेत वाढ होत असुन अक्कलकोटची प्रतीमा मलीन होत आहे. भाविकांना मारहाणीचा प्रकार, शाईफेक व हल्ला घटनेने महाराष्ट्रभर नव्हेतर देशपातळीवर चर्चा झाली. आता पेट्रोल पंपावरील घटनेने आणखीन चिंता वाढली आहे. दोन जणांनी पेट्रोल पंपावरील कामगारास पेट्रोलचे पैसे का मागतोस म्हणून मारहाण केली. पैसे मागितले तर पेट्रोलपंप उडवून देण्याची धमकी दिली. जबरदस्तीने खिशातील पैसे घेतले. आम्ही आल्यावर पेट्रोलचे पैसे मागायचे नाही आल्यावर हप्ता खंडणी द्यायची अशी धमकी दिल्याने अक्कलकोट शहरात खळबळ माजली आहे. सदर घटना सीसी टिव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. याप्रकरणी संशयितांना न्यायालयाने २७ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

अक्कलकोट शहर उत्तर पोलीस ठाण्यात दोघांविरूध्द प्रदिप बाळू फुटाणे (वय-३४) यांनी फिर्याद दाखल केली आहे. उत्तर पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेबाबत शहर उत्तर पोलीस ठाण्याकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, २३ जुलै रोजी रात्रौ ०९:४५ वाचे सुमारास येथील ए.एस. मंगरुळे पेट्रोलपंपावर मोटार सायकल (एमएच १३ क्यु ९१८०) वरील रियाज रहिमबक्ष बागवान व वसीम अब्दुलरज्जाक बागवान ( दोघे रा. बागवान गल्ली अक्कलकोट) यांनी १०० रुपयांचे पेट्रोल भरुन घेतले. त्याचे पैसे न देता जात असताना फिर्यादी फुटाणे याने पैसे मागीतले. त्यावेळी गाडी चालवणा-याने फिर्यादीचे गालावर चापट मारत शिविगाळ केली. पैसे मागीतला तर पेट्रालपंप उडवुन देवु अशी धमकी दिली. पाठीमागे बसलेल्या इसमाने पैसे मागीतले तर खल्लास करतो अशी दमदाटी करत फिर्यादीचे शर्टचे वरच्या खिशातील ७०० रुपये जबरदस्तीने हिसकावुन घेतले. त्यावेळी फिर्यादीसोबत असलेला प्याटी हा त्यांचे भांडणे सोडविण्यास गेला. त्यावेळी ते दोघे फिर्यादीला उद्देशुन तुला पेट्रोलपंपावर काम करायचे असेल तर आम्ही येईल तेव्हा फुकट पेट्रोल दयावे लागेल. आम्हाला हप्ता (खंडणी) दयावे लागेल असे म्हणत तुझे पेट्रोलचे पैसे व ७०० रुपये देत नाही. हेच आमचा हप्ता आहे असे म्हणत शिवीगाळ दमदाटी केली. फिर्यादीसोबत असलेल्या प्याटी यांने त्यांचे मोबाईलमध्ये गाडीचे नंबर लिहुन घेत असताना शिविगाळ केली. तुला काय लिहायचे लिहुन घे आम्ही कोणालाच भित नाही. तुम्ही तक्रार दिलात तर तुम्हाला दोघांसहीत पेट्रोलपंप उडवुन देण्याची धमकी देत निघुन गेले. घटनेतील संशयिताना पोलीसांनी अटक करून न्यायालयात हजर केले. संशयित आरोपींना २७ जुलैपर्यंत पोलीस कोठडी मिळाली आहे. घटनेचा अधिक तपास पोनि राजेद्र टाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.कोळी करीत आहेत.





### ग्रीन एज फार्मर प्रोड्युसर कंपनी केंद्राचा शुभारंभ

#### वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटची उत्पादने उपलब्ध

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ जुलै -**

पुणे येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटची उत्पादने विक्री आणि सेवा केंद्र असलेल्या ग्रीन एज फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या नूतन केंद्राचा शुभारंभ थाटात पार पडला.

देगाव टोलनाक्या जवळील बसवेश्वर नगर येथे रोडलगत नव्याने सुरु झालेल्या या केंद्राचा शुभारंभ वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या वसंत ऊर्जा विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. सुनिल दळवी यांच्या हस्ते या केंद्राचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर जकराया शुगरचे ॲड. जाधव, शिवसेनेचे नेते प्रकाश वानकर, दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, कंपनीचे चेअरमन डॉ. अमर सुपाते, संचालक सतीश माने, संचालक शिवाजी नलावडे, संचालक शरद पाटील, निवृत्त पोलिस उपायुक्त दिपक आर्वे, उद्योजक राजू सुपाते, कॉन्ट्रक्टर सुरेश चव्हाण, उद्योजक हर्षवर्धन कंडारकर, प्रशांत तारापुरे, गोविंद गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. ग्रीन एज फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या नूतन केंद्रातून ऊसासह इतर सर्वच पिकांसाठी उपयुक्त जैविक खते उपलब्ध असणार आहेत. शुगरची रिकव्हरी वाढण्यास देखील मदत होणार आहे. एआयसह नवीन तंत्रज्ञानाच्या आधारे शेतीबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळणार आहे. ड्रोनद्वारे फवारणी आदीची माहिती मिळणार असल्याचे चेअरमन डॉ. सुपाते यांनी याप्रसंगी बोलताना सांगितले.

## अंगणवाडी सेविका मदतनीस या खऱ्या हीरकणी

### डॉ. संगीता पाटील यांचे प्रतिपादन

#### एफआरएस शंभर टक्के व ४३ अंगणवाडी सेविका मदतनीसांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२५ जुलै -**

आषाढी सोहळ्यात लाखो भाविकांच्या सेवेसाठी कार्य करणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीस ह्याच खऱ्या अर्थाने हिरकणी असल्याचे प्रतिपादन डॉ. संगीता पाटील यांनी येथे केले.

येथील एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पांतर्गत अंगणवाडी सेविका मदतनीस सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी डॉ. पाटील बोलत होत्या. कार्यक्रमाची सुरूवात प्रमुख पाहुणे डॉ. पाटील यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने झाली. यावेळी बालविकास प्रकल्प नागरी अधिकारी किरण जाधव, मुख्यसेविका सारिका सणगर उपस्थित होते.

आषाढी यात्रेसाठी पालखी म ार्गासह पंढपूर शहरात सुमारे वीस गर्दीच्या व महत्त्वाच्या ठिकाणी महिला भाविकांच्या सोयीकरिता हिरकणी कक्षाची स्थापना करण्यात आली होती. याची जबाबदारी एकात्मिक बालविकास प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्याकडे देण्यात आली होती. त्यांनी चांगल्या पद्धतीने जबाबदारी पार पाडत काम केल्याने सन्मानपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच एफ आर एस मध्ये शंभर टक्के काम केलेल्या ४३ अंगणवाडी सेविकांनाही सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. आषाढीत लाखो स्तनदा मातांसाठी राज्य महिला आयोगाच्या निर्देशाप्रमाणे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर हिरकणी कक्ष स्थापन करण्यात आले होते.



## माळशिरस तालुक्यात ५३६ जणांचे रक्तदान

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि.२५ जूलै-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून माजी आमदार राजाभाऊ सातपुते यांच्या मार्गदशनाखाली नातेपुते येथे महा रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात माळशिरस तालुक्यातील विविध गावातील ५३६ नागरिकांनी रक्तदान केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून तालुक्यातील प्रत्येक गावात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन तसेच रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. माजी आमदार सातपुते यांनी या रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते. यावेळी रक्तदान करणाऱ्यास प्रमाणपत्र व अल्पोपहार देणयात आला. सदरच्या रक्तदान शिबीराप्रसंगी शिवप्रसाद उद्योग समुहाचे शरदबापु मोरे, हनुमंतराव सुळ, सोपान नारनवर, हनुमंत ढालपे, राजकुमार पाटील, ॲड. भानुदास राऊत, दादासाहेब उराडे, नातेपुते मंडल अध्यक्ष संजय देशमुख, माळशिरस मंडल अध्यक्ष नितीन मोहीते, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशदादा पाटील, दिपक काळे, शशीकांत बरडकर, ज्ञानेश्वर उराडे, अमित चांगण, रावसाहेब पांढरे उपस्थित होते. तालुका अध्यक्ष शरद मदने, राजु शेठ पांढरे ,अमित चांगण, देवीदास चांगण, संजय उराडे, हनुमंत करचे, शशी कल्याणी, राहुल पदमन, वैभव शहा यांच्यासह भाजपच्या पदाधिकारी यांनी हे रक्तदान शिबिर पार पाडणयासाठी विशेष परिश्रम घेतले.



**ॲपवरील तक्रारीचा वेळेत निपटारा न केल्याप्रकरणी**

## महिनाभरात ३८ कर्मचाऱ्यांना केला एकूण १९ हजार रुपये दंड

### पालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२५ जुलै-**

महापालिकेच्या माय सोलापूर अँप वरील नागरिकांच्या तक्रारींचा वेळेत निफ्टारा न केल्याप्रकरणी निष्काळजीपणाच्या गैरवर्तनासाठी गेल्या ३७ दिवसात महापालिकेतील विविध विभागातील ३८ कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. या सेवकांना एकूण १९ हजाराचा दंड आकारण्यात आला आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी दिली.



माय सोलापूर ॲपवर नागरीकांनी नोंदविलेल्या प्राप्त तक्रारीचा निपटारा मुदतीत न करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्या विरुध्द दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिलेले आहेत. अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या नियंत्रणाखाली ही कारवाई करण्यात येत आहे. आपली तक्रार पोर्टल / माय सोलापूर ॲपवर नोंदविणेत आलेल्या तक्रारींचा आढावा घेतला असता, कर्मचाऱ्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या विभागाशी निगडीत प्राप्त तक्रारी अद्याप प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले.

ही बाब अत्यंत गंभीर व कार्यालयीन शिस्तीस बाधा पोहोचविणारी आहे. आपली तक्रार पोर्टल / माय सोलापूर ॲपवरील नागरीकांच्या तक्रारीचे निराकरण मुदतीत न करणे, प्रलंबित ठेवणेच्या, केलेल्या कार्यवाहीची माहिती अद्ययावत न करणे या कामकाजातील निष्काळजीपणाच्या गैरवर्तनासाठी कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र म हानगरपालिका अधिनियम कलम ५६(२) (ड) च्या तरतुदीनुसार आर्थिक दंड करण्यात येत आहे.यापुढे ॲपवरील तक्रार निवारणास विलंब झाल्यास प्रती दिवस १०० रुपये या प्रमाणे आर्थिक दंड आकारण्यात येत आहे.

दरम्यान, दि. १८ जून ते २४ जुलै २०२५ या कालावधीत साधारणता: ३७ दिवसात एकूण ३८ सेवकांना एकूण १९ हजार रुपये दंड करण्यात आला आहे आहे.

## वालचंद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचा पुढील टप्पा सुरू

### २८ जुलैपर्यंत पर्याय अर्ज सादर करणे आवश्यक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै-**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत आणि राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिपत्याखाली २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकी प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी केंद्र शासन, राज्य शासन तसेच स्वायत्त खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. याअंतर्गत सोलापूरच्या प्रतिष्ठित वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या महाविद्यालयात प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांना पुढील महत्त्वाच्या टप्प्यांची माहिती याठिकाणी देत असल्याचे प्रा. संजय मठ यांनी सांगितले.

अंतिम गुणवत्ता यादी जाहीर झाली आहे. जागावाटप प्रक्रिया अर्थात फेरींच्या टप्प्याला सुरुवात झाली आहे. इच्छुक उमेदवारांनी २६ ते २८ जुलै दरम्यान ऑनलाईन प्रणालीद्वारे स्वतःच्या लॉगिनमधून पर्याय अर्ज सादर करणे आवश्यक आहे. ३१ जुलै रोजी या पहिल्या फेरीतील जागा वाटपाचा तात्पुरता निकाल प्रसिद्ध केला जाणार असून, १ ऑगस्ट ते ३ ऑगस्ट या कालावधीत उमेदवारांनी आपले जागा स्वीकृतीकरण, फी भरणे आणि महाविद्यालयात प्रवेश निश्चित करणे अपेक्षित आहे. या टप्प्यानंतर उर्वरित रिक्त जागांसाठी दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या फ ेरीसाठीही स्वतंत्र वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे या वर्षी विद्यार्थ्यांना ई-स्क्रुटिनी आणि फिजिकल स्क्रुटिनी अशा दोन पर्यायांतून कागदपत्र पडताळणीची मुभा देण्यात आली आहे. ई-स्क्रुटिनी निवडलेल्यांना प्रत्यक्ष केंद्रावर न जाता ऑनलाइनच अर्जाची पडताळणी पूर्ण करता येणार आहे.

या प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थी आणि पालकांनी. या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी अद्ययावत माहिती पाहणे आवश्यक आहे. सर्व प्रकारची अर्ज सादरीकरण, कागदपत्र अपलोडिंग, निवड प्रक्रिया आणि प्रवेश शुल्क भरणे ही सर्व कामे उमेदवाराच्या स्वतःच्या लॉगिनद्वारे ऑनलाईन पद्धतीनेच पूर्ण करावी लागणार आहेत. विशेष सूचना म्हणून, आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या जात वैधता, नॉन क्रीमी लेयर, व प्रमाणपत्रे निश्चित वेळेत व संबंधित महाविद्यालयात सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा अशा उमेदवारांचा प्रवेश रद्द होण्याची शक्यता आहे. वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अत्याधुनिक प्रयोगशाळा, अनुभवी प्राध्यापकवर्ग, विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमधील प्लेसमेंट संधी, तसेच गुणवंत विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती योजना उपलब्ध आहेत. त्यामुळे भविष्यात यशस्वी अभियंते होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांनी ही प्रवेश प्रक्रिया गांभीर्याने पार पाडावी, असे आवाहन प्रा. मठ यांनी केले आहे.

## पन्हाळा पावनखिंड पदभ्रमंती मोहिम शिवमय वातावरणात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि. २६ जुलै-**

हिंदवी परिवाराची पन्हाळा पावनखिंड पावसाळी पदभ्रमंती मोहिम १८, १९ आणि २० जुलै दरम्यान शिवचरित्रकार डॉ. शिवरत्न शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवमय वातावरणात पार पडली.

मोहिमेची सुरुवात जय भवानी जय शिवाजी, छत्रपती शिवाजी महाराज की जय, हर हर महादेवचा जय जयकार करत या जयघोषात वीर बाजीप्रभू देशपांडेंच्या विरतेच्या घोषणा देत नरवीर शिवा काशीद आणि बाजी प्रभू देशपांडे यांच्या पुतळ्यास अभिवादन करून करण्यात आली.

मसाई पठार येथे पन्हाळा ते पावनखिंड ऐतिहासिक घटनेचा पूर्वार्ध शिवव्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे यांच्या वाणीतून सर्व शिवभक्तांना ऐकायला मिळाले.

यंदाच्या पावसाळी पदभ्रमंती मोहिमेत महाराष्ट्रातून जवळपास ५५० शिवभक्तांनी सहभाग नोंदविला होता. त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील साधारण १५० शिवभक्त होते. सोलापूर, पंढरपूर, पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, अकोला, वाशिम, अमरावती, कोल्हापूर, नाग पूर,बुलढाणा,नाशिक,ठाणे,बीड यांसह राज्यभरातील अनेक शिवभक्त सहभागी झाले होते. तीन दिवसांच्या कालावधीमध्ये ५४ किमी अंतर पार करायचे होते. त्यामध्ये पहिला मुक्काम खोतवाडी येथे तर दुसरा मुक्काम पांढरेपाणी या गावी होता. या प्रवासात डोंगर, जंगले, गुंठा अर्धा गुंठ्याच्या शेती आणि त्यामध्ये प्रामाणिकपणे घाम गाळणारे शेतकरी बांधव, वाड्या वस्त्यांवरील शाळांमध्ये जाणारे विद्यार्थी आणि त्यांच्या बोलण्यात दिसणारा प्रामाणिकपणा म्हणजे शिवाजी महाराजांचा प्रामाणिक काळ या मातीत आजही दिसत होता. एकूणच मोहिमेचा संपूर्ण अनुभवच विलक्षण होता. असे सहभागी शिवभक्तांनी सांगितले.

राष्ट्रप्रथम वंदेमातरम् ह्या ब्रीदवाक्यावर परिवाराची वाटचाल असते. या मोहिमेच्या माध्यमातून शिवविचारांची आठवण होऊन युवक व्यसनमुक्त व्हावेत, तसेच राष्ट्र बांधणीचे कार्य करण्यासाठी प्रेरित व्हावेत हा मुख्य उद्देश आहे. मोहिमेचा उत्तरार्ध पावनखिंड येथे डॉ. शिवरत्न शेटे सरांनी सांगितला आणि मोहिमेची सांगता झाली. या मोहिमेत राज्यमंत्री बच्चू कडू, आयुष्मान भारत मिशनचे महाराष्ट्राचे अध्यक्ष ओमप्रकाश शेटे परिवारासह सहभागी झाले होते. याप्रसंगी डॉ. सुप्रज्ञा शेटे, मोहिम सरनोबत संभाजी भोसले, महेश शिंदे, धारेश्वर तोडकरी, अर्चना शिंदे,

सोमनाथ शिंदे, तुषार आवताडे, भूषण बापट, दिलीप मेसरे, विजय पोखरकर, ॲड.महेश जगताप, परशुराम कोकणे, शंभू लेंगरे, समाधान आवताडे,नितीन सुकरे,सचिन भोसले, दादू कांबळे, संतोष शेटे, अजय भोयर यांनी मोहिम यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.



पावनखिंड...मराठ्यांच्या रक्ताने माखलेल्या...बाजीच्या हौतात्म्याने पावन झालेल्या पावनखिंडीतील मातीने कपाळावर टिळा लावुन, माजी राज्यमंत्री बच्चुभाऊ कडू यांच्या उपस्थितीत हिंदवी परिवार सोलापूर जिल्हाप्रमुख म्हणुन सोमनाथ शिंदे यांची तर शहरप्रमुख म्हणुन तुषार आवताडे यांची नियुक्ती संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवरत्न शेटे यांनी केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# शिवसेना, राष्ट्रवादीमुळे डागाळतेय भाजपाची प्रतिमा

## ● बेताल मंत्री, आमदारांवर आता कारवाईच आवश्यक; विधिमंडळासह सरकारची विश्वासार्हता जपण्यासाठी कठोर पावलांची गरज

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ जुलै-**

**सत्तेसाठी शब्दांचा विश्वासघात करणाऱ्यांना राजकीय धडा शिकवण्यासाठी आपलाच पक्ष फोडून आलेल्यांना भाजपाने सोबत घेतले खरे, पण सत्तेच्या छत्रछायाचेखाली बेतालपणा करणाऱ्या शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या मंत्री व आमदारांना वेळीच आवर घालणे खूपच महत्वाचे आहे. कारण मित्रपक्षांमुळे भाजपाची प्रतिमा जनमाणसात डागाळण्याचा धोका वाढतो आहे. बेताल, उर्मटांना आता सुधारण्याची संधी देण्यापेक्षा कारवाईच गरजेची आहे. विधिमंडळासह सरकारची प्रतिमा आणि विश्वासार्हता जपण्यासाठी भाजपाला आणि पर्यायाने मित्रपक्षांच्या प्रमुखांना कठोर पावले उचलणे क्रमप्राप्त आहे. अन्यथा याचे परिणाम तोंडावर असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुक निकालातही दिसून येण्याची दाट शक्यता आहे.**

मुख्यमंत्रीपदासाठी वर्षेनुवर्षांची युती मोडीत काढणाऱ्या शिवसेनेला काँग्रेससोबत जाणे महागात पडले आणि त्यांच्याच विश्वासू शिलेदारांनी उध्दव ठाकरेंना कात्रजचा घाट दाखवला. शिवसेना पक्ष फोडून एकनाथ शिंदे यांनी ४० आमदारांसह गनिमी कावा केल्याचे सर्वश्रुत आहे. एकनाथ शिंदे यांचे धाडस यशस्वी ठरलेले पाहून पहिल्या प्रयत्नात अपयशी ठरलेल्या अजित पवारांनी पक्ष फोडण्याचा दुसरा प्रयत्न यशस्वी करून दस्तूरखुद्द काका शरद पवारांनाच जोर का झटका धिरेस दिला.

शिंदे-अजितदादा एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी पक्ष व चिन्ह देखील ताब्यात घेवून दस का दम दाखवून दिला. लोकसभा निवडणुकीत बॅकफूटावर गेलेल्या महायुतीने विधानसभा निवडणुकीत मात्र घवघवीत यश मिळवले. भाजप व देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखाली दोन तृतीयांशपेक्षा अधीक बहुमत मिळाल्याची हवा डोक्यात गेलेल्या शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या मंत्री व आमदारांनी विधिमंडळ व सरकारची प्रतिमा मलिन होईल अशी कृत्ये आणि वक्तव्ये केल्याने भाजपाची प्रतिमा डागाळतेय. तर महायुतीतील मित्रपक्षांच्या मंत्र्यांकडून सातत्याने अजित पवारांकडे असलेल्या अर्थखात्यांविषयी नाराजी व्यक्त होत आहे. निधी वाटपात दुजाभाव होत असल्याची उघड नाराजी बोलून दाखवली जात आहे.

शिवसेनेचे मंत्री संजय शिरसाट यांचा सिगारेट ओढतानाचा आणि पैशाची बॅग असा व्हिडिओ विरोधी पक्षाने व्हायरल केल्याने यावर जनमाणसातूनदेखील वाईट प्रतिक्रिया आल्या आणि सोशल मिडियावर लोक थेट व्यक्त होवू लागल्याने सरकारवर नामुष्की ओढावली. शिरसाटाच्या मुलाने हॉटेल खरेदी प्रक्रियेत घेतलेल्या सहभागावरून विरोधकांनी चांगलेच खिंडीत गाठले. रायगडच्या पालकमंत्री पदावरून नाराज असलेले शिवसेनेचे मंत्री भरत गोगावले यांचा मांत्रिकांसमवेत पूजापाठ करतानाचा व्हिडिओ व छायाचित्र व्हायरल झाले आणि सरकारवरच टिकेची झोड ओढली.

शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी टॉवेल-बनियानमध्ये येवून विधिमंडळाच्या कॅन्टिनचालकाला बेदम मारहाण केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आणि सरकारच्या प्रतिमेला धक्काच बसला.

**मंत्रीपदे जाणार का याची उत्सुकता...**

महायुती सरकारमधील मित्रपक्ष शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या वादग्रस्त आणि बेताल मंत्र्यांवर कारवाई होणार आणि मंत्रीपदे जाणार याची चर्चा शिगेला पोहचली आहे. भाजपाची प्रतिमा मित्रपक्षांमुळे डागाळत असल्याने थेट दिल्लीतून कारवाईचे संकेत दिल्यासंदर्भातील बातम्या येत आहेत. शिवसेनेचे मंत्री संजय शिरसाट, संजय राठोड, योगेश कदम आणि राष्ट्रवादीचे मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर कारवाईची चर्चा रंगलेली आहे. या मंत्र्यांवर काय कारवाई होणार? मंत्रीपदे जाणार की खाते बदलणार? याची उत्सुकता महाराष्ट्राला लागली आहे. नवीन खाती मिळाली तरी मंत्र्यांच्या मूळ स्वभावाचे काय? अशीही चर्चा सोशल मिडियावर सुरु आहे.



शिवसेनेचे मंत्री शंभूराजे देसाई यांनी सभागृहात वापरलेली भाषा व दमबाजी देखील नकारार्थानेच चर्चीली गेली. शिवसेनेचे मंत्री योगेश कदम यांच्यावर विधिमंडळ अधिवेशनातच विरोधकांनी हल्ला चढवत त्यांच्या मातोश्रीच्या नावे असलेल्या लेडिज बारवरून सरकारला खिंडित गाठण्याचा प्रयत्न केला. शिवसेनेचे मंत्री संजय राठोड हे देखील वादग्रस्तच आहेत. यातच भर म्हणजे मराठी-हिंदीच्या विषयावरून उध्दव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आले आणि शिवसेनेचे टेन्शल वाढले.

नुकत्याच पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनात उबाठासह महाविकास आघाडीने शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या मंत्र्यांना चांगलेच घेरल्याचे दिसून आले. खासकरून उबाठाने तर शिंदे सेनेला टार्गेटच केल्याचे दिसून आले. एकूणच या सर्व राजकीय घडामोडींमुळे शिवसेनेचे काही मंत्री आणि त्यांची मंत्रिपदे अडचणीत आल्याचे चित्र आहे. तसेच एकनाथ शिंदे यांचे पुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांना आयकर खात्याची नोटीस आल्याचे वृत्तदेखील चांगलेच गाजले. तर शिवसेना पक्ष आणि चिन्ह कोणाचे याची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात अंतिम टप्प्यात आल्याने एकनाथ शिंदे यांच्या दिल्ली वाऱ्या वाढल्याचीही चर्चा आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची शिवसेना चांगलीच अडचणीत आली असताना दुसरीकडे अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे मंत्रीदेखील हम भी कुछ कम नही, असे म्हणत असल्याचा प्रकार समोर येत आहे. सातत्याने वादग्रस्त ठरणारे राष्ट्रवादीचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा सभागृहात रमी खेळतानाचा व्हिडिओ विरोधकांनी व्हायरल केला आणि राज्यभर खळबळ उडाली. यापूर्वी देखील सातत्याने वादग्रस्त ठरलेले कृषीमंत्री कोकाटे यांनी कहर करत थेट सरकारलाच भिकारी म्हंटल्याने त्यांचा तिजा भरल्याचे स्पष्ट करत उपमुख्यमंत्री अजित पवारांनी कोकाटेंवर कारवाईचे संकेत दिलेले आहेत. पक्ष व चिन्ह कोणाचे यावर सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल काय असणार याचेही टेन्शन अजित राष्ट्रवादीला असणार आहे. कारण दोन्ही पक्षफुटी आणि पक्ष व चिन्हाबाबतचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात आहे.

**प्रशांत माने**
**मो. ९८८११९१४४३**

विधानसभेत बहुमताच्या अगदी जवळ असतानाही युतीधर्म म्हणून भाजपाने शिवसेना आणि राष्ट्रवादीला सत्तेत सोबत घेतलेले आहे. गरज नसतानाही दिलेल्या शब्दाचे पालन करणाऱ्या भाजपाला शिंदे आणि अजितदादांना सत्तेत मानाचे पान दिलेले असल्याची चर्चा कार्यकर्त्यांमधून आहे. महायुतीतील मित्रपक्षांची अशी राजकीय स्थिती असतानाही त्यांचे काही मंत्री बेताल वागून आणि वादग्रस्त कृत्य व वक्तव्ये करून महायुती सरकारला अडचणीत आणण्याचे काम करीत आहेत. मित्रपक्षातील मंत्री आणि आमदारांकडून सुरु असलेल्या वर्तणुकीमुळे सत्तेतील प्रमुख पक्ष भाजपा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा डागाळत असल्याचे चित्र आहे. मित्रपक्षांच्या या वर्तणुकीवर संघाने देखील नाराजी व्यक्त केलेली आहे. त्याचमुळे आता राज्याच्या मंत्रीमंडळात फेरबदलाची चर्चा सुरु झाली आहे.

# सोमवारपासून कामकाज सुरळीत होणार

**▸▸सर्वपक्षीय बैठकीत निर्णय**
**▸▸लोकसभेतील अडथळे दूर**

**नवी दिल्ली, २५ जुलै**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात कामकाजावरुन निर्माण झालेला गतिरोध संपला असून पुढील आठवड्यात सोमवारपासून लोकसभेचे कामकाज सुरळीत होण्याची शक्यता आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आज दुपारी कामकाजावरुन निर्माण झालेला गतिरोध दूर करण्यासाठी सर्वपक्षीय बैठक बोलावली होती.

या बैठकीत सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल आणि विरोधी पक्षांचे नेते उपस्थित होते. सोमवारपासून सभागृहाचे कामकाज सुरळीत करण्यावर सत्ताधारी पक्ष तसेच विरोधकांमध्ये या बैठकीत सहमती झाल्याचे समजते. आज लोकसभेच्या कामकाजाला सुरुवात होताच सभागृहात गोंधळ सुरु झाला, तेव्हा अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले की, सभागृहाच्या कामकाजावरुन निर्माण झालेली कोंडी दूर करण्यासाठी आपण आज दुपारी सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांसाबेत विरोधकांची बैठक घेणार आहे, या बैठकीत विरोधी पक्षांच्या सर्व नेत्यांनी आले पाहिजे. आपल्याला कोंडी दूर करुन कामकाज सुरळीत करायचे आहे.

# पावसाप्रमाणेच मंत्रीमंडळ फेरबदल चर्चेच्या कोसळधारा



## मुख्यमंत्र्यांची दिल्लीत शहाशी चर्चा

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. २५ जुलै**

काही मंत्र्यांची सातत्याने वादग्रस्त वक्तव्ये आणि वर्तनामुळे गेल्या काही दिवसापासून चर्चेत राहिलेल्या महायुती सरकारच्या मंत्रीमंडळात फेरबद्दल होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. काही मंत्र्यांची उचलबागडी तर काहींचे खातेपालट करून मंत्रिमंडळाची प्रतिमा स्वच्छ बनविण्याचा निर्णय सरकारमधील तीन पक्षाच्या प्रमुखानी घेतला असल्याची चर्चेच्या कोसळधारा मुसळधार पावसाप्रमाणेच राज्याच्या राजकारणात सुरु आहेत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्ली दौऱ्यात शनिवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन त्याबाबत चर्चा केली असून सुमारे अर्धा तासाच्या चर्चेत वादग्रस्त मंत्र्यांना हटविण्याला शहा यांनी हिरवा कंदील दाखविला असल्याचे सांगण्यात येत आहे. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट,शिक्षण मंत्री दादा भुसे, गृह राज्यमंत्री योगेश कदम यांची उचलबागडी किंवा खातेबद्दल केले जाईल, असे सांगण्यात येत आहे. राज्याच्या राजकारणात विविध घडामोडी सुरु असून मंत्री शिरसाट यांचा बेडरूममध्ये नोटानी भरलेल्या कथित बॅगेसह टॉवेल गुंडाळून बसलेला व्हिडीओ, त्यानंतर कृषिमंत्री कोकाटे यांचा विधानपरिषदेत मोबाईलवर रमी खेळत असल्याचा व्हिडीओ आणि गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्या मातोश्री जयश्री कदम यांच्या नावे असलेला सावली डान्सबार या घटनामुळे सरकारच्या प्रतिमेवर मोठा परिणाम होत आहे. याबाबत विरोधकांनी केलेल्या आरोपाला संबंधित मंत्री व सरकारकडून उत्तर दिले जात असलेतरी त्यांच्याबाबत जनतेमध्ये राग असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांनीही त्याबाबत उघड नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे त्यांनी आपल्या पक्षासह दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या मंत्र्यांनाही योग्य सूचना दिल्या असल्याचे सांगितले जात मंत्रीमंडळाची प्रतिमा स्वच्छ रहावी, यासाठी फेरबदल करण्याचा निर्णय घेतला असून वादग्रस्त मंत्र्यांच्या हाती नारळ तर काहींचे खाते बदल केले जाईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.त्यासाठी दोन दिवस दिल्ली दौऱ्यात असलेले मुख्यमंत्री फडणवीस हे राज्याच्या विविध विकास कामाबरोबरच पक्ष श्रेष्ठीशी फेरबदलाबाबत चर्चा केल्याचे सांगण्यात येते.

### ८ मंत्र्यांना डच्चू तर मुनगट्टीवार विधानसभा अध्यक्ष : संजय राऊत

महायुती सरकारमधील आठ वादग्रस्त मंत्र्यांना लवकरच डच्चू देण्यात येणार असल्याचे बोललं जात आहे. त्यांच्या ऐवजी काही नव्या चेहऱ्यांना मंत्रिमंडळात संधी दिली जाईल, त्यामध्ये विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना संधी दिली जाईल व त्यांच्याजागी ज्येष्ठ आमदार सुधीर मुनगंटीवार यांची नियुक्ती केली जाईल, बदलामध्ये भाजपचे दोन, शिंदे गटातील चार आणि पवार गटातील दोन मंत्र्यांचा समावेश असल्याचा दावा ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत यांनी केला आहे.

### मुख्यमंत्री-अमित शाह अर्धा तास गुप्तगू

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये सुमारे ३० मिनिटे बैठकीत वादग्रस्त मंत्र्यांना घरी पाठवण्याबाबत चर्चा झाल्याचे सांगण्यात येत आहे.



# प्रा. श्रीराम पुजारी यांचे व्यक्तीमत्व रत्नासारखे : सुशीलकुमार शिंदे

**● हिराचंद नेमचंद वाचनालय आणि श्रीराम पुजारी प्रतिष्ठानतर्फे जन्मशताब्दी वर्षानिमित्त कार्यक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै-**

विद्यार्थ्यांमधील गुण हेरून त्यांचे कौतुक करत त्यांना पाठींबा देणारे उत्तम शिक्षक म्हणजे श्रीराम पुजारी. प्रा. पुजारी यांनी विद्यार्थ्यांना सर्वांगिण दिशा दाखविण्याचे काम केले. ते ज्ञान देण्याचे वेड असणारे शिक्षक होते. श्रीराम पुजारी यांनी शैक्षणिक, सांस्कृतिक वारसा जपला. त्यांचे व्यक्तीमत्व रत्नासारखे लखलखते होते जे कायम प्रकाश देत राहिले. ते सोलापूरचा अभिमान होते, पण त्यांच्या विद्वत्तेची कदर महाराष्ट्राने केली नाही, असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले.

प्रा. श्रीराम पुजारी यांची जन्मशताब्दी आणि श्रीराम पुजारी प्रतिष्ठानच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त हिराचंद नेमचंद वाचनालय आणि श्रीराम पुजारी प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाची सुरुवात शुक्रवारी श्रीराम पुजारी यांच्या जीवनावर आधारित चित्रफितीच्या उद्‌घाटनाने झाली. त्यानंतर 'माझ्या आठवणीतले पुजारी सर' याविषयी आठवणी सांगताना सुशीलकुमार शिंदे बोलत होते. यात प्रसिद्ध दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल, लेखक अच्युत गोडबोले यांचा सहभाग होता. लोकमान्य टिळक सभागृहात जन्मशताब्दी वर्षपूर्ती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुशीलकुमार शिंदे पुढे म्हणाले, माझा व पुजारी सरांचा संपर्क मी संगमेश्वर कॉलेजमध्ये शिकत असताना आला. माझ्या अशुद्ध वाणीवर सरांनी कधीही टीका केली नाही; परंतु त्याविषयी मला प्रेमाने समजावून सांगितले व माझी भाषा शुद्ध केली. दबलेल्या वर्गातील मुलांना मदतीचा हात पुढे करणारे ते उत्तम व्यक्ती व शिक्षक होते.या प्रसंगी श्रीराम पुजारी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. प्रकाश जोशी, कार्याध्यक्ष डॉ. नवनीत तोष्णिवाल, सचिव ललिता दातार, कोषाध्यक्ष किरण जोशी, हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर, प्रा. केशव शिंदे, प्रा. सुलभा पिशवीकर, प्रा. पुष्पा आगरकर, डॉ. श्रीकांत कामतकर उपस्थित होते.स्वागतपर प्रास्ताविक डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले. पुजारी प्रतिष्ठान आणि हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या उपक्रमांची माहिती दिली. मान्यवरांचे स्वागत डॉ. नवनीत तोष्णिवाल, डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. विद्याधर बोराडे यांनी केले. मंजुषा गाडगीळ यांनी सूत्रसंचालन केले तर आभार ललिता दातार यांनी मानले.

### गुण बंडखोरीचा पण वागण्यात पारदर्शीपणा : डॉ. जब्बार पटेल

डॉ. जब्बार पटेल म्हणाले, सुमारे चार वर्षे मी सरांच्या घरातच वाढलो. त्या काळात सरांनी आम्हा विद्यार्थ्यांना नवकवितेची ओळख करून दिली आणि साहित्य व संस्कृतीचे भान जागृत केले. जाती–पातीचे बंधन न पाळता सर आणि बाईंनी माझ्यावर पोटच्या मुलापेक्षाही अधिक प्रेम केले. सरांमध्ये बंडखोरीचा गुण होता तसेच त्यांच्या वागण्यात अत्यंत पारदर्शीपणा देखील होता. संस्कार देण्याबरोबरच संस्कार देणाऱ्या व्यक्तींचा परिचय मला पुजारी सरांमुळेच झाला.

### कलेवर प्रेम करत जगण्याचा वस्तुपाठ म्हणजे पुजारी सर : अच्युत गोडबोले

अच्युत गोडबोले म्हणाले, पुजारी सर आमच्या घरी आले आणि आमच्या कुटुंबाचा भागच बनले. त्यांनी मला पुस्तकी शिक्षण दिले नाही तरी कलेवर प्रेम करण्याचे संस्कार त्यांच्याकडूनच मिळाले. ते मुला गुरुस्थानी होते. सरांमुळेच अनेक दिग्गज कलाकारांचे पाय आमच्या घराला लागले. आयुष्याचा रस घेत कसे जगायचे हे मी सरांकडूनच शिकलो. कलेवर प्रेम करत कसं जगावं याचा वस्तुपाठ म्हणजेच पुजारी सर होत.

(DTE CODE : 6265)
S.A.P.D. Jain Pathashala Trust, Solapur
WALCHAND INSTITUTE OF TECHNOLOGY Estd.: 1983
Legacy 40 YEARS
(AN AUTONOMOUS INSTITUTE)



NAAC A+ — Accredited with A+ Grade by National Assessment and Accreditation Council, Bangalore
NBA — All Eligible UG Programs Accredited by National Board of Accreditaion, New Delhi
Ashok Chowk, Solapur- 413 006 (Maharashtra) | Phone No.: (0217) 2652700, 2653040
▪ admissions@witsolapur.org ▪ www.witsolapur.org
B. Tech. Admissions 2025-26
Students' Start up Avyuktam Innovation Pvt. Ltd. won 1st prize (Rs .25 Lakhs) at India's 1st International Agri-Tech Innovation Challenge – Pune Agri Hackathon 2025, in collaboration with Maharashtra State Innovation Society.
SIH 2024 — 03 Winners at SIH2024, 02 Software and 01 Hardware Edition, National Level Innovation Initiative AICTE, Prizes worth Rs 1.5 Lakh
Principal Dr V. A. Athavale recipient of International Luminary Award-2024 Leadership' by Institute of Industry and Academic Research, Philippines; Principal of the Year for Institutional Excellence at The 7th Higher Education Innovation and Technology Summit and Awards 2025!
aws educate Member Institution — Students Recipient of Google Udacity Scholarships
TECHATHON WINNER — Received Prize worth Rs 1.0Lakh
MoU with Danfoss — Collaborative Project | Internship | Training
Incubation Center — TEKDI — Incubation and Software Development Center at WIT

Placement in MNCs is our Top Priority
Companies Visiting for Placements: 80+
Placements in the Consecutive Years: 90%+
Unique Placement Offers: 276+
Total Placement Offers: 302+*
WIT- Where Packages Peak! (*indicates in progress)

B.Tech. Programmes

| Choice Code | Course Name | Intake |
|---|---|---|
| 626524210 | Computer Science and Engineering | 180 |
| 626524610 | Information Technology | 120 |
| 626592110 | Artificial Intelligence and Machine Learning | 60 |
| 626584410 | Electronics and Computer Engineering | 60 |
| 626537210 | Electronics and Telecommunication Engineering | 120 |
| 626561510 | Mechanical and Automation Engineering | 60 |
| 626519110 | Civil Engineering | 60 |

Soham Ads
Counselling & Admission : 7588 57 11 00 | 7588 58 11 00

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अग्रलेख...

# गोंधळींना धडा शिकवलाच पाहिजे

संसदेचे पावसाळी अधिवेशन अपेक्षा आणि लौकिकाप्रमाणे वादळी ठरत आहे. विरोधकांच्या गदारोळाच्या पावसात या अधिवेशनाचा पहिला आठवडा वाहून गेला. आता किमान दुसऱ्या आठवड्यापासून तरी अधिवेशनाचे कामकाज सुरळीत चालले पाहिजे, अशी देशातील जनतेची स्वाभाविक अपेक्षा आहे. या अपेक्षेला विरोधी पक्ष उतरतो की नाही, ते पुढील आठवड्यातच समजू शकेल. पहिल्या दिवशी अधिवेशनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी संसद भवनात आले असता विरोधकांच्या सर्व मुद्यांवर चर्चा करायला सरकार तयार असल्याचा निर्वाळा त्यांनी दिला होता. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला बोलावण्यात आलेल्या सर्वपक्षीय बैठकीतही सरकारने चर्चेची आपली भूमिका स्पष्ट केली. तरी विरोधकांनी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच गोंधळ घालायला सुरुवात केली. मुळात विरोधकांना काय हवे ते समजत नाही. पहलगाम येथील अतिरेकी हल्ला तसेच त्यानंतरचे ऑपरेशन सिंदूर यावरून विरोधकांनी विशेषतः काँग्रेस पक्षाने सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे. ऑपरेशन सिंदूरवरून अनेक प्रश्न विरोधक उपस्थित करत आहे. सरकारने ऑपरेशन सिंदूरवर दोन्ही सभागृहांत चर्चेची तयारी दर्शवली आहे. मोदी सरकारजवळ लपवण्यासारखे काही नाही, त्यामुळे विरोधक उपस्थित करत असलेल्या कोणत्याही मुद्यावर सरकार चर्चेस तयार असल्याचे दिसते. प्रश्न हा आहे की, विरोधक खरोखरच चर्चेस तयार आहे की त्यांना संसदेच्या दोन्ही सभागृहांत नुसता गोंधळ घालायचा आहे?

संसद हे भारतीय लोकशाहीचे सर्वोच्च मंदिर आहे. कोणत्याही मंदिरात जाताना आपण जसे वागत असतो, तसेच लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरात पाय ठेवतानाही आपली भूमिका अशीच असली पाहिजे. मंदिरात जाताना सर्व जण मंदिराचे पावित्र्य जपण्याचा प्रयत्न करतात. आपल्याकडून अनवधानानेही मंदिराचे पावित्र्य भंग होणार नाही, याची काळजी सर्व घेत असतात. तशीच भूमिका संसदेतही सर्व राजकीय पक्षांनी विशेषतः विरोधी पक्षांच्या खासदारांनी ठेवली पाहिजे. दोन्ही सभागृहांचे कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधक घोषणाबाजी सुरू करतात, पोस्टर्स फडकवतात, एवढेच नाही तर सरकारी कागदपत्राचे तुकडे करत अध्यक्षांच्या आसनाच्या दिशेने भिरकावतात. वर्गात शिक्षक नसताना विद्यार्थी जसा गोंधळ घालतात, वर्ग डोक्यावर घेतात, तशीच काहीशी वागणूक संसदेत विरोधकांची असते. फरक इतकाच की विद्यार्थी वर्गात शिक्षक नसताना गोंधळ घालतात आणि विरोधक आसनावर अध्यक्ष वा सभापती विराजमान असताना गोंधळ घालतात. हा प्रकार विरोधकांना विशेषतः काँग्रेसच्या सदस्यांना शोभणारा नाही. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी याबाबत नुकतेच सदस्यांचे कान टोचले आहेत. पण विरोधकांची कृती पालथ्या घड्यावर पाण्यासारखी असते. संसदेचे कामकाज सुरळीत चालवणे ही सरकारची जबाबदारी आहे, यात शंका नाही. पण ज्याप्रमाणे टाळी एका हाताने वाजू शकत नाही, त्याप्रमाणे विरोधकांच्या सहकार्याशिवाय सरकारही संसदेचे कामकाज सुरळीत चालवू शकत नाही. ग्रामीण भाषेत सांगायचे तर लोकशाहीच्या गाड्याचे सरकार आणि विरोधी पक्ष ही दोन चाके आहेत. त्यामुळे संसदेचे कामकाज सुरळीत चालवण्याचा सरकारने आपल्या परीने कितीही प्रयत्न केला तरी विरोधकांनी मदतीचा आणि सहकार्याचा हात समोर केल्याशिवाय ते शक्य नाही. बरं ज्या मुद्यांवर विरोधक गोंधळ घालतात, ते मुद्दे तरी महत्त्वाचे असतात का? तर त्याचेही उत्तर नकारार्थी असते. भाजपही विरोधी पक्षात असताना असाच गोंधळ घालत होता. सभागृहाचे कामकाज ठप्प पाडत होता, असा आरोप आपल्या गोंधळाचे समर्थन करताना विरोधी पक्ष करतात. पण भाजप सदस्य त्यावेळी सरकारमधील मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराच्या मुद्यावरून सभागृह डोक्यावर घेत होते, कामकाज ठप्प पाडत होते. त्यामुळे या दोन गोंधळामध्ये गुणात्मक फरक आहे.

जो प्रकार संसदेत होतो, तोच राज्यांच्या विधानमंडळातील दोन्ही सभागृहांत म्हणजे विधानसभा आणि विधान परिषदेतही होत असतो. बिहार आणि उत्तरप्रदेश विधानसभेत तर सत्ताधारी आणि विरोधी सदस्यांमध्ये हाणामाऱ्याही झाल्या आहेत. त्या पृष्ठभूमीवर संसदेत अजून हाणामाऱ्या झाल्या नाहीत, याबद्दल समाधान व्यक्त करायला हरकत नाही. मात्र आपल्या अनेक लोकप्रतिनिधींची सध्याची वर्तणूक पाहता तो दिवस फारसा दूर नाही, असे वाटते. तामिळनाडू विधानसभेत काही वर्षांपूर्वी द्रमुकच्या सदस्यांनी अण्णाद्रमुकच्या जयललिता यांच्यावर हल्ला करण्याचा, त्यांची साडी ओढण्याचाही प्रयत्न केला होता, असे म्हणतात. आज कोणत्याही लोकनिर्वाचित सभागृहाची स्थिती यापेक्षा वेगळी नाही. अगदी ग्रामपंचायतीपासून नगर परिषदेची बैठक असो, जिल्हा परिषदेची बैठक असो की महानगर पालिकेची, या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बैठकीत गोंधळ हा आवश्यक असतो.आजकाळ गोंधळ आणि गदारोळ झाल्याशिवाय विधिमंडळाचे आणि संसदेचे कामकाज झाल्यासारखे वाटतच नाही. जगातील अनेक देशांच्या संसदेत तर हाणामाऱ्या होत असतात. आपल्या संसदेत अजून तसा प्रकार होत नाही, ही समाधानाची बाब म्हटली पाहिजे. मुळात आपल्याला जनतेने त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी, त्यांच्या प्रश्नांना आणि समस्यांना वाचा फोडण्यासाठी निवडून दिले आहे, याचा सर्वच राजकीय पक्षांच्या विशेषतः विरोधी पक्षांच्या सदस्यांना विसर पडल्यासारखा वाटतो. आपल्याला सभागृहात गोंधळ घालण्यासाठी, गुंडागर्दी करण्यासाठीच निवडून दिले, असा विरोधी पक्षांच्या सदस्यांनी समज करून घेतला आहे की काय, अशी शंका येते. गेल्या दहा-वीस वर्षांत हा प्रकार नियमित झाल्यासारखा दिसतो. त्याआधी राज्यांची विधानसभा असो की देशाची संसद या ठिकाणी अभ्यासपूर्ण भाषणे आणि चर्चा व्हायच्या. काही काही विरोधी पक्षनेत्यांची भाषणे ऐकायला मुख्यमंत्री आणि अगदी पंतप्रधानही तेव्हा सभागृहात उपस्थित राहत. तेव्हा सत्ताधारी पक्ष असो की विरोधी पक्ष, दोघेही समाजाचा आणि देशाचा हिताचा विचार करायचे. देशातील गोरगरीब जनतेच्या कल्याणासाठी आपण निवडून आलो, त्यामुळे या जनतेला न्याय मिळवून देण्याची अशीच सर्वांची भूमिका असायची. पण आता मात्र विरोधकांनी ताळतंत्र सोडला, असे अतिशय नाईलाजाने म्हणावेसे वाटते. विरोधकांची वागणूक ही कंबरेचे सोडून डोक्याला गुंडाळण्यासारखी झाली आहे. जनतेच्या एखाद्या मूलभूत प्रश्नासाठी, समस्येसाठी, जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी वा समाजाच्या आणि देशाच्या व्यापक हितासाठी विरोधकांनी सभागृहात गोंधळ घातला, तर एकवेळ ते क्षम्य समजता येईल, पण आज विरोधक स्वतःच्या किरकोळ राजकीय फायद्यासाठी गोंधळ घालत असतात. आपण सरकारचे विरोधक आहे, देशातील जनतेचे, पर्यायाने समाजाचे आणि देशाचे विरोधक नाही, याचे भान विरोधी पक्षांनी ठेवले पाहिजे. सरकार आणि विरोधी पक्ष हे लोकशाहीरूपी नाण्याच्या दोन बाजू आहेत. लोकशाहीत विरोधी पक्ष आवश्यक असतो. विरोधी पक्षांशिवाय लोकशाहीची कल्पनाही आपण करू शकत नाही. सरकारवर अंकुश ठेवण्यासाठी विरोधी पक्ष आवश्यक असतो. जसे एखाद्या हत्तीला नियंत्रित करण्याचे काम अंकुशाच्या माध्यमातून त्यावरील माहूत करत असतो, तशीच भूमिका लोकशाहीत विरोधी पक्षांकडून अपेक्षित असते. सरकार चुकत असेल वा जनतेच्या हिताच्या विरोधात निर्णय घेत असेल तर सरकारला वठणीवर आणायचे काम विरोधी पक्षांचे असते. पण विरोधी पक्ष म्हणून आपण सरकारच्या प्रत्येक गोष्टीला विरोध करणे, मग तो निर्णय जनहिताचा असला तरी त्याला विरोध करणे विरोधी पक्षांकडून अपेक्षित नाही. चुकीचे वागणाऱ्या लोकप्रतिनिधीला परत बोलावण्याचा अधिकार मतदारांना असला पाहिजे, अशी मागणी काही वर्षांपूर्वी केली जात होती. आज संसदेतील विरोधी पक्षांची बेताल वागणूक पाहून असा कायदा करण्याची वेळ आली आहे, असे वाटू लागले आहे. सरकारला वठणीवर आणण्याची जबाबदारी विरोधी पक्षांची असते, असे म्हणतात. पण सध्या दिशाहीन विरोधकांना वठणीवर आणण्याची जबाबदारी जनतेची आहे. जनतेने बेताल आणि मर्यादा सोडून वागणाऱ्या विरोधी पक्षांच्या सदस्यांवर चाबूक उगारण्याची वेळ आली आहे.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# पुरोगामी आहेत कुठे?

आपल्याकडच्या तथाकथित छद्म पुरोगामी मंडळींचे एक बरे असते, खोट्याला सत्य म्हणत ते बेंबीच्या देठापासून ओरडत असतात. मात्र सत्य परिस्थितीबाबत ते सराईतपणे मौन बाळगून असतात. सरडा आणि लांडगा या प्राण्यांना लाज वाटेल इतक्या सहजपणे ते रंग बदलू आणि लबाड असतात. या मंडळींनी भारतातल्या मूळ शत्रूकडे दुर्लक्ष करत हिंदू समाजाला सर्वांचा शत्रू म्हणून प्रस्तुत केले आणि त्यात त्यांना बऱ्यापैकी यशही मिळाले. म्हणजे हिंदू विरुद्ध बौद्ध, हिंदू विरुद्ध आंबेडकरी समाज, हिंदू विरुद्ध जनजाती, हिंदू विरुद्ध द्रविड, हिंदू विरुद्ध मूळ निवासी, हिंदू विरुद्ध आदिवासी, हिंदू विरुद्ध मराठी-तमिळ-कन्नड भाषिक इत्यादी इत्यादी इत्यादी... अशा विविध प्रकारे खोटा प्रचार करून हिंदू समाजाला बदनाम केले. भारतात बौद्ध धम्माला उतरती कळा लागली याबाबत बोलताना हे म्हणतात की हिंदूंनी बौद्धांवर अत्याचार केले. मुळात हिंदुस्थानात अनेक पंथ गुण्यागोविंदाने नांदले, वाढले. इतकेच काय बाहेरून आलेली इस्लामी आणि ख्रिस्ती संस्कृती देखील या मातीने पोसली. बुद्ध की कृष्ण असा वाद निर्माण करून यांनी द्वेष पसरवण्याचं काम केले. पण सत्य परिस्थिती अशी आहे की इथे बुद्ध आणि कृष्ण हातात हात घालून फिरतात. अंतर्गत शत्रूशी लढायचे असेल तर बुद्ध आणि बाह्य शत्रूशी दोन हात करायचे असतील तर कृष्ण ही सर्वसामान्य जाणीव भारतीय जनतेला आहे. पण जनतेच्या मनात गोंधळ माजवण्याचं काम या छद्म पुरोगाम्यांनी केलेले आहे. मात्र अफगाणी लोकांनी आणि चिनी लोकांनी बौद्ध धर्मीयांवर केलेल्या अत्याचाराबाबत हे मौन बाळगतात. कारण अफगाण म्हणजे यांचे लाडके भाई आणि चिनी म्हणजे यांचे भाऊबंद कम्युनिस्ट. मग आपल्याच नातेवाईकांबद्दल ते का बरे बोलतील?

इतिहास सोडा, पण तिबेटमध्ये सध्या काय सुरू आहे? आणि इतके सगळे सुरू असताना इतना सन्नाटा क्यों छाया हैं भाई? इतकी शांतता का आहे? चीनच्या तिबेट स्वायत्त क्षेत्रातील ड्रेगको काऊंटी, कारझे तिबेटी स्वायत्त प्रांतात चिनी अधिकाऱ्यांनी सुमारे ३०० बौद्ध स्तूप आणि भगवान गौतम बुद्ध, गुरू पद्मसंभव आणि खेंपो जिग्मे फुंट्सोक यांचे पुतळे नष्ट केल्याचा दावा करण्यात येत आहे. चिनी फौजांनी मध्यम आकाराच्या शेकडो स्तुपांबरोबरच तीन मोठे स्तूप जमीनदोस्त केले. याशिवाय, त्यांनी सेरथार बौद्ध संस्थेचे संस्थापक आणि पूज्य अभट खेंपो जिग्मे फुंट्सोक यांची नव्याने उभारलेली मूर्ती आणि गुरू पद्मसंभव यांची पवित्र मूर्तीही तोडली. या विध्वंसानंतर, संपूर्ण परिसर सील करून कोणालाही प्रवेश व निर्गमनास परवानगी नाकारण्यात आली. घटनेबाबत बाहेरील जगाशी माहिती शेअर करणाऱ्या व्यक्तींना ''राज्यगोपनीयता उल्लंघन''च्या आरोपाखाली तत्काळ अटक केली जात आहे. चिनी अधिकाऱ्यांनी स्तूप ''सरकारी जमिनीवर'' आणि ''नियमांचे उल्लंघन करून'' बांधण्यात आले असल्याचे कारण सांगितले आहे. सर्व धार्मिक अवशेष हटवून त्या पवित्र जागेचे अस्तित्वच मिटवले गेले आहे. ही माहिती आपल्याला ''तिबेट डॉट नेट''या ऑनलाईन चॅनलवर पाहायला मिळेल. काही भारतीय मीडियाने या बातमीला दुजोरा दिला आहे. मात्र अपवाद वगळता सगळेच चिडिचुप्प आहेत. खरं तर एका प्राचीन संस्कृतीचा हा योजनाबद्ध नाश करण्याचा डाव सुरू आहे.

यापूर्वी २०२१ मध्येही तिबेटमधील ९९ फूट उंच बुद्ध पुतळा नष्ट केल्याचा दावा एका एक्स पोस्टमध्ये केला गेला होता, ज्यामध्ये स्थानिक भिक्खूंना हे पाहण्यास भाग पाडल्याचे म्हटले आहे. या कारवायांना चिनी कम्युनिस्ट पार्टीच्या धार्मिक आणि सांस्कृतिक नियंत्रण धोरणांचा भाग मानले जात आहे. या धोरणाचा उद्देश तिबेटी संस्कृती आणि बौद्ध धर्माचा प्रभाव कमी करणे असा आहे. काही अहवालांनुसार, तिबेटमधील बौद्ध भिक्खूंवर कठोर निर्बंध लादले जात आहेत. यामध्ये त्यांच्या धार्मिक प्रथांवर बंदी, मठांवर नियंत्रण आणि काही प्रकरणांमध्ये हिंसाचार किंवा अटक यांचा समावेश आहे. ज्यांनी सरकारच्या धोरणाचा विरोध केला त्यांच्यावर खोटे आरोप लावून अटक केली जात आहे. काही जण बेपत्ता झालेत तर काहींच्या गुप्त हत्येचा संशय आहे. नवीन नियमांनुसार, कोणताही धार्मिक नेता स्वतंत्रपणे धार्मिक क्रिया करू शकत नाही. अनेक मठांमध्ये एका वेळी पाचाहून अधिक भिक्खूंना एकत्र प्रवास करण्यास मनाई आहे, विशेषतः दलाई लामांच्या ९०व्या वाढदिवसाच्या निमित्ताने जुलै महिन्यात सार्वजनिक समारंभांवर बंदी होती, अशी माहिती मिळत आहे.

चिनी प्रशासनाने घातलेल्या पूर्ण संप्रेषण बहिष्कारामुळे या घटनांविषयी सखोल माहिती मिळवणे अत्यंत कठीण झाले आहे. ही एक योजनाबद्ध मोहीम आहे, ज्याद्वारे तिबेटी धार्मिक आणि सांस्कृतिक अस्मिता नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा दावा करण्यात येत आहे. दोन कट्टर धार्मिक पंथांनी आणि ईश्वर नाकारणाऱ्या कम्युनिस्टांनी जगाचा प्रचंड विध्वंस केला आहे. दोन कट्टर धार्मिक पंथ हा देखील साम्यवादाचा धार्मिक प्रकार आहे. सगळे आमच्यासारखेच हवे, हा अट्टहास आहे. आमचा देवच खरा, आमचा धर्मच खरा. तसेच कम्युनिस्ट म्हणतात आम्हीच खरे. या अट्टहासापोटी जगातल्या अनेक संस्कृती नष्ट झाल्या. आता जगात हिंदू, बौद्ध, ज्यू अशा प्राचीन संस्कृती अस्तित्वात आहेत. या प्राचीन संस्कृतीच्या मुळावर कट्टरतावादी उठले आहेत. तिबेटमधून बुद्ध धम्म नामशेष करण्याचा दाव रचला जात असताना हे छद्म पुरोगामी कोणत्या वाळूत डोके खुपसून बसले आहेत? त्यांनी वाळूतून डोके बाहेर काढावे आणि नेहमीप्रमाणे बेंबीच्या देठापासून बोंबलावे. खरे तर भारतासह इतर देशांनीही विशेषतः बौद्ध देशांनी यात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता आहे. कारण शांतीचा संदेश देणारा बुद्ध धम्म टिकला पाहिजे. स्वा. सावरकरांच्या ''संन्यस्थ खडग्'' या नाटकाच्या संदेशाप्रमाणे सज्जनांनी समरस होऊन ''शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे शास्त्र चिंता प्रवर्तते'' हे धोरण आत्मसात करावे लागणार आहे.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# ऐतिहासिक किल्ल्यांचे संवर्धन आवश्यक

आपली ऐतिहासिक धरोहर असलेल्या वास्तू, गड, किल्ल्यांचे संवर्धन, संरक्षण झाले पाहिजे, असे आपण म्हणतो. पण, प्रत्यक्षात तसे होताना दिसत नाही. या कामाकडे लक्ष देण्यासाठी सरकारने पुरातत्त्व विभागाची निर्मिती केली होती. पण, या विभागाचे गड, किल्ल्यांच्या देखभाल, दुरुस्तीकडे हवे तेवढे लक्ष नसल्यासे दिसून येते. हे आठवण्याचे कारण म्हणजे गुरुवारी बाळापूर येथील मन आणि महिषी या नद्यांच्या संगमावर असलेल्या एका बेटासारख्या भूभागावर असलेल्या पुरातन किल्ल्याचा बुरुज ढासळला. अनेक वर्षांपासून हा किल्ला शिकस्त झाला आहे. पुरातत्त्व विभागाने या किल्ल्याची थोडीफार डागडुजी केली होती. त्यानंतर मात्र त्याकडे या विभागाने फारसे लक्ष दिले नसल्याने हा बुरुज ढासळल्याची सर्वत्र चर्चा आहे.

खरे म्हणजे पुरातत्त्व विभागाने अशा गड, किल्ल्यांची नियमित पाहणी करणे, त्याची डागडुजी करणे, शिकस्त झालेल्या किल्ल्यांच्या आसपास वास्तव्यास असलेल्या नागरिकांना संभाव्य धोक्याची सूचना देणे इत्यादी कामे करणे अपेक्षितच आहेत. असे गड, किल्ले व ऐतिहासिक वास्तू अकोला, बुलढाणा व वाशीम जिल्ह्यात म्हणजे वऱ्हाडत आहेत. मात्र, पुरातत्त्व विभागाचे याकडे कितपत लक्ष आहे ते त्यांनाच ठावूक. खामगाव येथे शिवाजी वेस आहे. पूर्वीच्या काळी असलेल्या खामगावला परकोट होता. त्याला दोन प्रवेशद्वार होते. त्याला आता शिवाजी वेस, असे नाव देण्यात आले आहे. या ऐतिहासिक प्रवेशद्वारांची देखभाल व दुरुस्ती पुरातत्त्व विभागाने करणे अपेक्षित आहे. खामगाव तालुक्यात गोंधनापूर येथे नागपूरच्या भोसलेंच्या चिटणीसांनी बांधलेला किल्ला आहे. अकोला येथे असगढ नावा किल्ला आहे. त्याची देखील आज दुरवस्था झाली आहे. या किल्ल्याला परकोट होता. त्याला दहीहांडा वेस, बाळापूर वेस, अगरवेस आणि गंजवेस असे चार प्रवेशद्वार होते. किल्ल्यांच्या संरक्षणाच्यादृष्टीने तीन बुरुज होते. त्यांना गंज बुरुज, अगरवेस बुरुज आणि असद बुरुज असे म्हटले जात होते. सध्या हा किल्ला पूर्णतः ध्वस्त झाला आहे. किल्ल्यापासून काही अंतररावर अगरवेस आहे. त्यातून लोक येणे जाणे करतात. अकोला नगर परिषदेने या किल्ल्यावर हुतात्म्यांचे स्मारक उभारून बगीचा तयार केला होता. त्याला आझाद पार्क, असे नाव देण्यात आले. पण, आज या हुतात्मा स्मारकाची निगा राखली जात नाही. या परिसरात वास्तव्यास असलेले लोक किंवा शहरातील काही उपद्रवखोर या बगिच्याचा उपयोग अवैध धंद्यासाठी करतात. अशीच स्थिती अकोट तालुक्यातील नरनाळा किल्ल्याची आहे. वाशीम येथील माहूर वेस, कारंज लाड येथील वेस, मेहकर येथील कंचनीचा महाल, लोणार येथील खाऱ्या पाण्याच्या सरोवराशिवाय असलेली हेमाडपंथी मंदिरे, अन्नछत्रालय या ऐतिहासिक व पुरातन वास्तूंकडे लक्ष देण्याची गरज आहे. या किल्ल्यांचे देखील जतन व संवर्धन होणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे राजस्थान सरकारने ऐतिहासिक गड, किल्ल्यांचे जतन, संवर्धन केले, त्याप्रमाणे महाराष्ट्र सरकार देखील करू शकते. तेव्हा, पुरातत्त्व विभागाने याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. या ऐतिहासिक वास्तूंचा अभ्यास करण्यासाठी देश-विदेशातील पर्यटक व अभ्यासक येथे येतात. भारतातील स्थापत्य कला किती प्रगत होती हे या वास्तूंवर दिसून येते. वेरूळ व अजिंठा लेणींचे ज्याप्रमाणे आपण राष्ट्रीय धरोहर म्हणून जतन केले त्याचप्रमाणे वऱ्हाडातील या ऐतिहासिक वास्तूंचे जतन व संवर्धन होणे आवश्यक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास शिकविताना नव्या पिढीला आपण त्यांनी बांधलेल्या गड, किल्ल्यांविषयी सांगतो. पण, किल्ला कसा असतो, हे त्या चिमुकल्याने विचारल्यावर आपण निरुत्तर होतो. त्यांना दाखविण्यासाठी आपल्या परिसरात किल्ले असूनही आपण त्यांना तेथे नेऊन ते दाखवू शकत नाही. बाळापूरच्या किल्ल्याचा बुरुज ढासळल्यावर अकोल्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी राज्याच्या पर्यटन मंत्रालयाशी संपर्क साधून किल्ला परिसरातीलच श्री बालादेवी मंदिर परिसरातील पडलेली भिंत बांधण्याबाबत योग्य दखल घेण्यास संबंधितांना सांगितले. तर, खासदार अनुप धोत्रे यांनी देखील केंद्रीय पर्यटन मंत्रालयाशी संपर्क साधून किल्ल्याचा बुरुज ढासळल्याची माहिती दिली. तसेच, पुरातत्त्व विभागाने वऱ्हाडच नव्हे तर, महाराष्ट्रातील अशा लहान शहर, गावातील पुरातन वास्तू, गड, किल्ल्यांची माहिती घेऊन त्यांची देखभाल व दुरुस्ती तातडीने करावी. त्यासाठी त्यांच्याकडे निधी नसल्यास त्याबाबतचे निदान प्रस्ताव तरी शासनाकडे पाठवावे. कारण, या ऐतिहासिक वास्तूंमुळे आपल्याला प्रेरणा मिळून राष्ट्राभिमान व राष्ट्रभक्ती चेतविण्यास मदत होते. अकोल्याच्या पालकमंत्र्यांनी देखील याचा पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त करावीशी वाटते.

८८०६००६१४९

## प्रासंगिक

**कर्नल अभय बाळकृष्ण पटवर्धन (निवृत्त)**

# कारगिल युद्धातील पहिला हुतात्मा

शनिवार, २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस आहे. त्या युद्धात, ओठावरचे दूधही न वाळलेला, नीट मिसरूडही न फुटलेला एक तरुण सेनाधिकारी आणि त्याच्या बरोबरचे पाच सैनिक युद्ध सुरू होण्याआधीच पाकिस्तानच्या कुटिल कारस्थानाला बळी पडले. चक्रव्यूहात अडकलेल्या महाभारतातील अभिमन्यूसारखीच त्या सर्वांची अवस्था झाली, ते चक्रव्यूहात तर गेलेत पण जिवंत बाहेर पडू शकले नाहीत त्याची ही आँखोदेखी कहाणी सर्व कारगिल योद्ध्यांना अर्पण.

कारगिल युद्ध सुरू व्हायच्या २० दिवस आधी, कारगिल पर्वतराजींवर आपल्या मेंढ्या चरायला घेऊन गेलेले मेंढपाळ खाली उतरत असताना त्यांना तेथे काही माणसे पठाणी वेषात दिसली. यावेळी, याठिकाणी ही माणसे कशी ही शंका आलेल्या त्या मेंढपाळांनी ही गोष्ट खाली उतरल्यावर असलेल्या पोस्ट कमांडरच्या कानी घातली. यथावकाश ती स्थानिक सैनिकी मुख्यालयापर्यंत पोहोचली. ही बातमी मिळाल्यावर तेथे झालेल्या तथाकथित पाक सैनिकी घुसखोरीची शहानिशा करण्यासाठी गेलेले, माझ्या जाट रेजिमेंटचे कॅप्टन सौरभ कालिया हे कारगिल युद्धातील पहिले हुतात्मा होते. घुसखोरीची माहिती मिळाल्यावर त्यांना या बातमीची शहानिशा करण्यासाठी पाठवण्यात आले. त्यानुसार, जेमतेम तेरा चौदा महिन्यांची सर्व्हिस झालेले कॅप्टन सौरभ कालिया आपल्या पाच साथीदारांसह बजरंग पोस्टवर गेले.

१९७३ मधील शस्त्रसंधीनंतर मागील २६ वर्ष त्या क्षेत्रात अशी पाक सैनिकी घुसखोरीची घटना कधीही झाली नव्हती. पण आता; पूर्व पाकिस्तानमधील लाजिरवाण्या पराभवचे भळभळणारे शल्य शमवण्यासाठी सदैव धडपड करणारे जनरल परवेझ मुशर्रफ, पाक आर्मी चीफ झाले होते. त्यांनीच या ऑपरेशनची आखणी करून ते राबवले. पण भारतीय सेनेला याची कल्पना नसल्यामुळे, कॅप्टन सौरभच्या लीडरशिपमधे पाठवण्यात आलेल हे एक रूटीन पेट्रोल होत. जेमतेम एक वर्षाची सर्व्हिस झालेल्या सौरभला परिस्थितीच्या गांभीर्याची जाणीव होऊ शकली/झाली नाही. ते सर्व बजरंग पोस्टवर पोहोचल्यावर तेथे लपून बसलेल्या पाक सैनिकांनी, आश्चर्यचकित झालेल्या या असावध पेट्रोलला त्वरित घेरा घालून पकडले आणि पुढील २० दिवस ओलिस ठेवले. त्यानंतर त्यांच्या साथीदारांसारखेच विद्रूप झालेले त्यांचे कलेवर भारतीय सेनेच्या ताब्यात देण्यात आले. हे पाकिस्तानी सेनेची अश्लाघ्य क्रूर मनोवृत्ती आणि अत्यंत चिथावणीखोर कृती उजागर करणारे, जिनेव्हा करारानुसार युद्ध गुन्हा असलेले, एक लाजिरवाणे कृत्य होते.



कॅप्टन सौरभ कालियाचा जन्म पालमपूर, कांगडा येथील डॉ. एन. के. कालिया यांच्या घरी झाला होता. त्यांना डिसेंबर १९९८ मध्ये ४ जाट रेजिमेंटमधे नियुक्ती (कमिशन) मिळाल्यानंतर अवघ्या दोन महिन्यांतच कारगिलमधे पोस्टिंग मिळाली. काकसर परिसरात घुसखोरीची माहिती घेण्यासाठी त्यांच्या पेट्रोलला, १४,००० फूट उंचीवरील बजरंग पोस्टवर पाठवण्यात आले. परत देण्यात आलेल्या सर्व कलेवरांच्या अंगावर विकृत छळाच्या निर्घृण खुणा होत्या. सर्व कलेवर सिगारेटच्या चटक्यांनी भरली होती. त्यांची जीभ हासडून, डोळे काढून, गुप्तांग कापून, त्यांच्या बॉडी बॅगमधे भरण्यात आली होती. मानवी बर्बरतेचा हा शहारे आणणारा भयानक नमुना होता. सौरभ माझ्याच रेजिमेंटचा असल्यामुळे मी त्याच्या कुटुंबाला भेटून सांत्वन करू शकलो. त्यांच्याशी संवाद साधताना साहजिकपणे डोळे पाणावले होते. त्यांच्यानुसार कारगिल विजय दिवस; देशाचे खरे हिरो असणारे सैनिक आणि अधिकाऱ्यांचे शौर्य, धैर्य आणि बलिदानाबद्दल अभिमानाचा आहे. आपल्या प्राणांची पर्वा न करता, प्रसंगी आपली आहुती देऊन त्यांनी या क्षेत्रातील सर्व उंच चौक्यांवर पुन्हा नियंत्रण मिळवले होते. प्रचंड उंच पर्वत आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत लढलेल्या सर्वांत कठीण लढायांमधील शौर्याबद्दल भारतीय सेनेचे अभिनंदन, कौतुक आणि जयघोष करावा तेवढा कमीच आहे. या हुतात्म्यांना अभिवादन करताना त्यात माझा शूर मुलगा सौरभ होता याचा मला अभिमानही आहे आणि तो गेल्याचे दुखःही. ही एक संमिश्र भावना आहे. सौरभच्या आईने त्याच्या खूप प्रेमळ आणि हृदयस्पर्शी आठवणी आपल्या मनात साठवून ठेवल्या आहेत. त्यांच्यानुसार सौरभ; एक शांत, अदम्य आत्मा आणि लक्ष केंद्रित, देशभक्तीच्या भावनेने परिपूर्ण व्यक्तिमत्त्व होते. तो त्याच्या २१ व्या वर्षी, लष्करी कारकीर्दीच्या अगदी सुरुवातीलाच हुतात्मा झाला याचे त्यांना वाईट वाटते पण, एका खऱ्या सैनिकाप्रमाणे त्याने देशासाठी दिलेल्या सर्वोच्च बलिदानाचा त्यांना (व मलाही) खूप अभिमान आहे. त्या पुढे म्हणतात, ३० एप्रिलला कॅप्टन सौरभ कालियाने त्याचा धाकटा भाऊ वैभव कालियाला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी फोन केला. ती त्याची शेवटची आठवण आहे. त्याच वेळी मी ३० जूनला माझ्या वाढदिवसासाठी घरी येईन असेही त्याने सांगितले होते. तो घरी आला, पण राष्ट्रीय तिरंग्यात गुंडाळलेल्या अवस्थेत. पाकिस्तानी सेनेने सौरभ व त्याच्या साथीदारांना दिलेली वागणूक अमानवी, चिथावणीखोर आणि अन्यायी होती. त्यांना कैदेत असताना जी अश्लाघ्य, सैतानी वागणूक आणि क्रूर छळ सहन करावा त्याची कोणी कल्पनाही करू शकत नाही. या सहा शूर जाट सैनिकांवर झालेल्या शारीरिक व मानसिक अत्याचाराची माहिती, त्यांचे मृतदेह भारतीय सेनेला सोपवण्यात आल्यावरच जगजाहीर झाली. या राक्षसी मनोवृत्तीनी संपूर्ण देश हादरला आणि जगाला पाकिस्तानचे खरे पाशवी स्वरूप कळले. या पेट्रोलमुळेच आपण खाली केलेल्या शिखरांवर झालेला पाक सेनेचा कब्जा, त्यांची या क्षेत्रात सर्वत्र झालेली बेकायदेशीर घुसखोरी आणि कारगिल, द्रास आणि बटालिक सेक्टरच्या उंच शिखरांवरील त्यांचे नियंत्रण खरोखर समजले नसते.

सौरभ कालियावर झालेल्या छळाचे वर्णन खरोखरच हृदयाला भिडणारे आहे. त्याच्या माता-पित्यानुसार त्या अमानुष छळाची तीव्रता आणि व्याप्ती किती असेल याची कल्पनाही कोणी करू शकत नाही. त्यांना जे सहन करावे लागले त्याच्या तुलनेत मुलाला दुरावण्याच त्यांचे दुःख काहीच नाही. त्या दोघांनाही वाईट वाटते की ज्याप्रमाणे राजकीय व आंतरराष्ट्रीय दबाव टाकून सांप्रत सरकारने पाक कैदेतून ४८ तासांत, विंग कमांडर अभिनंदन वर्धमानची सुरक्षित सुटका केली तसा दबाव तत्कालीन सरकार टाकू/आणू शकले नाही.

सौरभच्या वडिलांनुसार, देशाचे रक्षण करताना आपले प्राण अर्पण करणाऱ्यांना, कारगिलमधील हुतात्म्यांना आणि काश्मीरमध्ये दहशतवाद्यांशी लढणाऱ्या जवानांना योग्य तो आदर देणे आणि त्यांच्या कुटुंबीयांची काळजी घेणे हे सरकार व समाजाचे कर्तव्य आहे. सैनिकांना फक्त आर्थिक भरपाई, सेवा देयक किंवा इतर लाभांची नाही तर सन्माननीय जीवनाची आवश्यकता आहे. सरकार व समाजाने त्यांना सर्वोत्तम दिले पाहिजे. सौरभ कालियाच्या आई-वडिलांचे सांत्वन करण्यासाठी माझी भावना व शब्द अपुरे होते.

देशासाठी प्राणार्पण करणारा प्रत्येक भारतीय सैनिक सर्वोच्च त्याग करून अमर होतो. असे असाधारण लोक, देशसेवेसाठी जन्माला येतात, इतिहास लिहितात. कॅप्टन सौरभ कालियासारखे वीर, कायम जिवंत असतात/राहतात. भूतपूर्व सैनिक म्हणून मी, काही वर्षांनी या जगात नसेन. पण प्रत्येक हुतात्मा सैनिक अमरच राहील/असेल. काश्मीरमध्ये असो किंवा इतर कुठेही; युद्धात मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येक सैनिकाबद्दल जनमनात हीच भावना जोपासली जाणे आवश्यक आहे. जय हिंद.

९४२२१४९८७६

### डीजे की ध्वनिप्रदूषण?

नुकतीच शयनी एकादशी झाली. कालपासून श्रावण महिन्याची सुरुवात झाली आहे. हे चार महिने सण-उत्सवांचे, आनंदाचे आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण करणारे असतात. मात्र या मंगल प्रसंगात डोकेदुखी ठरते ती वाढत्या ध्वनिप्रदूषणाची. विशेषतः गणेशोत्सवात कर्णकर्कश डीजेच्या आवाजाची.



डीजे म्हणजे डिस्क जॉकी. संगीतप्रेमींसाठी मधुर संगीत सादर करणारी व्यक्ती. पण आज डीजे म्हणजे अत्यंत कर्कश, १२० डेसिबलपेक्षा जास्त आवाज करणारा त्रासदायक प्रकार बनला आहे. सामान्य आवाजाची मर्यादा ५० डेसिबल असते. त्याहून अधिक ध्वनी माणसाच्या मेंदूवर, हृदयावर आणि श्रवणशक्तीवर परिणाम करतो. गर्भवती महिला, नवजात बाळ, वृद्ध नागरिक, तसेच हृदयविकार-रक्तदाबाचे रुग्ण यांच्यासाठी हा आवाज घातक ठरू शकतो. ध्वनिप्रदूषण कायद्यानुसार निवासी भागात ध्वनी मर्यादा ३० डेसिबल असावी, तर रुग्णालय, न्यायालय, शाळांसारख्या शांततेच्या झोनमध्ये ध्वनिक्षेपक निषिद्ध आहे. आपण सुजाण नागरिक आहोत. आपल्या आनंदामुळे इतरांना दुःख होणार नाही याची काळजी घेणे हीच खरी संस्कृती. त्यामुळे गणेशोत्सवात भजन, कीर्तन, आरती यांच्या मधुर स्वरांनी वातावरण आनंदी करूया आणि कर्णकर्कश डीजेच्या आवाजातून निर्माण होणाऱ्या संकटांना दूर ठेवूया.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

● ● ● ●

### महाराष्ट्रातील शैक्षणिक पद्धतीचा प्रचार का होत नाही?

अलिकडे बहुचर्चित असलेला मल्याळम भाषेतील चित्रपट '८' (एट) हा तेथील शैक्षणिक पद्धतीत झालेला आमूलाग्र बदल खरंच मोठा आहे हा दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. बॅकबेंचर ही संकल्पनाच मोडीत काढण्याचा एक प्रयत्न केला. विद्यार्थी जीवनात मुलांच्या मनात ते कोरले जाते की, मी बॅकबेंचर आहे. असा विद्यार्थी कधीच पुढे येण्याचे साहस करीत नाही. आणि तो कायमचा बॅकबेंचर होऊन जातो. अगदी अलिकडे होणाऱ्या गेट-टुगेदरच्या पार्टीत सुद्धा अमुक विद्यार्थी .... तमुक विद्यार्थी तो नाही का... बॅकबेंचर या नावाने त्याला ओळखले जाते.

## वाचक पत्रे

मी महाराष्ट्रातील भंडारा जिल्हा परिषद शाळेतील शिक्षिका आहे. आज जे चित्रपट '८' मध्ये वर्ग रचना दाखवली जात आहे, त्याचे मोठे कौतुक केले जात आहे आणि ते खरंच कौतुकास्पद देखील आहे. कारण प्रत्येक विद्यार्थ्याला मी समोर बसलो आहे आणि फेस टु फेस शिक्षण प्रक्रिया घडत आहे, ही विद्यार्थ्यांच्या मनावर कोरणारी फार मोलाची गोष्ट आहे. मला फक्त एवढंच म्हणायचं आहे की, जेव्हा महाराष्ट्रात सर्व शिक्षा अभियान सुरू झाले आणि आणि आम्हा जिल्हा परिषद शाळेचे रुपडे पालटले. आमच्याकडे षटकोनी वर्गखोल्यांचे बांधकाम सुरू झाले. अतिशय सुंदर, भरपूर प्रकाश, हवा खेळती राहील अशीच ती वर्गखोली होती आणि आहे. त्या प्रत्येक शाळेत जिथे षटकोनी वर्गखोल्या आहेत तिथे अगदी २००७ च्या काळापासून तर आजतागायत वर्तुळाकार बसवून अध्यापन केलं जातं. आपल्या महाराष्ट्रात सर्वांत प्रथम षटकोन इमारतीमध्ये अशी वर्गरचना केली आणि बॅकबेंच ही संकल्पना बहुतांश त्याच कालावधीत नष्ट झाली. त्यानंतर आनंददायी शिक्षण आले आणि विद्यार्थी शिक्षकाच्या भोवताली शैक्षणिक साहित्यासह बसलेले दिसायचे. मला फक्त हेच मनापासून वाटते की, माझा महाराष्ट्र शैक्षणिक प्रयोगात प्रगतीत कुठेच कमी नाही. आज जे दाखवले ते माझ्या महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेमध्ये २००९ पासूनच सुरू होते. फक्त त्याचा पाहिजे तेवढा प्रचार अन् प्रसार झाला नसल्याने आम्ही राबविलेला प्रयोग जगासमोर आला नाही.

**वर्षा बढिये**/९८३४२३७६१८

● ● ● ●

### पोलिसांचे रामचरित मानस पठन

मध्यप्रदेश पोलिसांच्या प्रशिक्षण विभागाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक राजाबाबू सिंह यांनी एक अद्भुत उपक्रम राबविणार असल्याची घोषणा केली आहे. मर्यादापुरुषोत्तम, आदर्श राजा प्रभू श्रीराम यांची चौदा वर्षे वनवासात गेली. या वर्षात ते घरी परतले नव्हते. सर्व सुखसोयींपासून लांब राहून त्यांनी जीवन व्यतीत केले. केव्हा कोणत्या संकटाचा सामना करावा लागेल याचा भरवसा नव्हता. तेव्हा त्या संकटांना कसे तोंड द्यावे याचा परिपाठ त्यांनी घालून दिला. आज कितीतरी हजार वर्ष झालीत तरी रामायण हे आपल्यासाठी आदर्श आहे.

हे सांगण्याचे औचित्य असे की मध्यप्रदेश पोलिस खात्याकडून पोलिस विभागात नव्याने निवड झालेल्या चार हजार कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण या आठवड्यात सुरू होणार आहे. त्यापैकी ३०० कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण घराजवळच्या केंद्रात व्हावे असे अर्ज दाखल केले आहेत. पण त्यांची ही मानसिकता पोलिस दलासाठी उपयोगी नाही असे त्यांचे मत आहे. त्यामुळे या मानसिकतेतून बाहेर काढण्यासाठी आणि त्यांना प्रेरणा देण्यासाठी त्यांनी एक उपक्रम राबविण्याचे ठरविले आहे. ते म्हणजे दररोज रात्री रामचरितमानस वाचनाचा नियम करणे. याने प्रशिक्षणार्थींना बळ आणि धैर्य मिळेल ही उदात्त भावना आहे. या उपक्रमाला अनेक शुभेच्छा आणि मध्यप्रदेश पोलिस खात्याच्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## शिवगंगा नगरात तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै**

घराच्या पत्र्याच्या वाशाला अज्ञात कारणातून तरुणाने गळफास घेऊन आत्म हत्येचा प्रयत्न केला. ही घटना गुरुवारी रात्री आठच्या सुमारास शिवगंगा नगरात उघडकीस आली. वैभव हरी गायकवाड (वय २२, रा. शिवगंगा नगर, सोलापूर) असे आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या तरुणाचे नाव आहे. वैभव याने राहत्या घराच्या पत्र्याच्या वाशाला शुक्रवारी रात्री आठच्या सुमारास साडीने गळफास घेण्याचा प्रयत्न केला. ही बाब लक्षात येताच नातेवाईकांनी त्यास गळफासातून सोडविले. त्यानंतर रात्री ८.५० च्या सुमारास मित्राने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



### ▶▶ महत्वाचे...

## दिलीप मानेंच्या वाढदिवसानिमित्त होटगीत विविध कार्यक्रम

**सोलापूर, दि. २४ जुलै-**

सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समितिचे सभापती व माजी आमदार दिलीप माने यांच्या वाढदिवसानिमित्त दक्षिण सोलापूर युवक काँग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष सचिन व्हनमाने यांच्याकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. तीन ऑगस्ट रोजी माजी आमदार दिलीप माने यांचा वाढदिवस असल्याने कार्यकर्त्यांकडून जय्यत तयारी सुरू आहे. संयोजन समितीकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. होटगी येथे सचिन व्हनमाने व दिलीप माने मित्र परीवाराच्या वतीने रक्तदान, वृक्षारोपण, खाऊ व शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात येणार आहे.

## वडीलांच्या कडेवरून पडल्याने तीन वर्षाची बालिका जखमी

**सोलापूर, दि. २४ जुलै-**

वडील कडेवर घेऊन खेळवत असताना तीन वर्षाची बालिका निसटून पडल्याने जखमी झाली. हा प्रकार लोधी गल्ली येथे गुरुवारी रात्री दहा वाजता घडला. प्राची अजय लंबुवाले (वय ३ वर्ष, रा. लोधी गल्ली, सोलापूर) असे जखमी बालकाचे नाव आहे. प्राची ही शुक्रवारी रात्रीच्या सुमारास आजीच्या घरी होती. तेव्हा तेथे वडील अजय याने तिस खेळवण्यासाठी तिला कडेवर घेतले होते. तेव्हा अचानक ती कडेवरून निसटून खाली पडली. यात तिच्या डोक्याला मुकामार लागल्याने रात्री १०.२० च्या सुमारास वडील अजय याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## घरगुती कारणातून १३ वर्षाच्या मुलीने खाल्या सहा गोळ्या

**सोलापूर, दि. २४ जुलै-**

घरातील कौटुंबिक कारणातून झालेल्या वादानंतर १३ वर्षाच्या मुलीने पेनकिलरच्या पाच ते सहा गोळ्या खालल्याने तिला उपचारा करीता शासकीय रुग्णालयात दाखल केले. हा प्रकार शुक्रवारी रात्री ७.३० च्या सुमारास घडला. वैष्णवी शैलेश तलाटी (वय १३, रा. निलम नगर भाग-४) असे मुलीचे नाव आहे. शुक्रवारी रात्री ७.३० च्या सुमारास वैष्णवीच्या घरात घरगुती कारणातून भांडण झाले. याच रागातून वैष्णवीने घरातील पेन किलरच्या पाच ते सहा गोळ्या खालल्या. यानंतर तिला त्रास होऊ लागल्याने काका कृष्णा भुतनाळे याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.




## अज्ञात वाहनाच्या धडकेत राजस्थानच्या तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २४ जुलै-**

पुणे विजापूर बायपास रोडवरील देशमुख वस्ती येथील रस्त्यावर थांबलेलया तरुणाचा अज्ञात वाहनाच्या धडकेंत मृत्यू झाला. हा अपघात शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडली. हा तरुण राजस्थान येथील आहे. सावला राम देवाक्षी (वय ३४, रा. झाव झालोर, सांचोर, राजस्थान) असे तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी पहाटेच्या सुमारास सावला हा बाथरूमसाठी घराबाहेर पडला होता. तो पुणे ते विजापूर बायपास महामार्गावर थांबला असता, त्याला अज्ञात वाहनाच्या चालकाने धडक दिली. यात डोक्याला जखम तसेच सर्वांगास मुकामार लागलायने त्याला मांगीलाल याने उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वी तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## शेतात काम करताना महिलेला सापाचा दंश

**सोलापूर, दि. २४ जुलै-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तूर येथे शेतात काम करताना महिलेला सापाने दंश केला. हा प्रकार शुक्रवारी सकाळी ८.४५ च्या सुमारास घडला. रत्नाबाई मल्लिनाथ कुलकर्णी (वय ७१, रा. हत्तूर ता. द. सोलापूर) असे सर्पदंश झालेल्या महिलेचे नाव आहे. रत्नाबाई या शुक्रवारी सकाळच्या सुमारास शेतात काम करत होत्या. त्यावेळी त्यांच्या डाव्या हाताला सापाने दंश केला. यानंतर मुगला द-याप्पा याने उपचाराकरीता शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# ३ हजार ९०४ लाभार्थ्यांना घरकुलासाठी जागा दिली : सीईओ कुलदीप जंगम

▶ अनुकंपा भरतीमुळे उमेदवारांना हक्काची नोकरी
▶ १५० दिवसांतर्गत नाविन्यपूर्ण योजनांना सुरूवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै-**

जिल्ह्यात मंजूर झालेल्या ३ हजार ९०४ घरकुल लाभार्थ्यांना शासनाकडून जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे बेघरांना निवारा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. गावठाण ९००, गायरान ४७४ व इतर माध्यमातून जागा नसणाऱ्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नवीन सर्वे करण्यात आलेल्या अर्जांची पडताळणी सुरू असून ३१ जुलैपर्यंत पडताळणी पूर्ण होणार आहे, अशी माहीती जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी पत्रकार परीषदेत दिली.



सीईओ जंगम म्हणाले, जिल्हा परिषदेकडून २५७ पैकी १२४ उमेदवारांची अनुकंपा भरती करण्यात आली आहे. यावेळी त्यांच्या शिक्षणानुसार व विनंतीनुसार नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे त्यांना हक्काची नोकरी मिळाली आहे. शिवाय विविध कारणाने उर्वरीत उमेदवारांचाही पुढच्या टप्यात भरती करण्यात येणार आहे. १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत अनेक नाविन्यपूर्ण योजना सुरू करण्यात येणार आहे. एआय कॉलसेंटर मार्फत जिल्ह्यतील विविध समस्यांची विचारणा करण्यात आली होती. या तक्रारींची दखल घेऊन संबंधित विभागालासुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आले आहेत. आषाढी वारी संपल्यानंतर सर्व पालखी मार्गावर स्वच्छता मोहीम राबवून कचरा संकलन करण्यात आले आहे. त्यामुळे स्वच्छ व निर्मळ वारी पार पडली आहे. महाळुंग प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची शिफारस करण्यात आली असून कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार पुन्हा पाठपुरावा करण्यात येणार आहे. जलजीवन मिशनचे ७० कोटी बिल प्रलंबित आहे. जिल्ह्यात १३२९ जलजीवन मिशनची कामे करण्यात आली आहेत. त्यापैकी १००९ मुख्य योजना व ३२० पाणी वितरण योजना आहेत. ४५० कामे पूर्ण करण्यात आली आहेत. डिसेंबरअखेर सर्व प्रलंबित कामे पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याशिवाय वाडीवस्तीवरील २०४ कामे मंजूरीसाठी पाठविण्यात आली आहेत. पावसाळा असल्याने जिल्ह्यातील सर्व पाण्यांचे स्त्रोत तपासणी करण्यात येणार असून दूषित स्त्रोतांवर प्रक्रिया करण्यात येणार आहे. तर अयोग्यस्त्रोत प्रतिबंधित करण्यात येणार आहे. तालुक्यातील ग्रामपंचायतींची दिव्यांग निधी वाटपाची तपासणी करण्यात येणार आहे. दिव्यांग निधी घोटाळ्यातील बांगर चौकशी फाईल प्राप्त झाले असून तपासणी करून कारवाई करण्यात येणार असल्याचे सीईओ जंगम यांनी सांगितले.

**● जिल्ह्यात ११ लाख एआयचे कॉल**

शासनाच्या विविध विभागातील फिडबॅकसाठी जिल्ह्यात ११ लाख एआय कॉल करण्यात आले. त्यापैकी ८ लाख कॉल उचलले आहेत. पाच लाख पन्नास हजार कॉलसनी एक मिनिटापर्यंत संवाद साधला आहे. त्यामुळे एआय कॉलच्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध गावातील नागरीकांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली असून लवकरच उर्वरीत नागरीकांपर्यंत पोहोचणार असल्याचे सीईओंनी सांगितले.

**● संभ्रमावस्थामुळे पशुविभागाचे हस्तांतरण रखडले**

सहा जूनपासुन जिल्हा पशूसंवर्धन विभाग राज्य सरकारकडे वर्ग करण्यात आला आहे. मात्र, या विभागाच्या कार्यपध्दतीविषयी संभ्रमावस्था आहे. विभागावरील नियंत्रणासाठी हस्तांतरण रखडले आहे. वरीष्ठ पातळीवरून मार्गदर्शन मागविण्यात आले असून आदेश प्राप्त होताच पशूसंवर्धन विभाग वर्ग करण्यात येणार असल्याचे सीईओंनी सांगितले.

# भाच्याला मारहाण; मामांसह तिघांवर गुन्हा

### देगाव येथील बसवेश्वर तांडा येथील घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ जुलै -**

पैशाच्या कारणावरून भाच्याला लाकडाने मारहाण करणाऱ्या मामांसह तिघांविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना देगाव येथील बसवेश्वर तांडा येथे घडली.

याबाबत चंद्रकांत राजू राठोड (वय २१, रा. बसवेश्वर तांडा, देगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अशोक पवार, कुमार पवार, पार्वती पवार (रा. बसवेश्वर तांडा, देगाव) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चंद्रकांत राठोड याचा कुमार पवार हा लहान मामा आहे. २३ जुलै रोजी दुपारी दीडच्या सुमारास चंद्रकांत याची आई शालन राठोड या बँकेत कामानिमित्त जात असताना कुमार पवार याने तुझ्याकडे काम आहे म्हणून घरी बोलावून घेऊन माझे उसने पैसे १० हजार रुपये दे म्हणून भांडू लागला. त्यावेळी चंद्रकांत याचे वडील राजू राठोड हे त्या ठिकाणी आले व त्यांनी कुमार पवार यास तुमचे पैसे घेतले नाही असे सांगू लागले. त्यावेळी अशोक पवार यांनी जवळच पडलेल्या लाकडाच्या ढिगाऱ्यातून एक लाकूड घेऊन चंद्रकांत यांच्या आईच्या हातावर व डोक्यावर मारून त्यांना जखमी केले. चंद्रकांतचे वडील राजू राठोड हे भांडण सोडविण्यास गेले असता त्यांच्या डोक्यात लाकडाने मारले. तसेच अशोक पवार, कुमार पवार, पार्वती पवार यांनी मारहाण करून शिवीगाळ केली व बघून घेण्याची धमकी दिली.

त्यावेळी चंद्रकांत याने आई वडीलांना का मारतो अशी विचारणा केली असता त्यासदेखील तिघांनी मिळून मारहाण करून शिवीगाळ केली. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक चौधरी पुढील तपास करीत आहेत.

# जे सांगून ऐकणार नाहीत त्यांच्यावर हद्दपार, एमपीडीएअंतर्गत कारवाई करणार

● मुळेगाव तांडा येथील हातभट्टी व्यवसायिकांच्या बैठकीत पो. नि. राहुल देशपांडे यांचा इशारा



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ जुलै -**

हातभट्टीच्या व्यवसायातील जे लोक सांगुन ऐकणार नाहीत अशा लोकांविरूध्द वेळोवेळी छापे टाकुन गुन्हे दाखल करून त्या संबंधीत लोकांविरूध्द प्रचलित कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात येईल. तसेच त्यांच्याविरूध्द हद्दपार, एम.पी.डी.ए सारखी कडक प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे सोलापूर तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे यांनी सांगितले. ऑपरेशन परिवर्तन मोहीमे अंतर्गत मुळेगाव तांडा येथे सोलापूर तालुका पोलिस ठाण्याच्यावतीने बैठक घेऊन मार्गदर्शन करण्यात आले.

या बैठकीत पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे यांनी उपस्थित असलेल्या लोकांना चोरून अवैध गावंठी दारू काढण्या पासुन परावृत्त करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. ज्या नागरिकांची शेती आहे त्यांनी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पेनतुन सेंद्रीय शेती करण्याचे आवाहन केले. त्यासाठी लागणारे तांत्रिक सहकार्य, मार्गदर्शन व सेंद्रीय शेती करणे करीता संबंधीत विभागाशी समन्वय साधुन पोलीस विभागा कडुन योग्य ती मदत करण्यात येणार असल्याचे देशपांडे यांनी सांगितले. आगामी काळात पोलीस भरती होणार आहे. पोलीस भरतीसाठी जे तरूण इच्छुक आहेत. अशा तरूणांना पोलीस भरती करीता शारिरीक चाचणी व लेखी परीक्षे करीता मोफत विनामुल्य मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे आवाहन देशपांडे यांनी केले आहे. जे मुले शिकले आहेत. अशा मुलांसाठी रोजगार मेळावा आयोजित करण्यात येणार आहे, त्यासाठी मुलांनी त्यांची नावे सोलापूर तालुका पोलीस ठाणे येथे नोंदवावी असे आवाहन देशपांडे यांनी केले. हातभट्टीचा अवैध व्यवसाय सोडुन समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्याकरीता पोलिस निरीक्षक देशपांडे यांनी लोकांना आवाहन केले. या बैठकीकरीता मुळेगाव तांडा येथील सरपंच, नागरिक व सोलापूर तालुका पोलीस ठाण्याकडील पोलीस अंमलदार हे उपस्थित होते.

# शेतात येत-जात नसल्याच्या कारणातून पत्नीचा खून

▶▶ हत्तूर-आनंद तांडा दरम्यानच्या पाटील वस्तीवरील घटना




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ जुलै -**

शेतात पत्नी येत-जात नाही याचा राग मनात असलेल्या पतीने गुरुवारी दुपारी टोकाचे पाऊल उचलत पत्नीच्या डोक्यात फरशीने मारुन तिचा खून केला. ही घटना हत्तूर ते आनंद तांडा दरम्यानच्या पाटील वस्तीवर घडली.

गौराबाई निलकंठ पाटील (वय ६५) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. तर निलकंठ भिमराव पाटील (वय ६५, रा. पाटील वस्ती, हत्तूर) असे खून करणा-या पतीचे नाव आहे. निलकंठ पाटील यांची हत्तूर ते आनंद तांडा दरम्यान शेती आहे. त्या भागाला पाटील वस्ती म्हणून परिसरात ओळखतात. याठिकाणी गौराबाई आणि निलकंठ असे दोघे राहतात. शेतातील वस्तीवर राहत असूनही गौराबाई शेताकडे लक्ष देत नव्हत्या. तसेच त्या निलकंठ यांच्याबाबतीत हेळसांडपणा करत होत्या. यामुळे त्यांच्यात नेहमीच खटके उडत होते.


गौराबाई पाटील

दोघांमधील भांडण झाल्यानंतर त्या काही दिवस परगावी असलेल्या मुलांकडे राहण्यास जात होत्या. यानंतर त्या पुन्हा घरी आल्या की त्यांच्यात काही कारणाने वाद होत होता. दरम्यान गुरुवारी अमावस्या असल्याने गौराबाई शेतातील मंदिराज पूजा करण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी निलकंठ हे तेथे गेले. त्यांनी नेहमी शेतात येत नाही, आज कशी आली असे म्हणून गौराबाई यांना शिवीगाळ केली. त्यानंतर तेथे पडलेली फरशी उचलून त्यांच्या डोक्यात घातली. त्यानंतर ते पुन्हा त्याच फरशी गौराबाई यांच्या डोक्यात मारत राहिले. डोक्यातील संताप संपल्यानंतर त्यांनी फरशी बाजूला टाकली. यात गंभीर जखमी झालेल्या गौराबाई यांचा जागीच मृत्यू झाला. दुपारी झालेल्या या घटनेची माहिती सायंकाळी परिसरात समजली. याबाबत विजापूर नाका पोलीस ठाण्याला माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहचले. त्यांनी गौराबाई यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीकरीता शासकीय रुग्णालयात पाठविला आहे. पोलिसांनी संशयित आरोपी पती निलकंठ यास ताब्यात घेतले आहे. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक शितलकुमार गायकवाड करत आहेत.

# राज्यातील १४२१ एम.फील प्राध्यापकांना नेट-सेटमधून सूट


● सोलापूर विद्यापीठातील २६ प्राध्यापकांचा समावेश
● पदोन्नतीचे प्रस्तावही तातडीने निकालात काढण्याचे सुटाच्या बैठकीत कुलगुरूंचे आश्वासन



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ जुलै-**

राज्यातील सर्व विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील १४ जून २००६ रोजी किंवा त्यापूर्वी नियुक्ती झालेल्या आणि ११ जुलै २००९ पूर्वी एम.फील. उत्तीर्ण १४२१ प्राध्यापकांना राष्ट्रीय पात्रता चाचणीतून (नेट-सेट) परीक्षेतून सूट देण्याचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य शासनाने नुकताच घेतला आहे. त्यात सोलापूर विद्यापीठाच्या २६ प्राध्यापकांचा समावेश आहे. या प्राध्यापकांचे पदोन्नतीचे कॅसचे (करियर अॅडव्हान्स स्कीम) प्रस्ताव आल्यास विद्यापीठ प्रशासन त्यास तातडीने मंजूरी देईल, असे आश्वासन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी दिले.

सोलापूर विद्यापीठ संघ (सुटा) व विद्यापीठ प्रशासन यांच्यात झालेल्या संयुक्त बैठकीत त्यांनी हे आश्वासन दिले. या बैठकीच्या वेळी प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, व्यवस्थापन परिषद सदस्य सचिन गायकवाड, सुटाचे अध्यक्ष डॉ. नेताजी कोकाटे, प्रमुख कार्यवाह डॉ. वशिष्ठ गुरमे, खजिनदार डॉ. राजेंद्र सुर्यवंशी, कार्यवाह डॉ. पंचप्पा वाघमारे, अंतर्गत लेखापाल संजय देवकर, डॉ. भगवान आदटराव, डॉ. एस. बी. भांजे, डॉ. एस. एच. गायकवाड, डॉ. अरविंद दळवी, डॉ. अनिल जाधव, पी. के. नरखडे, बी. डी. वाघचवरे, अनंत कुलकर्णी, सिनेट सदस्य ए. बी. संगवे, गणेश डोंगरे, सिद्धेश्वर स्वामी आदी उपस्थित होते.



**बैठकीत झालेले निर्णय असे**

- विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी ऑनलाईन प्रणालीचे महिन्यातून एक वेळा प्रशिक्षण
- परीक्षा झाल्यापासून २१ दिवसात ऑनलाईन प्रणालीद्वारे निकाल लावण्याचा विद्यापीठ प्रशासनाचा प्रयत्न
- २०२२-२३ पासूनचे अॅड ऑन अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र ३१ जुलैपर्यंत देणार
- तज्ञांचा सल्ला घेऊन कमीत कमी कलावधीचे परीक्षेचे वेळापत्रक तयार करणार
- २००४ ते २०१६ मधील विद्यार्थासाठी घेतलेल्या परीक्षेचा निकाल ३१ जुलैपर्यंत लावणार
- २०२४-२५ वर्षापासूनच्या विद्यार्थ्यांच्या कॅरी ऑनसाठी विद्यापरिषदेच्या बैठकीत निर्णय
- पदवी व पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी ७५ टक्के उपस्थिती बंधनकारक.
- पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी संलग्न महाविद्यालयाने बायोमेट्रिक डिजीटल सिस्टीम १ आक्टोंबरपर्यंत विकसीत करावी.
- पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक डिजीटल सिस्टीम विकसीत केली नाही त्या महाविद्यालयाचे प्रवेश थांबणार.



● मुख्यमंत्री सहायता निधीसाठी

# बिंगीकडून ५५ हजार ५५५ चा धनादेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै-**

येथील मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय कक्षासाठी अंबादास व्यंकय्या बिंगी यांनी प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याकडे ५५ हजार ५५५ रुपयांचा धनादेश देणगी म्हणून सुपूर्द केला.

यावेळी मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय कक्षाचे अध्यक्ष डॉ. अविनाश खांडेकर, सदस्य कैलास चौधरी, कपिल गायकवाड तसेच रोहिणीताई तडवळकर रामचंद्र जन्नू, पांडुरंग दिडी, श्रीहरी म्याकल, लक्ष्मण गायकवाड नागेश गंजी आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. खांडेकर यांनी नियोजन भवन येथे सुरू असलेल्या मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय कक्ष कडून गरजू रुग्णांसाठी करण्यात येत असलेल्या मदतीची माहिती दिली.

तसेच सोलापूर जिल्ह्यातील गरजू रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधी तसेच धर्मादाय रुग्णालय कक्षातून मदतीसाठी संपर्क करण्याचे आव्हानही यावेळी त्यांनी केले. सोलापूर जिल्ह्यातील देणगीदार, नागरिकांनी या कक्षासाठी सढळ हाताने मदत करावी, असेही प्रशासनाच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी ११८९

अगा देहींचा अग्नि जरी गेला ।
तरी देह नव्हे चिखलु ओला
वायां आयुष्य वेळु आपुला ।
आंधारां गिंवसी ।।

ज्ञानयोगी, ध्यानयोगी देहाबद्दल आसक्त नसतात. जीवनसमयी तसेच मृत्यूसमयी देहाच्या सुख, दु:खात हे योगी अडकत नाहीत. योगी लोकांचा मृत्यू सुध्दा अत्यंत चांगल्या पध्दतीने होत असतो. त्यांच्या देहात चेतना कायम असते. त्यांचा जठराग्नी त्यांना साथ देतो म्हणून त्यांची ज्ञानशक्ती कायम असते. वा-याने किंवा पाण्याने दिव्याचा प्रकाश जर नाहीसा झाला तर शाबूत असलेली दृष्टी अंधारात पाहू शकत नाही. त्याप्रमाणे मृत्युसमयी



विषयवाताने देह जेव्हा आंत बाहेर कामदोषाला प्राप्त होतो. तेव्हा देहातील जठराग्नीचा दिवा मालवतो. जेव्हा जठराग्नी साथ देत नाही, तेव्हा बुध्दी असूनही काम करीत नाही. देहात जठराग्नीवाचून ज्ञानशक्तीला आधार राहत नाही. देहातील जठराग्नी नष्ट झाला तर काय होते हे सांगतांना भगवंत म्हणाले, अगा देहींचा अग्नि जरी गेला । तरी देह नव्हे चिखलु ओला । वायां आयुष्य वेळु आपुला । आंधारां गिंवसी ।। अर्थात, देहातील अग्नी जर नष्ट झाला तर हा देह केवळ ओला चिखल असतो. ओल्या चिखलाचा देह म्हणजे आयुष्य आपला वेळ व्यर्थ अंधारात शोधत राहण्याची अवस्था होय. अशा माणसाला मागील कांहीही आठवत नाही. देह आणि काम यांच्या चिखलात ज्ञानशक्ती नष्ट होते. प्रत्येक माणसाला मृत्यू सूध्दा चांगला यावा असे वाटत असते. परावलंबी न होता किंवा वाईट प्रकारे मृत्यू न येता चालता-बोलता, हिंडता-फिरता, मृत्यू यावा असे प्रत्येकाला वाटते. पण मृत्यू हा मानवाच्या हातात नसतो. कोणाला कसा मृत्यू येईल हे सांगता येत नाही. मृत्यू जर मानवाच्या हातात असता तर माणसाने तो पत्करलाच नसता. लोकसंख्या एवढी वाढली असती की, कोणाला हिंडायला-फिरायला सुध्दा जागा शिल्लक राहिली नसती. खरे म्हणजे मृत्यू हे एक मानवाला मिळालेले वरदानच आहे. असो, बहुतांश ज्ञानयोगी, ध्यानयोगी यांच्या देहाच्या आंत जठराग्नीचा आणि बुध्दीच्या आत ज्ञानाचा प्रकाश असतो. बाहेर शुक्लपक्ष आणि दिवस असतो. तसेच उत्तरायणातील सहा महिण्या पैकी कोणताही एखादा महिना असतो. प्रत्येकाला असा मृत्यू येईलच असे सांगता येत नाही. मानवाच्या हातून चांगली कर्म घडत गेली तर मृत्यू वाईट येईलच कशाला. मृत्यू चांगला येईल की वाईट याचे विचार न करता सुखाने मरता येईल अशी मानसिकता होण्यासारखे वागले तरी पुरेसे आहे. आयुष्यभर जे केले त्याचे फळ भोगावे लागते. म्हणून पावला-पावलाला माणसाने विचार करावा की, आपल्या हातून सत्तेचा, संपत्तीचा, अधिकाराचा दुरुपयोग होणार नाही. हा देह सोडण्याचा जो उत्तम काळ वर चर्चिला गेला, त्यालाच अचिर्रादी मार्ग किंवा देवयान मार्ग असे म्हणतात. माणसाच्या हातून घडणा-या सत्कर्मावर हे सर्व अवलंबून असते. आपल्या हातून माणूस कोणावर अन्याय करीत नसेल, कोणाला अकारण त्रास देत नसेल, कोणाला लुबाडत, फसवित नसेल तर त्याला वाईट मृत्यू येण्याचे कारण नाही. आपण ज्ञानदेवांच्या ओव्यांच्या सहवासात राहून चांगले वर्तन ठेवण्याचा प्रयत्न करीत असल्याने मृत्यूचे भय मानण्याचे कारण नाही. सत्कर्माची फळे चांगली मिळत असतात त्यामुळे सत्कर्मी माणसाला मृत्यूची भिती बाळगण्याचे कारण नाही. जय जय राम कृष्ण हरी।

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष- |
| दि. २६ जुलै २०२५ | अश्वत्थ मारुती पूजन |
| विक्रम संवत् २०८२ | |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. द्वितीय (२२.४१) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - आश्लेषा (१५.५१) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - व्यतिपात (०९.५०) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बालव (१०.५६) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. मितभाषी राहील्याने आर्थिक फायदा होईल. व्यापारात नवीन प्रस्ताव मिळतील.

**वृषभ :** जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घ्या. आर्थिक समस्या येऊ शकते. निरर्थक कामात आज आपला वेळ जाणार आहे. स्थावर मालमत्तेबाबत अडचण येण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** आपण घेतलेले निर्णय योग्य राहतील. सामाजिक प्रसिद्धी मिळेल. रोजगारात प्रगती राहील. मुलांच्या कामाबल संशय निर्माण होईल.

**कर्क :** केलेल्या कामाचे चीज होईल. आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळेल. व्यापारत नवीन योजनेची सुरूवात कराल.

**सिंह :** महत्वपूर्ण व्यक्तिंचा संप येईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

**कन्या :** आपण केलेल्या कामाची सुरूवात चांगली होईल. साहसीवृत्तीत वाढ होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक समस्या सुटल्यामुळे मन प्रसन्न राहील. आपल्या व्यसनांना आवर घाला.

**तुळ :** जबाबदारीचे कामे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. व्यापारात नवीन योजनेचा शुभारंभ होण्याचा योग आहे.

**वृश्चिक :** आरोग्य चांगले राहील. आर्थिक योग मध्यम आहेत. व्यापारिक प्रकरणात जबाबदारी वाढणार आहे. आपआपसातील वाद समझदारीने मिटवा. प्रवास करू नका.

**धनु :** आज आपल्या कामात आपल्याला उत्साह वाटणार आहे. बुद्धीचा उपयोग करून पैसा गुंतवणूक करा. कौटुंबिक समस्येकडे दुर्लक्ष करू नका. सुखकर प्रवास होईल.

**मकर :** मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मागील कामात विशेष यश मिळेल. उतावीळपणा करू नका.

**कुंभ :** चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल. आरोग्याची काळजी घ्या.

**मीन :** उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल.

# ‘ए.सी.एस.’ मध्ये ‘ए.आय.’द्वारे ३ हृदय शस्त्रक्रिया

### सोलापूरच्या वैद्यकीय क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै-**

महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांसह कर्नाटकच्या उत्तरेकडील जिल्ह्यांत वैद्यकीय सेवेसाठी विश्वासार्ह आणि लोकप्रिय ठरलेल्या सोलापूर जिल्ह्यामध्ये ए आयचा वापर करून एकाच दिवशी हृदयरोगावरील तीन अतिजटिल शस्त्रक्रिया सोमवारी करण्यात आल्या. भैय्या चौक येथे असलेल्या एसीएस हॉस्पिटलमध्ये आंतरराष्ट्रीय ख्यातीचे हृदयरोग तज्ञ डॉ. जसकरण सिंग दुग्गल यांच्या साथीने डॉ. प्रमोद पवार, डॉ. सिद्धांत गांधी यांनी या दुर्मिळ शस्त्रक्रिया केल्या असल्याची माहिती डॉ. प्रमोद पवार आणि डॉ. सिद्धांत गांधी यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

एसीएस हॉस्पिटलमध्ये सोमवारी आयोजित कार्यशाळेत डॉ. जसकरण सिंग दुग्गल यांनी मार्गदर्शन केले. आणि तीन शस्त्रक्रिया करण्यासाठी मोलाची साथही दिली.

पुणे येथील एका रुग्णाची एक वर्षभरापूर्वी बायपास शस्त्रक्रिया झाली होती. यानंतर पुढील सहा महिन्यातच त्यांची रक्तवाहिनी



बंद पडली. तसेच अवघ्या तीन महिन्यांपूर्वी एन्जोप्लास्टीही करण्यात आली होती. मात्र तरीही त्या रुग्णाचा त्रास कमी न झाल्यामुळे रुग्ण सोलापुरातील एसीएस हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियेसाठी दाखल झाला होता. या रुग्णावर तीन तास शस्त्रक्रिया करण्यात आली. तसेच सोलापूर आणि धाराशिव मधील प्रत्येकी एक रुग्णाच्याही शस्त्रक्रियेचे निदान ए आय द्वारे करण्यात आले. या दोन्ही रुग्णांच्या हृदयाकडे जाणाऱ्या रक्तवाहिन्या ज्या ठिकाणी दुभागत होत्या त्या ठिकाणी बायफरगेशन ही अत्याधुनिक पद्धती वापरून दोन्ही रक्तवाहिन्यातील रक्तपुरवठा सुरळीत करण्यात आला. या दोन्ही शस्त्रक्रिया प्रत्येकी दीड तास चालल्या. या तीनही रुग्णांच्या शस्त्रक्रियेसाठीचे निदान एआयच्या मदतीने करून डॉ. जसकरण सिंग दुग्गल यांच्या साथीने डॉ. प्रमोद पवार आणि डॉ. सिद्धांत गांधी यांनी या अतिशय जटिल शस्त्रक्रिया केल्या. उपचारानंतर गुरुवारी या रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला. पुणे, धाराशिव आणि सोलापुरातील रुग्णांवर जटील शस्त्रक्रिया करण्यासाठी साथ दिल्याबद्दल डॉ. जसकरण सिंग दुग्गल यांचा डॉ. प्रमोद पवार, डॉ. सिद्धांत गांधी, डॉ. राहुल कारीमुंगी, डॉ. दीपक गायकवाड यांनी सन्मान केला. ए आय चा वापर करून सोलापुरात करण्यात आलेल्या अतिजटिल हृदय शस्त्रक्रियांमुळे सोलापूरच्या वैद्यकीय क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. या पत्रकार परिषदेस डॉ. प्रमोद पवार, डॉ. सिद्धांत गांधी, डॉ. राहुल कारीमुंगी, डॉ. दीपक गायकवाड उपस्थित होते.

# कला जोपासत रसिकत्वाचा आनंद घ्या : डॉ. पटेल

### सुयश गुरुकुल येथे जन्मशताब्दी वर्षानिमित्त प्रा. श्रीराम पुजारी यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै-**

विद्यार्थ्यांना कलेची ओळख शालेय वयातच होणे अपेक्षित आहे. पुस्तकी ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्याने ज्या कलेची आवड आहे ती कला आत्मसात करावी, ज्या योगे मनातून रसिक बनत जीवनाचा आनंद घेता येईल, असे प्रतिपादन दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी केले.



विद्यार्थीप्रिय शिक्षक, समाजधुरीण प्रा. श्रीराम पुजारी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त ज्ञानेश्वर प्रतिष्ठान संचलित विजापूर रस्त्यावरील सुयश गुरुकुल येथे प्रा. श्रीराम पुजारी यांच्या स्मृतींना उजाळा देत अभिवादन करण्यात आले. त्या वेळी डॉ. जब्बार पटेल यांनी गुरुकुलातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. सुप्रसिद्ध शास्त्रीय गायिका कलापिनी कोमकली, श्रीराम पुजारी प्रतिष्ठानचे विश्वस्त राम कोल्हटकर, कार्याध्यक्ष डॉ. नवनीत तोष्णिवाल, सचिव ललिता दातार, हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. श्रीकांत येळगावकर, मंजुषा गाडगीळ, सुयश गुरुकुलचे विश्वस्त-मुख्याध्यापक केशव शिंदे, विश्वस्त विद्या शिंदे मंचावर होते. माजी आमदार नरसिंग मेंगजी, सुप्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले, प्रा. सुलभा पिशवीकर, पुष्पा आगरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये रमणाऱ्या प्रा. श्रीराम पुजारी यांच्या स्मृती गुरुकुलातील बहावा वृक्षाच्या छायेत जपण्यात आल्या आहेत. तेथे मान्यवरांनी प्रा. पुजारी यांच्या तसबिरीसमोर पुष्पांजली अर्पण केली.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते बहाव्याचे रोपटे लावण्यात आले. राम कोल्हटकर म्हणाले, प्रा. श्रीराम पुजारी यांच्या आशीर्वादाने निर्माण झालेली सुयश गुरुकुलची वास्तू सोलापुरचे वैभव आहे. पुजारी सरांविषयी बोलताना केशव शिंदे म्हणाले, सरांनी माझ्या सारख्या अनेक विद्यार्थ्यांवर पोटच्या मुलापेक्षा अधिक प्रेम केले. त्यांच्यासारखे उर्जादायक व्यक्तीमत्व गुरुस्थानी लाभले याचा अभिमान आहे. त्यांचा वारसा गुरुकुलच्या माध्यमातून पुढे नेण्याचा प्रयत्न सुरू आहे. विद्या शिंदे यांनी प्रास्ताविक केले. मान्यवरांचे स्वागत डॉ. नवनीत तोष्णिवाल, केशव शिंदे, विद्या शिंदे यांनी केले.



# चौत्रा पूना नाका गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी रोहित सुरवसे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि. २५ जुलै-**

धोतरा पुन्हा नका गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी रोहित सुरवसे तर कार्याध्यक्षपदी शाबीर अखिल सय्यद यांची निवड करण्यात आली. चौत्रा पूना नाका तरुण मंडळाचे सर्वेसर्वा पुरुषोत्तम बरडे यांच्या नेतृत्वाखाली गणेशोत्सव नियोजन व नूतन उत्सव पदाधिकाऱ्यांची बैठक श्री गणेश मंदिरात पार पडली.

सर्व गणेश भक्त व मान्यवरांचे स्वागत समर्थ बरडे यांनी केले. सूत्रसंचालन नितीन रुपनर यांनी केले तर आभार अर्जुन बरडे यांनी मानले. वार्षिक बैठकीत मंडळाचे मार्गदर्शक आशुतोष बरडे, नितीन रुपनर व राजकुमार माने यांनी मनोगत व्यक्त केले. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे : उपाध्यक्षपदी राहुल कालेकर, जयदीप गायकवाड, सागर मुसमुसे, आकाश चव्हाण, सचिव मल्लिनाथ टणके, सहसचिव गणेश घोणे, स्वप्निल टिंगरे, खजिनदार संदीप भोसले, सहखजिनदार आकाश माने, प्रसाद चोरमुले, लेझिम प्रमुख अजय अमनूर, शुभम महागावकर, अजय बाबर, समर्थ चव्हाण, मिरवणूक प्रमुख महेश क्षीरसागर, राजेंद्र बोमरा, दत्तात्रय देशमुख, अझीम शेख, सचिन देवकते यांची निवड करण्यात आली.

# मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये लोकमान्य टिळक जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे नगर मध्ये लोकमान्य टिळक जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक रमेश दिंडोरे होते तर प्रमुख अतिथी उपक्रम प्रमुख धरेप्पा हत्तुरे होते. यावेळी अध्यक्ष व प्रमुख अतिथी यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी अक्षता करवीर, श्लोक कलशेट्टी, पृथ्वीराज सन्नाके, श्रेयस जाधव, सौंदर्य कल्लूरकर, स्वप्नाली पाटील, संध्या कारंडे, वैष्णवी बोरगाव, समृद्धी माने या विद्यार्थ्यांनी भाषणे केली. प्रस्ताविक स्वराली यादव हिने केले. सूत्रसंचालन सचिता जाधव हिने केले तर आभार पर्णश्री माळवदकर हिने मानले. यावेळी सुकेशनी गंगोडा, बसवराज कोरे, अनिलकुमार गावडे, अमरनाथ कदारे, गणेश कोरे, अण्णाराया तुप्पद, संतोष हिरेमठ, परमेश्वर चांदोडे, आनंद काकडे, विद्याधर हुलगेरी, प्रतीक्षा बिडवे, गुरुसिद्धप्पा पाटील उपस्थित होते.



# माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते भारत जाधव यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै-**

उत्तर सोलापूर तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल भारत जाधव यांचा सत्कार माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सुशीलकुमार शिंदे यांची जनवात्सल्य, सोलापूर येथे सदिच्छा भेट घेण्यात आली.

यावेळी सोलापूर काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, चंद्रकांत कराळे, सचिन गुंड, शुभम शिराळ, पृथ्वीराज दुधाळ, दिलीप मस्के दिलीप पवार, अंकुश घुले, आप्पाशा आईवळे, हनुमंत जावीर, गडदे, अमर भोसले, विनायक भोसले, शकील जाहीरदार, एकरूप गजानन नगरे, नंदा कांबळे, दादाराव पाटील, मनीष घुले, तात्या कादे, कबीर पठाण आदी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुरव समाजातील गुणवंत विद्यार्थी व मान्यवरांचा रविवारी सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै-**

राष्ट्रीय गुरव समाज महासंघ जिल्हा सोलापूर यांच्यावतीने गुरव समाजातील गुणवंत विद्यार्थी व विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार रविवार दि. २७ जुलै रोजी सकाळी १० वाजता डॉ. फडकुले सभागृह, सोलापूर येथे होणार आहे, अशी माहिती जिल्हा अध्यक्ष निंगराज विंचुरे यांनी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावर्षी १५ मान्यवर व १०वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर परिक्षेत यश संपादन केलेल्या ३५ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. राष्ट्रीय अध्यक्ष व माजी आ. विजयराज शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ होणार आहे. पत्रकार परिषदेस शशिकांत जिड्डीमनी, चंद्रकांत गुरव, काशिनाथ मेलगिरे, ज्ञानेश्वर कारभारी, गंगाधर पुजारी, सुरेश पाटील, ज्ञानेश्वर पाटील, नंदकुमार विजापूरे आदी उपस्थित होते.

# अस्तित्व मेकर्स फाऊंडेशनतर्फे उद्या लघुनाटिका स्पर्धा

### रंगकर्मी प्रा. डॉ. दिलीप घारे यांचा रंगसाधक पुरस्काराने होणार सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै-**

अस्तित्व मेकर्स फाऊंडेशनतर्फे रंगसाधक प्रमोद खांडेकर करंडक लघुनाटिका (हास्यप्रहसन) स्पर्धा २०२५ व अस्तित्व रंगसाधक पुरस्कार २०२५ कार्यक्रमाचे आयोजन रविवार दि. २७ जुलै रोजी सोलापूर येथील हुतात्मा स्मृती मंदिर येथे करण्यात आले आहे, अशी माहिती महोत्सव अध्यक्ष संजय सावंत आणि ॲड. बसवराज सलगर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

अस्तित्व मेकर्स फाऊंडेशन दरवर्षी रंगसाधक पुरस्कार देण्यात येतो. हा पुरस्कार महाराष्ट्रातील प्रायोगिक रंगभूमीवर भरीव काम करणाऱ्या रंगसाधकास दिला जातो. या वर्षी रंगकर्मी प्रा. डॉ. दिलीप घारे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार वितरण सोहळा सायंकाळी ६ वाजता होईल.

या पुरस्काराचे स्वरुप मानपत्र, स्मृतीचिन्ह, रोख ११ हजार रुपये व शाल, श्रीफळ असे आहे. जेष्ठ रंगकर्मी संजय सावंत, सुमित फुलमामडी, गोवर्धन कमटम यांचा पुरस्कार निवड समितीमध्ये समावेश होता. रंगसाधक प्रमोद खांडेकर करंडक लघुनाटिका (हास्यप्रहसन) स्पर्धा २०२५ च्या अध्यक्षपदी सोलापुरातील जेष्ठ रंगकर्मीची निवड करून त्यांच्या



कार्याचा गौरव करण्यात येतो. तो यंदा जेष्ठ रंगकर्मी संजय सावंत यांना देण्यात आला आहे. या अध्यक्षांची निवड संस्थेचे मुख्य संयोजक ॲड. बसवराज सलगर यांनी केली आहे.

स्पर्धेचे हे १० वे वर्ष असून ही स्पर्धा महाराष्ट्र राज्यस्तरावर घेतली जाते. याही वर्षी वरील शहरातून २८ संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. या स्पर्धेचे उदघाटन महोत्सवाचे अध्यक्ष संजय सावंत, ड.बसवराज सलगर यांच्या हस्ते होणार आहे. पुरस्कार वितरण सोहळा व बक्षीस वितरण हे महाराष्ट्राची हास्यजत्रा या टीव्हीचे लेखक व दिग्दर्शक सचिन गोस्वामी, जेष्ठ रंगकर्मी विद्या काळे, डॉ. सुहासिनी शहा, अमित कलगुंटकर, अविनाश गोडसे, डॉ. केदारनाथ काळवणे, धीरज जवळकर, ॲड. मिलिंद थोबडे, मिलिंद हिंगमिरे, अमित रोडगे, दत्ता गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. स्पर्धा सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत चालणार आहे. ही स्पर्धा प्रेक्षकांसाठी खुली (मोफत) आहे.या पत्रकार परिषदेस किरण लोंढे, नितेश फुलारी, सागर देवकुळे, वैशाली बनसोडे, निरंजन राऊळ, प्रतिक कसबे, अशपाक नदाफ, ओंकार साठे, केदार देशमुख, सोमनाथ लोखंडे, गोवर्धन कमटम उपस्थित होते.

# गोमातेचे पूजन करून गोसंवर्धन दिनानिमित्त वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

महा एनजीओ फेडरेशन व इको नेचर क्लब यांच्या माध्यमातून शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन दिवसानिमित गोपालक संघ गोशाळा नेहरूनगर येथे वृक्षारोपण करण्यात आले. गोसवंर्धन दिन व गोशाळा मध्ये गोमातांची पूजा करून त्यांना चारा देऊन विशेष गोशाळेमध्ये देशी व औषधी वृक्ष लागवड करण्यात आली कादंब कडुलिंब करंज आवळा अशा देशी वृक्षाची लागवड होत आहे.



संचालक अमोल उंबरजे म्हणाले की, महा एनजीओ फेडरेशन आयोजित व संस्थापक शेखर मुंदडा यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रातील ५५ सामाजिक संस्थांच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात आपण जवळपास ३०० हून अधिक गोशाळेत वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात येत आहे. हरित सेवा आणि गोसेवा अशा दोन्ही सेवांना जोडण्यासाठी असे उपक्रम राबवित आहोत.

महा एनजीओ फेडरेशनचे जिल्हा समन्वयक डॉ. मनोज देवकर म्हणाले की, सोलापुरात खूप मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपणची गरज आहे त्यासाठी आम्ही सर्व प्रयत्नशील आहोत. त्यामुळे असे उपक्रम राबविन्या साठी आम्ही नेहमी पुढाकार घेत असतो. गोसेवा ही महत्वाची सेवा आहे आणि त्याला जोड हरित सेवेची मिळत आहे आणि अश्या उपक्रमातून अनेक सेवांना चालना मिळते असे पोलिस उपअधीक्षक पुरी यांनी यावेळी आपल्या भाषणात म्हटले. यावेळी सोलापूर ग्रामीणचे पोलिस उपअधिक्षक विजयालक्ष्मी पुरी, महा एनजीओ फेडरेशनचे संचालक अमोल उंबरजे, क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव, इको नेचर क्लब मुख्य प्रवर्तक व पर्यावरण दूत डॉ मनोज देवकर, गोशाळा महासंघचे महेश भंडारी आणि प्रकाश वैद्य, महेश देवकर, पशुसंवर्धन खात्याचे डॉ. गिड्डे राम हुंडारे, विजय जाधव, अभिषेक उंबरजे, उद्योजक लक्ष्मण कोळी, मदन पवार, राजेंद्र असादे, गणेश माने, महिला समन्वयक अश्विनी भोसले, उमा दिगीनाल, संजय पाल, मुख्याध्यापक कार्तिक चव्हाण, कपिल कोळी, राजेश वडलेश्वर उपस्थित होते.



# नॅब एकात्म विभागात अंध विद्यार्थ्यांनी केले दीपपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जुलै-**

नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड जिल्हा शाखा सोलापूर संचलित चंद्रभागाबाई यलगुलवार प्रशाला व ज्युनिअर कॉलेजशी संलग्न असलेल्या अंध अपंग एकात्म विभागात अंध विद्यार्थ्यांनी केले गतहारी अमावस्या निमित्त दीपपूजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रभागाबाई यलगुलवार प्रशाला व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या सीमा श्रीगोंदेकर-यलगुलवार या होत्या.

याप्रसंगी अंधशिक्षक किशोर कांबळे यांनी आजच्या गतहारी अमावस्येचे धार्मिक तसेच वैज्ञानिक महत्व याप्रसंगी विशद केले.अंधशिक्षिका सुरेखा कांबळे यांनीही याप्रसंगी आजचे दिनविशेष विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमास पर्यवेक्षक डॉ.बंडोपंत पाटील सांस्कृतिक प्रमुख प्रा.जोतिबा काटे, अस्लम मुलाणी व दिव्यांग विद्यार्थी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# सख्या चुलत भावांनीच कार्तिकचा काटा काढल्याचे निष्पन्न

## अनैतिक संबंधास आड येत असल्याने केली हत्या

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२५ जुलै-**

अरण (ता. माढा) येथील कार्तिक बळीराम खंडाळे (वय-१० वर्षे) याचा सख्खे चुलत भाऊ सचिन व संदेश खंडाळे यांनीच काटा काढल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. मयत कार्तिकच्या आईसोबत असलेल्या सचिनच्या अनैतिक संबंधास आड येत असल्याच्या कारणावरून ही हत्या केल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपी सचिन व संदेश खंडाळे यांना माढा न्यायालयाने २६ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

सर्व संतांच्या पालख्या पंढरपूरला विठ्ठलाकडे जातात मात्र श्री. विठ्ठलाची पालखी राज्यात एकमेव ज्या संताच्या गावी जाते त्या श्रीक्षेत्र अरण येथे अशी घटना घडल्याने ग्रामस्थांसह जिल्ह्यातून संताप व्यक्त होत आहे. याबाबत पोलीसांकडील माहितीनुसार, सचिन खंडाळे व मयत कार्तिक खंडाळेच्या आईचे अनैतिक संबंध होते. ते कार्तिकने पाहिले होते. त्याने आपल्या सख्ख्या चुलत भावाला सचिन खंडाळे याला सांगितले होते की मी तुझे नाव माझ्या पप्पांना व आजींना सांगणार आहे. याच गोष्टीचा राग मनात धरून आपली माहिती जर घरी सांगितली तर आपल्या चुलती-पुतण्याच्या नात्याला सर्वजण काळीमा फासतील या भीतीपोटी सचिन खंडाळे (वय- २५ वर्षे) याने कार्तिकचा काटा काढण्याचे ठरवले. यामध्ये चुलत भाऊ संदेश खंडाळे याला सामील करून दोघांनी मिळून आठ दिवस अगोदर कार्तिकला कसा संपवायचा प्लॅन आखला. तो दिवस म्हणजे १५ जुलै २०२५ कार्तिकच्या जीवनाचा अखेरचा दिवस ठरला.



दि. २५ जुलै रोजी कार्तिकला संध्याकाळी सहा वाजून नऊ मिनिटांनी गावातून बाहेर जात असताना संदेश खंडाळे बरोबर कार्तिक सीसीटीव्हीत कैद झाले. तर मोडनिंबमध्ये कार्तिकला नेऊन त्याला भेळ खायला देत असल्याचा सीसीटीव्ही फुटेज कॅमेऱ्यात सहा वाजून ३३ मी ते ५४ मि पर्यंत कैद झाले आहेत. तेथून पुढे ते बैरागवाडीकडे गेल्याचे फुटेज सात वाजून २५ मिनिट मध्ये कैद झाले आहेत. त्यांनी ठरलेल्या प्लॅनप्रमाणे सचिन हा अगोदरच तुळशी या गावी जाऊन थांबला होता. भेळ खात असताना त्याला फोन करून विचारले की किती वेळ लागेल. तेथून कधी निघणार आहे. त्या फोनचाही टेंभुर्णी पोलिसाकडे सीडीआर मिळाला आहे. त्याच पद्धतीने दोघांनी मिळून बैरागवाडी हद्दीतील सिना-माढा कालव्यामध्ये असलेली विद्युत मोटार काढायचे आहे असे सांगून कार्तिकला संदेश त्या दिशेने घेऊन गेला. तोपर्यंत तुळशी गावावरून सचिन खंडाळे येऊन तो सीना माढा कालव्याच्या बाजूला थांबला होता. ठरलेल्या प्लॅनप्रमाणे त्या दोघांनी त्याला कालव्यामध्ये घेऊन गेले. संदेश याने कार्तिकला जोरदार पकडून ठेवले व सचिन खंडाळे यांनी जवळ असलेल्या चाकूने पहिला वार गळ्यावर केला. वार करून त्याचा गळा दाबून खून करून तो कुणाला ओळखू येऊ नये म्हणून त्याला पालथे झोपवून त्याच्याजवळ पडलेल्या चप्पलवर दगड ठेवून त्या ठिकाणहून दोघेजण निघून आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सुतावरून धागा कळतो म्हणल्याप्रमाणे टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण पवार व त्यांच्या टीमने मयत कार्तिक सापडल्यानंतर अवघ्या २४ तासाच्या आत पहिला संशयित आरोपी संदेश खंडाळे याला अटक करून ताब्यात घेतले. माढा न्यायालयासमोर उभे केले असता त्याला तीन दिवस पोलीस कोठडी देण्यात आली. या तपासावरून पुढे सचिन खंडाळे यास अटक करून त्यालाही न्यायालयासमोर उभे केले. न्यायालयाने दोघांना २६ जुलैपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. तपास करण्यास टेंभुर्णी पोलिसांना यश आले आहे.

## महत्वाचे...



### सोजर स्कूलमध्ये लोकमान्य टिळक जयंती साजरी

**बार्शी, दि. २५ जुलै-**

भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची १६९ वी जयंती सोजर इंग्लिश स्कूल येथे साजरी करण्यात आली. यावेळी सर्व शिक्षक बंधू-भगिनी आणि विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापिका रिटा नेटके यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी लोकमान्य टिळकांचे स्वातंत्र्य चळवळीत असलेले योगदान आणि कार्य याची माहिती सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रसाद सहस्त्रबुध्दे यांनी सांगितली.



### उर्दू शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

**अक्कलकोट, दि. २५ जुलै-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त उर्दू शाळा कारंजा चौक येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप भाजपा अल्पसंख्याक सेलचे सदस्य बुडन तांबोळी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुस्लिम समाजाचे जमात अध्यक्ष शकूर शेख सामाजिक कार्यकर्ते ज्योतिबा पारखे शाळेचे मुख्याध्यापक खालीद खान नबीलाल तांबोळी हुसेन बळुर्गी, पवार, सुरेश जाधव, हनुमंत जाधव, सलीम गवंडी, पठाण, नजीम सईद, मौला सुतार, लाला शेख, खान अब्दुल, रहीम शेख, शाईन शेख, वाहिदा शेख, शहनाज शेख, तस्लिम सगळी, नाझिया दंडोती उपस्थित होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्य शालेय साहित्याचे वाटप कार्यक्रम राबविण्यात आला.



### 'रत्नाई'च्या कृषीकन्यांकडून क्लीन मिल्क प्रोडक्शनचे मार्गदर्शन

**वेळापूर, दि. २५ जुलै-**

वेळापूर (ता. माळशिरस) महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, संलग्नित शिक्षण प्रसारक मंडळ,अकलूज संचलित रत्नाई कृषी महाविद्यालय, अकलूज येथील कृषी कन्यांनी शेतकऱ्यांना क्लीन मिल्क प्रोडक्शनबद्दल मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी दूध काढण्याच्या वेळेस कोणती काळजी घ्यावी? जनावरांच्या कासेला मस्टाईटीस हा होणारा आजार व त्याची पडताळणी कशी करावी. त्याचबरोबर त्या आजाराची काळजी कशी घ्यावी व त्या आजाराचे निवारण कसे करावे याबद्दलही कृषी कन्यांनी शेतकऱ्यांना सांगितले. यावेळी क्लीन मिल्क प्रोडक्शनचे प्रात्यक्षिक प्रत्यक्ष शेतकऱ्यांना करून दाखविले व त्याबद्दल मार्गदर्शनही केले. अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते- पाटील, रत्नाई कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य. आर. जी. नलावडे, कार्यक्रम समन्वयक प्रा.एस.एम एकतपुरे,कार्यक्रम अधिकारी प्रा.एम.एम चंदनकर व कार्यक्रम अधिकारी प्रा.एच.व्ही कल्याणी त्याचबरोबर विषय तज्ञ मार्गदर्शक प्रा. डी.एस मेटकरी यांच्या मार्गदर्शनाखाली कृषिकन्या आरती मंडले, मोहिनी कानडे,वैष्णवी हिवरकर, योगेश्वरी मदने, अनुपमा गोसावी, प्राजक्ता जाधव, राजनंदिनी डिकोळे, सिद्धी पाटील, अनघा फरांदे इत्यादी कृषी कन्यांनी शेतकऱ्यांना क्लीन मिल्क प्रोडक्शन चे महत्व पटवून दिले. यावेळी महादेव ताटे, आकाश भानवसे, रमेश बनकर, भीष्माचार्य कुदळे, चंद्रकांत नवले, म्हाळी बाबा म्हेत्रे, शिवाजी शिंदे, विठ्ठल म्हेत्रे उपस्थित होते.



### लोकविकास इंग्लिश स्कूलमध्ये लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी

**वेळापूर, दि. २५ जुलै-**

लोकविकास इंग्लिश स्कूल मध्ये लोकमान्य टिळक यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन अश्विनी शिंदे व राणी शिंदे यांनी केले. इयत्ता चौथी मधील विद्यार्थी अथर्व जाधव व शुभ्रा माने यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच ज्योती गाडेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक अजित बनकर, वैभव जगताप, वैशाली आदलिंगे, पूजा कुदळे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रियंका अनंतकवळस तर आभार उषा राऊत यांनी मानले.

# मोहोळ येथे वीज मंडळ उपविभागीय कार्यालयाची मागणी

## व्यवस्थापकीय संचालकांना दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२५ जुलै-**

वीज मंडळाचा कारभार सोयिस्कर व्हावा आणि नागरिकांची सोय व्हावी यासाठी पंढरपूर येथे नवीन मंडल कार्यालय आणि मोहोळ येथे नवीन उपविभागीय कार्यालय करावे अशा मागणीचे निवेदन मोहोळ भाजपाच्या वतीने महाराष्ट्र वीज वितरण मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा यांना निवेदन देण्यात आले.

भाजपाचे प्रज्ञावंत आघाडीचे माजी जिल्हा सहसंयोजक अविनाश पांढरे यांनी हे निवेदन दिले. यावेळी भाजपचे तालुका संघटन सरचिटणीस महेश सोवनी, मनसे मोहोळ शहराध्यक्ष शाहूराजे देशमुख, भारतीय मजदूर संघाचे तालुका अध्यक्ष मच्छिंद्र गाडे -पाटील, तानाजी माने, युवा नेते आनंद कुचेकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, २०१२ मध्ये मोहोळ तालुक्यातील वाढता कार्यभार लक्षात घेता अजून एक उपविभागीय कार्यालय मंजूर झाले होते. परंतु नेत्यांचा व सर्वसामान्य जनतेचा पाठपुरावा कमी पडल्याने दुर्दैवाने



ते रद्द झाले. हे कार्यालय पुन्हा मंजूर होऊन शहरातील मोहोळ एमएसईबी ऑफिस या नावाने ओळख असणाऱ्या जुन्या उपविभागीय कार्यालयाच्या आवारातच चालू करण्यात यावे. त्याचबरोबर जिल्ह्यातील महावितरणचा वाढता कार्यभार लक्षात घेऊन २०१९ मध्ये सोलापूर मंडल कार्यालयाचे विभाजन करून नवीन पंढरपूर मंडल कार्यालय तयार करण्याचा प्रस्ताव महावितरणच्या मुख्य कार्यालयास सादर करण्यात आला होता. अद्याप या प्रस्तावावर कोणताही निर्णय घेतला गेलेला नाही. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मंजूर करून सोलापूर जिल्ह्यासाठी आणखीन एक मंडल कार्यालय पंढरपूर येथे सुरू करण्यात यावे अशी मागणीही या निवेदनात करण्यात आली आहे.

# बंडा जोशींच्या हास्यवर्षावात रसिक चिंब

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२५ जुलै-**

ईश्वराने सर्व प्राणिमात्रात फक्त माणसाला दिलेली हास्य ही एक अनमोल देणगी आहे. अशा हास्य मैफिलीची अनुभुती सुप्रसिद्ध हास्यकवी व एकपात्री कलाकार बंडा जोशी यांच्या हास्यपंचमीने बार्शीकरांसह मायबोलीच्या रसिक सभासदांना दिली.

मोरया फंक्शन हॉल येथे मायबोली सांस्कृतिक मंडळाने हा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीपासूनच बंडाजींनी प्रेक्षकांवर पकड मिळविली. रोजच्या साध्या गोष्टींमधले नर्मविनोद दाखवून, काही सामाजिक, काही कौटुंबिक विनोद, सुप्रसिद्ध हिंदी व मराठी गाण्यांचे अप्रतिम विडंबन, काही धमाल किस्से अशा हास्यवर्षावात त्यांनी मायबोलीच्या रसिकांना चिंब केले. सलग पावणेदोन तास, मध्यंतर न



घेता आणि विशेष म्हणजे पाणीही न पिता या वयात इतका यशस्वी कार्यक्रम सादर करणे म्हणजे कलाकाराची तपस्याच असते आणि ती बंडा जोशी यांनी लीलया करुन दाखवली.

दरम्यान दीपप्रज्वलन व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली आणि मायबोलीचे संस्थापक अध्यक्ष स्व. विजूभाई माढेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरूवात झाली. मंडळाचे उपाध्यक्ष जवाहर माढेकर व संचालक अरुण शहा यांच्या हस्ते श्री. जोशी यांचा सत्कारी झाला. सचिव डॉ. प्रशांत मोहिरे यांनी प्रास्ताविक केले. कोषाध्यक्ष व्यंकटेश कुलकर्णी यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. सहकोषाध्यक्ष राजेंद्र श्रीश्रीमाळ यांनी आभार मानले. डॉ वैशाली मोहिरे व पल्लवी माढेकर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी सभासदांना ओळखपत्राचे वाटप करण्यात आले. त्यासाठी गोविंद बाफना, अतुल माढेकर, आनंद बेदमुथा व सचिन माढेकर यांनी मोलाची मदत केली. अध्यक्ष मुकुंदराज कुलकर्णी, जितेंद्र माढेकर, सुनिल पाटील, निलेश माढेकर यांनी परिश्रम घेतले.

# शारदादेवी प्रशालेत पोलीस स्टेशनच्या वतीने मार्गदर्शन मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि. २५ जुलै-**

शारदादेवी प्रशाला वैराग येथे मुलींसाठी मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे प्रतिमेचे पूजन पोलीस निरीक्षक कुंदन गावडे तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला. यावेळी वैराग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे म्हणाले, सोशल मीडियाचा कामापुरता वापर



करावा तसेच मुलींनी कोणत्याही भूलथापांना बळी न पडता एकदम सावधगिरीने कोणताही निर्णय घेतला पाहिजे. अभ्यासावरती लक्ष केंद्रित करून आपल्या आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करा. विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा अभियाना विषयी मार्गदर्शन केले, तसेच विद्यार्थ्यांना व्यसनापासून लांब राहण्याचे देखील त्यांनी आवाहन केले. यावेळी गोपीनीय विभागाचे किसन कोलते, मुख्याध्यापक संतोष सरवळे, कालिदास देवकते, वैशाली जिरंगे, शशिकला पाटील, शुभम घायतीडक प्रताप खेंदाड,किरण निंबाळकर, रंजना शिंदे, करपे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रास्ताविक तसेच आभार कालिदास देवकते यांनी मानले.

# चिखलठाण परिसरातील शिवसेनेच्या (शिंदे गट) चार शाखांचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २५ जुलै-**

करमाळा तालुक्यात चिखलठाण परिसरातील शिवसेनेच्या चार शाखांचे उद्घाटन शिवसेना नेते दिग्विजय बागल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी करमाळा तालुक्यातील प्रत्येक गावात गाव तिथे शाखा सुरू करण्यात येणार असून याद्वारे लोकांच्या विविध समस्या सोडवण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन बागल यांनी चिखलठाण येथील मुख्य कार्यक्रमात बोलताना केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदिनाथ कारखान्याचे माजी उपाध्यक्ष केरू गव्हाणे होते. परिसरातील केडगाव कुगाव चिखलठाण नंबर दोन व चिखलठाण नंबर एक येथील चार शाखांचे उद्घाटन करण्यात आले. चिखलठाण येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरासमोरील सभागृहात झालेल्या मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रास्ताविक मच्छिंद्र सरडे यांनी केले यावेळी मकाई कारखान्याचे संचालक दिनकर सरडे केरू गव्हाणे यांची भाषणे झाली. उपस्थित मान्यवरांचे स्वागत चिखलठाणचे उपसरपंच अक्षय सरडे, राहुल गोळे, समाधान गव्हाणे, शशिकांत गव्हाणे, स्वस्तिक नलावडे, ॲड. दिगंबर साळूंके यांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन श्रीपाल गव्हाणे यांनी केले. या कार्यक्रमाला आदिनाथचे माजी चेअरमन धनंजय डोंगरे मकाई कारखान्याचे संचालक सतीश निळ राजेंद्र मोहोळकर युवराज रोकडे, गणेश तळेकर, सरडे भाऊसाहेब, विष्णू चव्हाण, दत्तात्रय सरडे शेटफळचे माजी सरपंच मुरलीधर पोळ केशव बोराडे, प्रकाश डोंगरे महेश पोळ, दत्तात्रय शंकर प्रसाद सरडे, स्वास्तिक नलावडे, अनिकेत वीर, रणजीत गव्हाणे, स्वप्निल गोळे धिरज सरडे, सत्यम रोकडे उपस्थित होते

# सांगोल्यातील पाच ग्रामपंचायतींना इमारत निधी मंजूर

## आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या मागणीला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २५ जुलै-**

सांगोला विधानसभा मतदारसंघातील जुनोनी, घेरडी, आलेगाव, वासूद आणि पाचेगाव बु या पाच ग्रामपंचायतींना पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत नविन ग्रामपंचायत इमारत बांधण्यासाठी प्रत्येकी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या मागणीला यश मिळाले आहे. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची यशस्वीपणे अंमलबजावणी करणाऱ्या ग्रामपंचायतींना स्वतंत्र, सूसज्ज कार्यालयीन इमारत मिळावी. नागरिकांना चांगली सेवा मिळावी, या उद्देशातून आ.देशमुख यांनी शासनाकडे पाठपुरावा केला होता.

ग्रामपंचायत प्रशासनाचा कार्यभार व्यवस्थित पार पाडण्यासाठी ग्रामपंचायतींना नवीन इमारतीची आवश्यकता



होती. महाराष्ट्र राज्य ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे आ.डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी ग्रामपंचायतींना इमारत बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा ही मागणी अधिवेशनापूर्वी केली होती. या मागणीची दखल घेत ना. जयकुमार गोरे यांनी तत्काळ या ग्राम पंचायतींना पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत निधी मंजूर केला असून निधी मंजूर केल्याबद्दल आ. देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांच्यासह सोलापूर जिल्हा पालकमंत्री ना. जयकुमार गोरे यांचे आभार मानले.

# विट्ठल-रुक्मिणी प्रथम तर सरस्वती भजनी मंडळ द्वितीय

## बार्शीत महिला भजनी मंडळाच्या भजन स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ जुलै-**

श्रीहरी महिला भजन मंडळाने गुरुपौर्णिमेचा निमित्ताने घेण्यात आलेल्या भजन स्पर्धेत १६ महिला भजनी मंडळाने सहभाग नोंदवला.

अध्यक्षस्थानी प.पू. सदगुरु राघव चैतन्य बाबा महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी भाविक, महिला मंडळांच्या सदस्या व विविध भजन मंडळांचे कलाकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भजन स्पर्धेत सहभागी झालेल्या विविध भजन मंडळांनी सुंदर रचना, तान, ताल व भक्तिपूर्ण सादरीकरणाद्वारे रसिकांची मने जिंकली. प्रत्येक सादरीकरणाला उपस्थितांकडून टाळ्यांच्या गजरात भरभरून दाद मिळाली. प्रत्येक मंडळावर फुलांचा वर्षाव करुन त्यांचे



स्वागत केले.स्पर्धा शिस्तबद्ध आणि भक्तिपर वातावरणात पार पडल्या. स्पर्धेत विठ्ठल रुक्मिणी भजनी मंडळ प्रथम सरस्वती भजनी मंडळ द्वितीय,व्यंकटेश भजनी मंडळ, तृतीय तर जनाबाई व जय हनुमान भजनी मंडळाला उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. विजेत्या भजन मंडळांना सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. उत्कृष्ट हार्मोनियम वादक म्हणून सिद्धेश्वर मोरे महाराज आणि तबला वादक म्हणून कोकाटे यांचा सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचालन वैशाली सोनवणे, प्रस्ताविक ज्योती लोळगे व मोहिनी चौधरी यांनी केले तर आभार गुरव यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीहरी महिला भजन मंडळाच्या सदस्या शोभा डिसले, सुवर्णा पवार, ज्योती लोळगे, सुरेखा आगलावे, मंदाकिनी मोरे, राजश्री धस, सुक्षाला पवार, नीता कानकात्रे, राजश्री कातुरे, वैशाली सोनवणे, वैशाली देशमुख, मोहिनी चौधरी यांनी परिश्रम घेतले.

# बार्शीत लिंगायत व जंगम समाज पोटजातींचा उद्या वधू-वर परिचय मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै-**

अनुरूप वधु वर सुचक केंद्र, सोलापूर च्या वतीने वीरशैव लिंगायत व जंगम समाजातील सर्व पोटजातींचा रविवार दि. २७ जुलै रोजी मोरया फंक्शन हॉल, सुभाष नगर, १४ नंबर शाळेजवळ, बार्शी, येथे सकाळी १० वा. राज्यस्तरीय प्रथम, घटस्फोटीत, विधवा, पुनर्विवाह, इच्छुक वधू- वरांचा राज्यस्तरीय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. बार्शी शहरातील प्रसिद्ध व्यापारी बाबासाहेब कथले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. मेळावा मोफत असून मेळाव्यातील नोंदणी धारकांना सशुल्क रंगीत पुस्तिका घरपोच देण्यात येणार आहे. मेळाव्यातील नाव नोंदणीसाठी कार्यक्रमाच्या ठिकाणी सकाळी दहा ते बारा या वेळेत नोंदणी करता येईल. पालकांनी उपवर मुला-मुलीसह एक फोटो व बायोडाटा सोबत घेऊन यावयाचा आहे. मेळाव्यात अल्पोपहार ची व्यवस्था करण्यात आली आहे. कार्यक्रमात उपस्थित वधू-वरांचा परिचय करून देण्यात येणार आहे. मेळाव्याची नोंदणी चालू असून पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, कोकण, तेलंगणा, कर्नाटक, येथील वधू-वरांनी नोंदणी केली आहे. अधिक माहितीसाठी अनुरूप वधु वर सुचक केंद्र,ए.डि. जोशी पेट्रोल पंपा जवळ, जुळे सोलापूर , सोलापूर येथील कार्यालयात किंवा भ्रमणध्वनी क्रमांक ९८८११३३१२२ वरती संपर्क साधावा असे आवाहन एस. एम. गणाचार्य यांनी केले आहे.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बार्शीत आज कृषी प्रशिक्षण कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ जुलै**

मिशन विकसित गाव अभियानांतर्गत शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आणि शेतीच्या प्रगतीसाठी बार्शी शहर पोलीस ठाणे हद्दीत आज दि.२६ जुलै रोजी सकाळी १० वा. यशवंतराव चव्हाण सभागृहात कृषी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यशाळेत द्राक्ष, ऊस, कांदा, उडीद आणि तूर या पिकांच्या उत्पादक शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन आणि उत्पादन वाढीच्या नाविन्यपूर्ण पद्धतींविषयी तज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. कार्यशाळेचे आयोजन बार्शी शहर पोलीस ठाणे, बार्शी तालुका पोलीस ठाणे आणि पांगरी पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. कार्यक्रमात सांगली येथील विज्ञान संत अंकुश पाटील आणि श्रविद्यासागर कोळी हे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. हे दोन्ही तज्ञ शेती क्षेत्रातील आपल्या व्यापक अनुभव आणि ज्ञानामुळे शेतकरी वर्गात सुपरिचित आहेत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे शेतकऱ्यांना कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादन कसे घेता येईल, याबाबत व्यावहारिक आणि वैज्ञानिक माहिती मिळणार आहे.



### महत्वाचे...



## अकलूज येथे नवीन पासपोर्ट सेवा केंद्र स्थापन करा : खा.मोहिते-पाटील

**अकलूज, दि. २५ जुलै-**

माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केंद्रीय संचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांची नवी दिल्ली येथे भेट घेऊन अकलूज येथे पासपोर्ट सेवा केंद्र (पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र-POPSK) स्थापन करण्याची मागणी केली. खासदार मोहिते-पाटील यांनी सांगितले की, अकलूज हे सोलापूर जिल्ह्यातील एक महत्त्वाचे व्यापारी आणि शैक्षणिक केंद्र आहे. सध्या अकलूजमध्ये पासपोर्ट सेवा उपलब्ध नसल्याने माळशिरस तालुक्यातील सीमावर्ती भगातून स्थानिक नागरिकांना माढा (१०० किमी) दूर असलेलेया केंद्रांवर जावे लागते. या केंद्रांवर अतिरिक्त ताण असल्याने अपॉइंटमेंटसाठी १५ दिवसांहून अधिक प्रतीक्षा करावी लागत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो, ज्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही खर्च होतो. अकलूज येथे पासपोर्ट सेवा केंद्र उपलब्ध झाल्यास नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, विशेषतः विद्यार्थी, व्यावसायिक आणि परदेशात नोकरीसाठी जाणाऱ्या तरुणांना याचा फायदा होईल. यावेळी केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी या मागणीचा सकारात्मक विचार करून लवकरात लवकर आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. या भेटीमुळे अकलूज आणि परिसरातील नागरिकांमध्ये नवीन पासपोर्ट सेवा केंद्र सुरू होण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.



## आ. अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त लसीकरण शिबीर

**माढा, दि. २५ जुलै-**

आमदार अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जनावरांच्या लसीकरण शिबीराचे आयोजन आमदार अभिजीत पाटील युवा मंचाच्या वतीने करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. २५ जुलै रोजी उंदरगाव येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या पहिल्या दिवशी ९० ते ९५ जनावरांना लस टोचण्यात आली. हे शिबिर सलग पाच दिवस माढा परिसरातील गावात राबवले जाणार आहे. या शिबिराला ऋषिकेश तांबिले समाधान मस्के राजा मस्के, हिंदू आरे, रवी चव्हाण, प्रवीण तांबिले, संजय तांबिले, अतुल नाईकवाडे, रमेश तांबिले, सुनील लोंढे, सिद्धेश्वर नाईकवाडे, छगन नाईकवाडे, बाळू सय्यद, अमित लटके, सत्यवान लटके, सुनील पाटील, यशवंत आरे, प्रणव तांबिले, प्रकाश शिंदे, डॉ.आय.डी. शेख तालुका विस्तार अधिकारी डॉ. शुभम डोरले, डॉ.ऋषिकेश लटके, डॉ. जयदीप आरे, डॉ. वैभव अनंतकवळस उपस्थित होते.




## मुख्यमंत्री वाढदिनानिमित्त ग्रामीण जिल्ह्यात दोन हजार ७७७ जणांचे रक्तदान

**सांगोला, दि. २५ जुलै-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांच्या नेतृत्वाखाली २ हजार ७७७ जणांनी विक्रमी रक्तदान केले. एकूण १६ ठिकाणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. वाढदिवसानिमित्त सेवाकार्यातून देशसेवेसाठी रक्तदान शिबिरे आणि समाजोपयोगी उपक्रम राबवावेत असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. या आवाहनाला प्रतिसाद सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात चेतनसिंह केदार सावंत यांच्या नेतृत्वाखाली १६ ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बार्शी १०१५, करमाळा ७११, सांगोला ३६५, माळशिरस ३३०, माढा २५२, करकंब १०४ अशा २७७७ जणांनी रक्तदान करून मुख्यमंत्री फडणवीस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या असल्याची माहिती चेतनसिंह केदार-सावंत यांनी दिली.






# कॉरिडॉरबाबत प्रशासनाकडून संवादास सुरुवात; पहिल्या दिवशी ३१० बाधितांशी साधला संवाद

### ● रस्ता रुंदीकरण करा, मात्र 'कॉरिडॉर नको; नागरिकांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२५ जुलै -**

शासनाने उज्जैन व वाराणसीच्या धर्तीवर पंढरपुरात कॉरिडॉर करण्याचा निर्णय घेतला आहे. संभाव्य बाधितांशी चर्चा तसेच भुसंपादन करण्यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. शुक्रवार (ता.२५ जुलै) पासून मालमत्ता धारकांची बैठक घेण्यात येत आहे. यावेळी मालमत्ताधारकांनी आम्हाला कॉरिडॉर नको आहे. दोन दिवसांच्या आषाढी यात्रेसाठी आमची घरेदारे का पाडता असा सवाल केला. या बरोबरच कॉरिडॉर ऐवजी रस्ता रुंदीकरण करा, मात्र कॉरिडॉर राबवू नका व आमची घरे पाडू नका, अशी मागणी केली आहे.

बैठकीला उपस्थित राहण्यासाठी नगरपरिषदेने मालमत्ता धारकांना नोटीस बजावली. संभाव्य कॉरिडॉर बाधितांशी चर्चा करण्यासाठी प्रशासनाकडून आयोजिण्यात आलेल्या बैठकांना सुरुवात झाली आहे. येथील नगरपरिषद सभागृहामध्ये भूसंपादन उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख, मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्या उपस्थितीत मालमत्ता धारकांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत अधिकाऱ्यांनी मालमत्ताधारकांना चांगला मोबदला देण्यात येणार आहे. भाडेकरूंना तुम्ही काही देण्याची गरज नाही, आम्ही भाडेकरूंना देखील मोबदला देणार आहोत असे सांगितले. याबरोबरच कॉरिडॉर व पंढरपूर विकास आराखडा हा एकाचवेळी ऑगस्टमध्ये राबविण्यात येणार आहे. याचे गॅझेटही प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे देशमुख यांनी सांगितले. मात्र यावेळी मालमत्ता धारकांनी मंदिर परिसरात रस्ता रुंदीकरण करा, मात्र कॉरिडॉरमध्ये आमची घरेदारे पाडू नका अशी भूमिका घेतली आहे. यामुळे आता शासन व मालमत्ताधारक कोणती भूमिका घेणार, याकडे लक्ष लागले आहे.

**चर्चेसाठी या आधिकाऱ्यांची केली नेमणूक**

२५ जुलै ते ५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत बैठकांचे आयोजन आहे. चर्चेसाठी भुसंपादन अधिकारी संतोष देशमुख, भुसंपादन अधिकारी सीमा होळकर व जिल्हा पुर्नवसन अधिकारी सुशांत बनसोडे यांची खास नियुक्ती केली आहे. सोबतच पालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांची देखील उपस्थिती आहे. पहिल्या दिवशी तीन बैठकांच्या माध्यमातून ३१० बाधितांशी संवाद साधला.

**नागरिकांचा नकोचाच सूर**

नागरिकांनी यापूर्वी मे महिन्या मध्ये झालेल्या बैठकी मध्ये जसे सांगितले होते की, आम्हाला कॉरिडॉर नको वैगेरे अशा प्रकारच्या तक्रारी किंवा असा सूर आज देखील लावला आहे. मात्र आम्ही त्यांच्या भावना समजून घेतो आहे. की नेमके कोणत्या कारणामुळे संभाव्य बाधित नागरिक असे बोलत आहेत असेही चर्चेसाठी उपस्थित आधिकाऱ्यांनी सांगितले.

**कॉरिडॉर करणे शासनाच्या दृष्टीने का गरजेचे आहे**

काही गोष्टी आपल्या नजरे समोर दिसत नाहीत. पण जेव्हा भविष्यात आपल्याला पाहायचे आहे तेव्हा वीस,तीस वर्षानंतर काय परिस्थिती असणार आहे याचा अंदाज आज बांधणे कठीण आहे. त्या भूमिकेतून शासनाने हा विचार केला आहे की कॉरिडॉर करणे गरजेचे आहे. तर तो चांगल्या पध्दतीने कसा करता येईल हा प्रशासनाचा एक प्रयत्न आहे.

**अशी असेल एकुणच प्रक्रिया :** पंढरपूर शहराचा एक विकास आराखडा मंजुर झाला आहे. या अगोदर मे महिन्यात देखील एक मंजुर झालेला आहे. पण त्यामध्ये कॉरिडॉरचा समावेश नाही. तो करण्यासाठीची जी प्रक्रिया आहे ती आम्ही ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून सुरु करणार आहोत. आराखड्याचे पेपर मध्ये नोटीफिकेशन येईल, गॅझेट पब्लिकेशन होईल लोकांना एक महिना त्याच्यामध्ये हरकती आणि सुनावण्यासाठी संधी किंवा वेळ दिला जाईल. त्याच्यावर सुनावणी होईल. त्यापुढे ऑब्जेक्शन दाखल करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी असेल. त्या ऑब्जेक्शनवर जवळपास दहा दिवस सुनावण्या होतील. त्या नगरपालिकेमध्येच होतील. त्यानंतर निर्णय होवून आराखड्यात बदल होतील हा पहिला टप्पा असेल. दुसरा टप्पा तो म्हणजे भुसंपादनाचा, एकदा आराखड्यात बदल झाल्यानंतर नगरपालिका भुसंपादनाचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाला देईल आणि त्या नंतर लोकांचा जो प्रश्न आहे आम्हाला किती मोबदला मिळणार त्याचे उत्तर मिळू शकेल. तो भुसंपादन प्रक्रियेचा भाग आहे. पण आम्ही यावर आत्तापासूनच काम करीत आहोत. लोकांना किती आणि का मोबदला हवा आहे ? लोकांचे मोबदल्याचे जस्टीफिकेशन काय आहे हे आम्हाला वरिष्ठांना पटवून देण्यासाठी या माहितीचे कलेक्शन आहे. त्यामुळे बाधित मंडळींनी जास्तीत जास्त माहिती किंवा डाटा आम्हाला चांगला द्या की आम्ही त्याला रिफाईन करु, रिटेन करु आणि वरिष्ठांपर्यंत हे म्हणणे मांडू असेही भूसंपादन आधिकारी देशमुख यांनी सांगितले.

> जिल्हा प्रशासन आणि पंढरपूर नगरपालिका प्रशासनाच्या वतीने प्रास्तावित कॉरिडॉर मधील संभाव्य बाधित नागरिकांशी चर्चा केली. आठ दिवस प्रत्येक ग्रुप मध्ये पंचवीस जणांचा समावेश करुन त्यांच्या सोबत चर्चा केली जाणार आहे. छोट्या गटामुळे बाधित लोकांना त्यांचे प्रश्न अधिक चांगल्या प्रकारे मांडता येतात. आम्हाला त्यांचा खरोखर एप्रोच काय आहे ते समजते. आम्ही कशा पध्दतीने प्रस्तावित कॉरिडॉर मध्ये कारवाई करणार आहोत याची कल्पना देणे हा ही त्याचा एक उद्देश होता. सोबतच इथे मोबदला काय दिला जाणार आहे. ते असेसमेंट करणे आणि त्याला पुर्नवसन पँकेजच्या माध्यमातून कशा पध्दतीने कॉम्पेनसेट करता येईल यावर चर्चा करण्यासाठी आमच्या या सभा आहेत. कॉरिडॉरची चांगल्या पध्दतीने कशी अंमलबजावणी करता येईल हाच प्रशासनाचा या बैठकीतून प्रयत्न आहे आणि ही त्याची सुरुवात आहे. दिवसभरात तीन बैठकांचे आयोजन करण्यात आलेले आहे. अशा बैठकांमधून जर आम्हाला इनपुट चांगले मिळाले तर आमच्याकडून देखील आऊटपुट चांगला मिळेल याचा आम्हाला विश्वास आहे.
>
> **– संतोष देशमुख, उपजिल्हाधिकारी.**

## खचलेल्या डिकसळ पुलाची आ. नारायण पाटलांकडून पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि. २५ जुलै-**

सोलापूर व पुणे जिल्ह्यास जोडणारा उजनी जलाशयावर असलेला डिकसळ पुल खचल्याने दोन जिल्ह्यांमध्ये असलेला या भागातील संपर्क तुटला. उजनीच्या पातळीत वाढ झाल्याने हा पूल खचला गेला. आमदार नारायण आबा पाटील यांनी हे वृत्त समजताच तातडीने पुलाची प्रत्यक्ष कार्यस्थळावर जाऊन पाहणी केली.



यावेळी त्यांच्या समवेत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना सुध्दा बरोबर घेतले. काही दिवसांपूर्वी आमदार नारायण आबा पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे उजनी जलाशयावर बांधण्यात येणाऱ्या पुलांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केला जावा अशी मागणी केली होती. नुकत्याच झालेल्या विधानसभा अधिवेशनात सुध्दा आमदार नारायण आबा पाटील यांनी हा प्रश्न लावून धरला. एकतर डिकसळ पुल हा सर्वात जुना ब्रिटिश कालीन पुल आहे. यास पर्याय म्हणून नवीन पुल मंजूर आहे.तसेच या जुन्या पुलाचे ऑडीट शासनाकडून केले गेले आहे. यामुळे सध्याचे दळणवळणाचे एकमेव साधन म्हणुन डिकसळ पुल उरला होता. आता या भागातील नागरिकांना दळणवळणाची सोय उरली नाही. यामुळे हा डिकसळ पुल तातडीने दुरुस्त केला जावा व नव्या पुलाचे काम युद्ध पातळीवर पुर्ण केले जावे ही नागरिकांनी मागणी केली. आ. पाटील यांनी कार्यतत्परता दाखवत तातडीने या पुलाची पाहणी केली व नागरिकांना धीर दिला. तसेच पुढील कामे तातडीने पुर्ण करण्याची सूचना अधिकाऱ्यांना दिली.

यावेळी किरण कवडे, नवनाथ बापू, नागनाथ लकडे, ज्ञानेश्वर दोडमिसे सरपंच टाकळी, राजेश साळुंखे, आनासाहेब गलांडे, नीलकंठ शिंदे, रवी खांडेकर, डॉ. पाटील, दिलीप काका गलांडे, सुरेश कांबळे, उत्तम गलांडे, आनंद धांडे, किशोर खांडेकर, अमोल गलांडे ,चंद्रकांत पाडुळे, रणजित गलांडे, सचिन गोडगे, राजेंद्र गोडसे, रवींद्र मोरे, शेंडगे बापू उपस्थित होते.




## सीआयडी तपासासाठी अरण येथे रस्तारोको

### ● कार्तिक खंडाळे हत्याप्रकरण; संघटनांकडून निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२५ जुलै-**

माढा तालुक्यातील कार्तिक खंडाळे हत्या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे द्यावा या प्रमुख मागणीसाठी सोलापूर-पुणे महामार्गावर अरण येथे सुमारे पाऊण तास 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात आले.

यावेळी विविध संघटनाच्या पदाधिकाऱ्यांनी हत्या प्रकरणाचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला.मंगळवार (दि.१५) रोजी कार्तिक बळीराम खंडाळे हा मुलगा बेपत्ता झाला असल्याची घटना घडली होती.

विविध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी प्रशासनाने योग्य प्रकारे तपास न केल्याने तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. कार्तिक खंडाळे ला न्याय मिळेपर्यंत सर्व संघटना लढणार असल्याचे सांगण्यात आले. कार्तिक खंडाळे ला न्याय मिळावा या मागणीसाठी यावेळी पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले. कोणत्याही अनुचित प्रकार होऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाचा मोठा फौज फाटा बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आला होता. या आंदोलनात महिलांसह शेकडो नागरिक सहभागी झाले होते. महामार्गावर दोन्ही बाजूला सुमारे दोन किलोमीटर पर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास रास्ता रोको आंदोलन सुरू करण्यात आले. दीपक ताकतोडे, नागनाथ ओहोळ, प्रशांत गिड्डे, सुनील ओहोळ यांच्यासह विविध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची भाषणे झाली.

## स्वेरी ज्ञानसंस्कृतीचा पॅटर्न आता एसव्हीआयटीमध्ये राबविणार

### ● एसव्हीआयटीमध्ये नवे पदवी अभ्यासक्रम उपलब्ध
### ● स्वरीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. बी. पी. रोंगे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै-**

पंढरपूरच्या स्वेरी ज्ञानसंस्कृतीचा पॅटर्न आता उत्तर सोलापूर तालुक्यातील खेड येथील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये (एसव्हीआयटी) राबविण्यात येत आहे.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून एसव्हीआयटीमध्ये विविध सहा पदवी अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे, अशी माहिती स्वेरीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. बी. पी. रोंगे यांनी पत्रकार परिषदेत दिली. शुक्रवार दि. २५ जुलै रोजी सोलापुरातील एसव्हीआयटी येथे स्वेरी पंढरपूरच्या शैक्षणिक परंपरेचा सोलापूरमध्ये औपचारिक प्रवेश कार्यक्रम उत्साहात पार पडला. त्यानंतर पत्रकार परिषदेत डॉ. रोंगे यांनी संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीची माहिती दिली. पंढरपुरातील गोपाळपूरच्या माळरानावर १९९८ साली सुरू झालेल्या स्वेरी (श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट) या संस्थेने ग्रामीण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची दारे खुली केली. डॉ. रोंगे यांच्या नेतृत्वाखाली पंढरपूर पॅटर्न नावाचा एक अनोखा शिक्षणक्रम साकार झाला आहे. जिथे गुणवत्ता, शिस्त आणि संस्कार एकत्र नांदतात. आदर आणि शिस्त ही स्वेरीची ज्ञान संस्कृती आहे. आता या पॅटर्नचा विस्तार सोलापूर जिल्ह्यातील एसव्हीआयटीच्या माध्यमातून होत आहे. सन २०२५ - २६ या शैक्षणिक वर्षापासूनच एसव्हीआयटी मध्ये पदवी अभ्यासक्रमाची नवीन सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे सोलापुरातील विद्यार्थ्यांना पुणे, मुंबईला न जाता दर्जेदार शिक्षणाची संधी इथे मिळणार आहे. या शैक्षणिक वर्षापासून एसव्हीआयटीमध्ये इंजिनिअरिंग शाखेत कॉम्प्युटर सायन्स (१२० जागा), इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रिकल इंजीनियरिंग, आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन (प्रत्येकी ६० जागा), तर व्यवस्थापन शाखेत एमबीए, एमसीए (प्रत्येकी ६० जागा) उपलब्ध आहेत.



संस्थेत आधुनिक प्रयोगशाळा, अनुभवी प्राध्यापक, इनक्युबेशन मार्गदर्शन आणि स्टार्टअपसाठी विशेष सुविधाही उपलब्ध आहेत. प्रवेश प्रक्रिया सुरू असून इच्छुक विद्यार्थ्यांनी एसव्हीआयटी सोलापूरशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. रोंगे यांनी केले आहे. प्राचार्य डॉ. यु. एस. सुतार यांनी स्वागत केले. यावेळी उपाध्यक्ष एच. एम. बागल, सचिव अशोक भोसले, विश्वस्त बी. डी. रोंगे, संयुक्त सचिव सूरज रोंगे, देशपांडे, मुजावर आदी सदस्य उपस्थित होते.

## महत्वाचे...



### परमेश्वर काळे यांना समाज शिक्षक पुरस्कार

**सोलापूर, दि. २५ जुलै-**

मातृमंदिर विश्वस्त संस्था निगडी, पुणे यांच्याकडून गुरुपौर्णिमे निमित्त दिला जाणारा समाज शिक्षक पुरस्कार परमेश्वर काळे यांना प्रदान करण्यात आला. शाल श्रीफळ, सन्मानपत्र आणि धनादेश असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी प्रमुख अभ्यागत गुरु पद्मश्री गिरीश प्रभुणे, ज्ञान प्रबोधनीचे अध्यक्ष वाचस्पती गिरीशराव बापट, मातृ विश्वस्त संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



### प्रार्थना फाउंडेशनला श्री कपीलधारेश्वर प्रतिष्ठानचा पुरस्कार

**सोलापूर, दि. २५ जुलै-**

कपीलधारेश्वर प्रतिष्ठानने वर्ष २०२५ चा श्री.कपीलधारेश्वर पुरस्कार प्रार्थना फाऊंडेशनला मोरवंची येथे त्यांच्या कर्मभूमी मध्ये जाऊन सन्मान चिन्ह व अकरा हजार रुपये प्रार्थना फाऊंडेशनच्या संचालिका अनु माहिते यांना पुरस्कार रूपाने प्रदान केला. सध्याच्या कलियुगातील जन्मदात्या आईच्या जीवावर उठणारे मुले किंवा त्यांच्या वृद्धापकाळात आई - वडिलांची साथ सोडणारे अशी अनेक मुलं आज आपल्याला पाहायला मिळत आहे. अशा कित्येक वृद्ध आई-वडीलांचा मुलगा आज प्रसाद मोहिते बनले आहेत. यावेळी कपीलधारेश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष इंजि. राजकुमार कत्ते, उपाध्यक्ष प्रा.डॉ. नयन राजमाने, सचिव रामलिंग बिडवे, कोषाध्यक्ष प्रा. राजेश विभुते, विश्वस्त नागनाथप्पा निले, अण्णाराव भुसणे, रामलिंग मुळे, प्रा.सोमप्रकाश चौधरी, विजय पुट्टे उपस्थित होते.



### श्रावण मासानिमित्त आगार प्रमुखांच्या हस्ते श्रीशैलम बससेवेचा शुभारंभ

**सोलापूर, दि. २५ जुलै-**

श्रावण मासानिमित्त सोलापुर श्रीशैलम बससेवेचा शुभारंभ आगारप्रमुख उत्तम जुंदळे यांच्या हस्ते करण्यात आला. सोलापुरहुन ही बस सकाळी ६ वाजता सुटून रात्री आठ वाजता श्रीशैलम येथे पोहोचेल. बसचे तिकिट ७७९ महिलांसाठी, ६९३ ज्येष्ठ नागरिकांना महाराष्ट्र बॉर्डरपर्यंत मोफत व तिथुन ५९७ ॲडव्हान्स बुकींगवर १५ टक्के सुट आहे. भाविकांनी लाभ घ्यावा. ग्रुप बुकींगसाठी सोलापुर आगाराशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी आगारप्रमुख उत्तम जुंदळे, एमईओ शीतल बिराजदार, विभाग नियंत्रक अमोल गोंजारी, सहाय्यक वाहतूक निरिक्षक युवराज घुगे, प्रशांत महाजन, निलेश कुलकर्णी, महावीर नळे, चालक सचिन गुंड, श्रीशैल शिरोळकर उपस्थित होते.



### 'एक पेड मॉ के नाम'चे अभियान

**सोलापूर, दि. २५ जुलै-**

छत्रपती शिवाजी रात्र कनिष्ठ महाविद्यालयात केंद्र शासनाच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'एक पेड मॉ के नाम' या अभियानाचे आयोजन प्राचार्या मंजुश्री पाटील, रोटरी क्लबचे अध्यक्ष कार्तिक चव्हाण, विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.सचिन गायकवाड तसेच इको नेचर क्लबचे अध्यक्ष मनोज देवकर यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपन करण्यात आले. सुरुवातीस इको नेचर क्लबचे अध्यक्ष मनोज देवकर यांनी विविध वृक्षांची माहिती व मानवी जीवनातील वृक्षांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. तसेच पर्यावरण संवर्धनाची शपथ दिली. प्रास्ताविक प्रा.अश्वीन नागणे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संभूदेव गावडे यांनी केले. प्रा. गिरीष लोंढे यांनी आभार मानले.

## निधन वृत्त...

### जयश्रीदेवी जाधव



**वेळापूर, दि. २५ जुलै-**

मळोली (ता.माळशिरस) येथील जयश्रीदेवी जयसिंगराव जाधव यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे, परंतुडे असा परिवार आहे. त्या माळशिरस पं. समितीचे गटनेते रणजितसिंह जाधव व सत्यजित जाधव यांच्या त्या मातोश्री होत.

### महादेवी शेळगावकर



**सोलापूर, दि. २५ जुलै-**

दयानंद कॉलेज परिसरातील महादेवी प्रभाकर गजभार (स्वामी) शेळगावकर (वय ८६) यांचे शुक्रवार सायंकाळी दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. शनिवार दुपारी १२:३० वाजता त्यांच्यावर लिंगायत स्मशानभूमी तुळजापूर वेस सोलापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात तीन विवाहित मुली दोन मुले सुना नातवंडे व परतवंडे असा मोठा परिवार आहे. आरती सेल्स कार्पोरेशनचे मालक बाळासाहेब व गुरुराज गजभार यांच्या त्या मातोश्री आहेत.

# समुदाय सहभागासाठी महिला आरोग्य समित्यांचे सक्षमीकरण आवश्यक

**शहर आरोग्य कार्यक्रम अधिकारी डॉ. अरुंधती हराळकर**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २५ जुलै -**

महिला या समाजात नेहमीच महत्त्वाची कामगिरी पार पाडत आल्या आहेत. म्हणूनच महिला आरोग्य समिती गठीत करण्यात आली आहे. आरोग्य संदर्भातील अनेक प्रश्न सोडवण्यासाठीची ही समिती आहे, समितीने सक्रीय झाल्यास वस्तीतील अनेक आरोग्याचे प्रश्न सोडवण्यासाठी मदत होईल,समुदाय सहभागासाठी महिला आरोग्य समित्यांचे सक्षमीकरण आवश्यक आहे, असे प्रतिपादन शहर आरोग्य कार्यक्रम अधिकारी डॉ.अरुंधती हराळकर यांनी केले.

सोलापूर महानगरपालिका, अनुसंधान ट्रस्ट- साथी (पुणे) व अस्तित्व संस्था (सांगोला) यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील जिजामाता व दाराशा नागरी आरोग्य केंद्र येथे महिला आरोग्य समिती सदस्यांसाठी क्षमता बांधणी कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यात शहर आरोग्य कार्यक्रम अधिकारी तज्ञ डॉ.अरुंधती हराळकर, ३५ मासचे १५० पेक्षा जास्त समिती सदस्य, अस्तित्व संस्थेचे शहाजी गडहिरे, जिजामाता नागरी आरोग्य केंद्राच्या वैदकीय अधिकारी डॉ.नीलोफर जेलर, दाराशा नागरी आरोग्य केंद्राचे वैदकीय अधिकारी डॉ.चौगुले आणि दोन्ही आरोग्य केंद्रातील पीएचएन, आशा गटप्रवर्तक, सर्व स्टाफ यांचा सक्रीय सहभाग होता. यावेळी महिला आरोग्य समितीच्या सदस्यांनी, ''आमच्या वस्तीत प्रचंड घाण आहे. कचऱ्याची घंटागाडी लोकांच्या सोयीनुसार येत नाही. शौचालय, चेंबरची साफसफाई होत नाही. पाणी साठून मच्छर होवून आजारपणाचे प्रमाण वाढत आहे.

वस्तीत दारूचा मोठा प्रश्न आहे. पिण्याचे पाणी गढूळ असते, पाण्यामध्ये अळ्या असतात. सरकारी दवाखान्यात आमच्या वस्तीतील लोकांना बीपी-शुगरच्या गोळ्या मिळाव्यात, असे अनेक प्रश्न उपस्थित केले. तसेच 'आम्ही दहाजणी दर महिन्याला मिटींग करतो पण आता आम्हाला कसं पुढं जायचं याचं मार्गदर्शन द्या. आम्ही वस्तीमध्ये बीपी-शुगर तपासणीचे शिबीर लावले. सरकारी दवाखान्यात जायला पाहिजे असं आम्ही लोकांना सांगतो. असे महिला आरोग्य समिती सदस्यांनी कामाचे अनुभवही सांगितले. या कार्यशाळेत महिला आरोग्य समितीचे महत्त्व व आरोग्य सेवांच्या सुधारणेतील भूमिका, वस्तीतील आरोग्य समस्या सोडवण्यात असणारा सहभाग, वस्तीतील आरोग्य प्रश्न सोडवण्याबाबत कृती कार्यक्रम व त्याचे नियोजनाबाबत साथी संस्थेच्या शकुंतला भालेराव यांनी, तर महात्मा फुले जन आरोग्य योजनेबद्दल दिलीप हरमळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पल्लवी वडणे यांनी केले. तर आयोजनात शहाजी गडहिरे, शकुंतला भालेराव, दिलीप हरमाळे यांचे सहकार्य लाभले.



# सेवा संस्कार, सामाजिक सौहार्द जोपासणारी संस्था म्हणजे रोटरी

- **रोटरी इंटरनॅशनलचे माजी अध्यक्ष शेखर मेहता यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ जुलै -**

सेवा संस्कार आणि सामाजिक सौहार्द जोपासणारी संस्था म्हणजे रोटरी होय, असे प्रतिपादन रोटरी इंटरनॅशनलचे माजी अध्यक्ष शेखर मेहता यांनी केले. लातूर येथील दयानंद सभागृहात रोटरी इंटरनॅशनलच्या वर्ष २०२५-२६ साठी नवीन प्रांतपाल सुधीर व संगीता लातूरे यांचा पदग्रहण सोहळा वातावरणात पार पडला. या सोहळ्यासाठी रोटरी इंटरनॅशनलचे माजी अध्यक्ष शेखर मेहता बोलत होते.

यावेळभ पद्मभूषण डॉ. अशोकराव कुकडे हे उपस्थित होते. यावेळी निवृत्त प्रांतपाल डॉक्टर सुरेश साबू यांनी नूतन प्रांतपाल सुधीर लातूर यांना पदभार सुपूर्द केला. या कार्यक्रमात रोटरीच्या डिस्ट्रीक्ट डिरेक्टरी व दिशा या मासिकाचे प्रकाशन करण्यात आले. सेवा, मैत्री व सद्भाव हे मूलभूत उद्दिष्ट असलेल्या रोटरीने अनेक समाजपयोगी प्रकल्प पूर्ण केले आहेत. रोटरीमध्ये जगातील २२० पेक्षा जास्त देशात १२ लाखाहून अधिक सदस्य कार्यरत आहेत. समाजासाठी सतत कार्यरत राहणे हा रोटरी चा मूलमंत्र असून सेवा संस्कार आणि विचार देणारी संस्था म्हणजे रोटरी होय, असे मत शेखर मेहता यांनी व्यक्त केले.

पद्मभूषण कुकडे यांनी रोटरीने वारकरी थीमवर कार्यक्रम घेतल्याबद्दल आनंद व्यक्त केला. ते म्हणाले, ज्याप्रमाणे वारकरी एकत्र येऊन निस्वार्थ बुद्धीने समानतेचे अनुकरण करत वारी यशस्वी करतात, तसेच रोटरी सदस्यांनीही संघटनेतून समाजाच्या हितासाठी काम करावे असे मत पद्मभूषण कुकडे यांनी व्यक्त केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**महापालिका महिला व बालकल्याण विभागाच्या**

# विविध प्रशिक्षणासाठी महिला व मुलींचे १३०० अर्ज प्राप्त

**सोलापूर, दि. २५ जुलै -**

महापालिका महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने शहरातील मुली व महिलांसाठी विविध प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या विविध तीन कोर्ससाठी एकूण १ हजार ३०० अर्ज प्राप्त झाले आहेत.

महापालिकेच्या दरवर्षी महसुली जमेच्या पाच टक्के रक्कम ही महापालिका अंतर्गत असलेल्या महिला व बालकल्याण विभागाला ५ टक्के रक्कम शहरातील महिला व मुलींच्या विविध विकास कार्यक्रमांसाठी दिली जाते. या निधीतून महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून समिती शहरातील महिला व मुलींसाठी विविध उपक्रम विकासात्मक योजना व त्यांना स्वयंभू बनविण्याच्या दृष्टीने विविध प्रशिक्षण देण्यात येतात. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलानी आणि सहाय्यक आयुक्त मनीषा मगर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला व बालकल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे यांच्या माध्यमातून या योजनेचे नियोजन करण्यात येत आहे. चालू आर्थिक वर्षात शहरातील मुली आणि महिलांना फॅशन डिझायनिंग, लेडीज टेलरिंग आणि ब्युटी पार्लर या कोर्सेसचे प्रशिक्षण देण्यात येईल. ऑफलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले होते. प्रत्येक कोर्ससाठी शिक्षण पात्रता किमान ८ वी असून वयोगट १८ ते ४५ वर्षांदरम्यान आहे. हे प्रशिक्षण पूर्णतः मोफत आहे.

# 'मॉडर्न'च्या विद्यार्थ्यांनी अनुभवले डायल ११२चे महत्व

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ जुलै -**



क्षेत्रीय भेट अभ्यासक्रम अंतर्गत सोलापर शहर पोलीस आयुक्तालय येथील आपत्कालीन प्रतिसाद पथक डायल ११२ नियंत्रण कक्ष सोलापूर शहर येथे मॉडर्न स्कुल मधील येथील इ. ९ वी च्या १२० विदयार्थ्यांनी पोलीस आयुक्त कार्यालय येथे सदिच्छा भेट देवून डायल ११२ या आपत्कालीन हेल्पलाईनची सविस्तर माहिती घेतली.

डायल ११२ सारख्या सेवांचा नागरीकांना, विदयार्थी, विदयार्थीनींना तात्काळ अडचणीचे वेळी मदत कशी मिळवता येते याबद्दल मॉडर्न स्कुल येथील विदयार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. सोबतच सायबर पोलीस ठाणे येथे सायबर फसवणुक बाबत सुध्दा माहिती देण्यात आली. याप्रसंगी पोलीस आयुक्तालयाच्या प्रांगणात प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाप्रसंगी पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी विदयार्थांना मार्गदर्शन केले. त्यांनी विदयार्थ्यांना कायदा व सुव्यवस्था पोलीसांची भुमीका, समाजिक जबाबदारी आणि डायल ११२ सारख्या सेवांचा नागरीकांना कसा उपयोग होतो माहिती दिली.

हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी माहितीपुर्ण आणि संस्मरणीय ठरला. पोलीस दलाचे कार्य जवळुन अनुभवण्याची आणि आपत्कालीन परिस्थीती हाताळणाऱ्या प्रणालीबद्दल जाणुन घेण्याची संधी मिळाल्याने विदयार्थ्यांमध्ये सुरक्षेची जाणिव आणि सामाजिक भान अधिक वाढल्याचे दिसुन आले. याप्रसंगी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, उपायुक्त गौहर हसन, श्रीमती डॉ. अश्विनी पाटील, विजय कबाडे, सहायक पोलिस आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक उदयसिंह पाटील, नियत्रंण कक्षातील पोलिस निरीक्षक विकास देशमुख, सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक श्रीशैल गजा, डायल ११२ चे सुपरवायझर अधिकारी पोलिस उपनिरीक्ष अरुण फडके, डायल ११२ व सायबर सेल येथील पोलीस अंमलदार, मॉडर्न स्कुलचे सचिव कुलकर्णी, मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग, विदयार्थी, उपस्थित होते.



# अणिवीरभद्रेश्वर चरित्रामृत ग्रंथाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै**

सोलापूरचे कन्नड साहित्यिक वेदमूर्ती धानय्या मठपती रचित श्री अणिवीरभद्रेश्वर चरित्रामृत या ग्रंथाचे प्रकाशन कोरवार ( कर्नाटक) येथे मंगलमय वातावरणात करण्यात आले. प्रमुख अतिथी वेदमूर्ती धनंजय स्वामीजी, माजी खासदार बसवराज पाटील, माजी खासदार आय. बी. हिरेमठ, तहसीलदार पृथ्वीराज पाटील, कलबुर्गी कन्नड साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष विजयकुमार तेगलतिप्पी आदी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

प्रथम या ग्रंथाची अंबारीवरुन मिरवणुक काढण्यात आली. मिरवणुकीत सुवासिनींनी कुंभ, कलश आणि आरती घेऊन सहभाग घेतला होता. या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे हे ग्रंथ भामिनी शटपदी या पारंपरिक काव्यछंदात रचले आहे. मठपती यांनी तब्बल तीन वर्षे अथक परिश्रम घेत हे साहित्य पूर्ण केले आहेत. या ग्रंथात श्री अणिवीरभद्रेश्वर देवांचे जीवनचरित्र, भक्तिपरंपरा आणि तत्त्वज्ञान याचे रसपूर्ण वर्णन केले आहे. मान्यवरांनी मठपती यांच्या साहित्यिक योगदानाचे विशेष कौतुक केले. परंपरा, भक्ती आणि साहित्याचा सुरेख संगम असलेल्या या ग्रंथामुळे आध्यात्मिक क्षेत्रात भर पडली आहे. मुद्देबिहाळ येथील सोमशेखर अणेप्पनवरु यांनी या ग्रंथाच्या हजार प्रती मंदिर समितीस मोफत देऊन दातृत्व भावना दाखविली.

### सिध्देश्वर मार्केट यार्ड येथून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. २५ जुलै -**

शहरातील सिध्देश्वर मार्केट यार्ड येथून चोरट्याने २० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत चांदसाब कासिम पठाण (वय ४२, रा. सिध्देश्वर नगर भाग ३, नई जिंदगी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ जुलै रोजी चांदसाब पठाण यांनी त्यांची एमएच १३ एई ३४५१ क्रमांकाची दुचाकी ही सिध्देश्वर मार्केट यार्ड येथे हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस हवालदार गायकवाड तपास करीत आहेत.



# महाराष्ट्र पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेकडून सीईओंना निवेदन

**सोलापूर, दि. २५ जुलै**

महाराष्ट्र पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेच्या वतीने जलजीवन मिशनच्या विविध मागण्यांबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांना निवेदन देण्यात आले.

बंद योजनांना निधी उपलब्ध करून द्यावे, कंत्राटदारांनी रोखीने भरलेली व बिलातून कपात केलेली सुरक्षा ठेव परत मिळावे, देयकातून दहा टक्के लोकवर्गणी कपात कपात करू नये, विविध कारणाने प्रलंबित कामांना विनादंड मार्च २०२८ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावे, सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देण्यात यावे, देयकांचे प्रलंबित बिल देण्यात यावे याचे निवेदन देण्यात आले.

यावेळी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष मिलींद भोसले, आनंद तोडकरी, हेमंत जाधव, विवेक राठोड, श्रीकांत सोनी, विनोद चव्हाण आदी उपस्थित होते.

# लोकशाहीरांचे विचार आपल्यात रूजवत जयंती साजरी करा

- **पोलिस आयुक्त एम राजकुमार यांचे आवाहन**
- **लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त आयुक्तालयात शांतता कमिटीची बैठक**




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ जुलै -**

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे विचार आपल्यात रूजवत जयंती साजरी करा असे आवाहन पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी केले.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयामध्ये शांतता कमिटी बैठक घेण्यात आली. त्यावेळी पोलिस आयुक्त एम राजकुमार बोलत होते. या बैठकीची प्रस्तावना उपायुक्त श्रीमती डॉ. अश्विनी पाटील यांनी करुन बैठक आयोजन करण्यामागचा उद्देश स्पष्ट करून पोलिस विभागाच्यावतीने मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना नियम सांगितले. १ ते ३ ऑगस्ट या कालावधीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव साजरा करण्यात येणार आहे. ३ ऑगस्ट रोजी मिरवणुकीमध्ये पारंपारीक वाद्य वाजविणेबाबत सुचना देण्यात आल्या. यावेळी बैठकीस उपस्थित शांतता समिती सदस्य व इतरांनी समस्या/सुचना मांडल्या. त्यानंतर सदर सुचनेचे संबंधित महानगरपालिका, महावितरण, आर टी ओ, धर्मादाय आयुक्त कार्यालय अशा खात्याचे अधिकारी यांनी सदर कामाची रुपरेषा बघुन समस्या सोडविण्यात येतील असे सांगितले.

पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी उत्सव साजरा करताना बऱ्याचवेळी कायदेशीर बाबींचे उल्लंघन होत असते, कोणीही कायदा हातात घेऊ नये, कोणताही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास पोलीसांशी संपर्क साधावा असे आवाहन केले. शांतता समिती सदस्य व नागरीकांनी आपल्या परीसरातील बेकायेदशीर बाबींची माहिती पोलीसांना दिली पाहिजे. मिरवणुकीमध्ये अफवा पसरवू नये, नियमांचे पालन करावे, नियमांचे पालन नाही झाले तर कायदेशीर कारवाई होईल. शासनाने नेमून दिलेल्या सुचना पाळल्या पाहिजेत असेही सांगितले. या बैठकीस सहायक पोलीस आयुक्त प्रताप पोमण, सुधीर खिरडकर, राजन माने, महानगरपालिका उप-आयुक्त सारिका अकुलवार, महावितरण अभियंता प्रदिप मोरे, अग्नीशामक दलाचे रावसाहेब सलगर, प्रदूषण नियत्रंण मंडळाचे किरण चव्हाण, धर्मादाय आयुक्तचे भागवत अशोक फुलसुंदर आदी उपस्थित होते.

**पोलिसांची नियमावली... :** उत्सव काळात सर्व मंडळानी सीसीटीव्ही कॅमेरेंची व्यवस्था करावी, मंडपासाठी सार्वजनिक रस्त्याचा २/३ भाग मोकळा सोडावा, मोकाट जनावरांपासुन मुर्ती/फोटोस धोका होणार नाही याची खबरदारी घ्यावी, देखावे चित्र आक्षेपार्ह नसावेत, उत्सवाचे पावित्र्य राखावे, मंडळांकडुन जाहिरात प्रदर्शन करण्यात येत असल्यास आरोग्य विषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित करण्यास पसंदी द्यावी, तसेच स्वच्छता, जलसंवर्धन, वृक्षारोपण, साक्षरता, सायबर गुन्हेगारी यंत्रणाबाबत जनजागृती करावी, सर्वोच्य न्यायालयाचे ध्वनीप्रदुषण मार्गदर्शक सुचनांचे पालन करावे, मंडाळांनी महावितरण विभागाकडुन अधिकृत विद्युत जोडणी करुन घ्यावी, सर्व मंडळांनी मिरवणुकीत सामिल होणाऱ्या वाहनांची आर टी ओ कडुन तपासणी करावी, मिरवणुकीमध्ये मोठे व लांब कंटेनर वापरु नये, वाहनांवरील देखाव्यांची उंची अडथळा होणारी नसावी, मिरवणुक संवेदनशिल ठिकाणी जास्त वेळ रेंगाळत ठेवू नये, इतर धर्मांच्या भावना दुखावणार नाही यांची काटेकोर दक्षता घ्यावी, सोशल मिडीयावरुन काही अक्षेपार्ह मेसेजेस, फोटो, पोस्ट व्हायरल होत असल्याचे निर्दशनास आल्यास त्याबाबत त्वरीत पोलीस यंत्रणेस कळवावे, अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव मंडळानी ऑनलाईन, ऑफलाईन पध्दतीने परवानगी घेणे बंधनकारक आहे. नोंदणीकरीता प्रत्येक पोलीस ठाणे येथे स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

## महत्त्वाचे

### आयएसएल हंगाम पुढे ढकलला जाण्याची शक्यता

**कोलकाता** : इंडियन सुपर लीग (आयएसएल) हंगाम २०२५-२६ रद्द न होता, पुढे ढकलला जाण्याची शक्यता आहे, असे आश्वासन एआयएफएफ अध्यक्ष कल्याण चौबे यांचे भागधारकांना दिले. चौबे यांच्या आश्वासनामुळे फुटबॉल खेळाशी संबंधित हजारो खेळाडूंना दिलासा मिळाला आहे. एआयएफएफ अलिकडच्या कायदेशीर आणि करारातील अडथळ्यांमुळे अनिश्चिततेचा सामना करत आहेत. एआयएफएफ घटनेभोवती सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या कायदेशीर कार्यवाहीला तात्पुरती स्थगिती मिळाली आहे.आमचा लीग रद्द करण्याचा कोणताही विचार नाही. इंडियन सुपर लीग झाली नाही तर केवळ फुटबॉलपटूच नाही तर फुटबॉलशी संबंधित लोकांवरही परिणाम होईल. हजारो लोक प्रभावित होतील. म्हणून, लीग होण्यासाठी आम्ही आमचे सर्वोत्तम प्रयत्न करू, असे चौबे म्हणाले. या महिन्याच्या सुरुवातीला, आयएसएलचे आयोजन करण्याची जबाबदारी असलेली संस्था, फुटबॉल स्पोर्ट्स डेव्हलपमेंट लिमिटेडने (एफएसडीएल) एआयएफएफ आणि क्लबना कळवले की आगामी हंगाम स्थगित ठेवण्यात येत आहे. दोन महिन्यांपूर्वी जारी केलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर हे पाऊल उचलण्यात आले, ज्यामध्ये एआयएफएफ आणि एफएसडीएलला फेडरेशनच्या घटनात्मक बाबींवर न्यायालयाचा निकाल येईपर्यंत कोणतेही नवीन करार करण्यास मनाई होती. ■

### टियाफो, शेल्टन उपांत्यपूर्व फेरीत

**वॉशिंग्टन** : येथे सुरु असलेल्या डीसी ओपन टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत फ्रान्सिस टियाफो व शेल्टन ऑल अमेरिकन लढत होणार आहे. फ्रान्सिस टियाफोने फ्लेव्हियो कोबोलीवर ६-१, ६-४ असा विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरी गाठली. ह्युस्टन आणि रोलँड गॅरोसनंतर २०२५ एटीपी टूर हंगामातील टियाफोचा हा तिसरा उपांत्यपूर्व फेरी आहे. बेन शेल्टनने गॅब्रिएल डायलोविरुद्ध ६-३, ६-२ असा विजय मिळवून अंतिम आठमध्ये आपले स्थान निश्चित केले. टियाफोने या शतकात आंद्रे अगासी आणि अलेक्झांडर इवेरेव्ह यांच्यासोबत सलग चार वर्षांत वॉशिंग्टन उपांत्यपूर्व फेरीत पोहोचणारा एकमेव पुरुष खेळाडू म्हणून काम केले. मी उत्साहित आहे. आम्ही खूप चांगले मित्र आहोत. गेल्या वर्षी ओपनमध्ये आम्ही एक अविश्वसनीय सामना खेळलो, आम्ही दोघांनी खेळलेल्या सामन्यांपैकी हा सर्वोत्तम सामना होता, असे शेल्टनसोबतच्या सामन्याबद्दल टियाफो म्हणाला. टेलर फ्रिट्झने इटलीच्या मॅटेओ अर्नाल्डीविरुद्ध ६-३, ६-४ असा विजय नोंदवला.

### जिंकणे विसरा, ड्रॉ करणेही कठीण : मनोज तिवारी

**कोलकाता** : ओल्ड ट्रॅफर्ड येथे इंग्लंडविरुद्ध सुरू असलेल्या चौथ्या कसोटी सामन्यात भारतीय संघाला विजय नोंदविणे तर दूरच संघ सामना अनिर्णीत राहण्याच्या स्थितीत नाही, असे मत भारताचे माजी फलंदाज मनोज तिवारीने व्यक्त केले. पहिल्या डावात ३५८ धावांचा डोंगर उभारल्यानंतर, भारत इंग्लंडच्या फलंदाजांना मोठी धावसंख्या उभारण्यापासून रोखू शकला नाही. यजमान संघाच्या झॅक क्रॉली व बेन डकेटने संघाचा मजबूत पाया रचला आणि तिसऱ्या दिवशी ऑली पोप आणि जो रूटने जोरदार फलंदाजी करत संघाची धावसंख्या आणखी वाढविली. इंग्लंड सध्या आघाडीवर आहे. भारतासाठी हा सामना कठीण होणार आहे, कारण इंग्लंडने ४०० पेक्षा जास्त धावा केल्या आहेत आणि त्यांच्या अंतिम एकादशमध्ये मजबूत फलंदाज आहे. भारतासाठी हा सामना अनिर्णित ठेवणे खूप कठीण असेल. ■

### आज होणारी जिल्हा क्रिकेट निवड चाचणी स्थगित

**सोलापूर, दि. २५ जुलै-**
जिल्ह्याचे १४ वर्षांखालील गटाचे क्रिकेट संघ निवडण्यासाठी २६ व २७ जुलै रोजी जुळे सोलापूर येथे होणारी निवड चाचणी दोन दिवस पडलेल्या पावसामुळे पुढे ढकलण्यात आली आहे. याची तारीख नंतर कळविणार असल्याचे जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बर्सु यांनी कळविले आहे,.

### कुसमोडच्या ईश्वरी शिंदे हिची राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड

**पिलीव दि २५ जुलै-**
माळशिरस तालुक्यातील कुसमोड गावच्या ईश्वरी नितीन शिंदे हिची लखनौ येथे होणाऱ्या राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड झाली. ईश्वरीने गोवा येथे झालेल्या शालेय दक्षिण विभागीय बॅडमिंटनस्पर्धेतील



कामगिरीवर तिची निवड झाली. ईश्वरी पोखरापुर येथील नवोदय विद्यालयात नववीमध्ये शिकत आहे. तिचे प्राचार्य कोठाडी, मार्गदर्शक क्रीडा शिक्षिका म ुळीक यांनी अभिनंदन केले.

# नागपूरची दिव्या देशमुख जगज्जेतेपदाच्या समीप

**बटुमी (जॉर्जिया), २५ जुलै**

फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषकात पहिल्यांदाच देशाची विजेती असेल. महिला ग्रॅण्डमास्टर ३८ वर्षीय कोनेरू हम्पी आणि नागपूरची आंतरराष्ट्रीय मास्टर १९ वर्षीय दिव्या देशमुख शनिवारी येथे होणाऱ्या ग्रॅण्ड फिनालेमध्ये जगज्जेपदासाठी अंतिम सामन्यात लढणार आहेत.

या स्पर्धेच्या इतिहासात दोन भारतीय खेळाडू अंतिम फेरीत एकमेकांसमोर येण्याची ही पहिलीच वेळ आहे. विश्वचषकाची अंतिम फेरी गाठल्यानंतर हम्पी व दिव्या देशमुख या दोघीही पुढील वर्षी होणाऱ्या महिला कॅण्डिडेट्स स्पर्धेसाठी पात्र ठरल्या आहेत.

हम्पीमध्ये चुका न करता लांब खेळ खेळण्याची क्षमता आहे. दुसरीकडे, दिव्या देशमुखची आक्रमक शैली आहे. एका विश्रांतीच्या दिवसानंतर सुरू होणाऱ्या अंतिम सामन्यात बुद्धिमत्तेची लढाई होणार आहे.

मोठे सामने खेळण्याच्या निव्वळ अनुभवावर, हम्पी आपल्याच देशबांधव दिव्या देशमुखविरुद्ध अंतिम फेरीत विजयाची प्रबळ दावेदार म्हणून उतरत आहे, मात्र नागपूरची दिव्या देशमुखनेही आपल्या बुद्धी कौशल्याच्या जोरावर प्रथमच विश्वचषकाच्या अंतिम फेरीपर्यंत मजल मारली, तेव्हा अंतिम फेरीतही ती चमत्कारिक कामगिरी करू शकते व जगज्जेतेपदाचा बहुमान पटकावू शकते.

### दिव्या, कोनेरू हम्पी यांच्यात विश्वचषकासाठी झुंज



हम्पीने गुरुवारी उपांत्य फेरीत चीनच्या टिंगजी लेईवर टायब्रेकरमध्ये विजय मिळवत आपल्या प्रतिस्पर्धीला रोखले, तर दिव्या देशमुखने उपांत्य फेरीतील दुसऱ्या सामन्यात माजी विश्वविजेत्या चीनच्याच झोंगी टॅनला हरवले.

ग्रॅण्डमास्टर हम्पी ही जागतिक महिला रॅपिड स्पर्धेची विजेती होती आणि अलिकडच्या काळात महिला ग्रांप्रीमध्येही तिने प्रथम स्थान मिळवले आहे आणि वय हे केवळ एक संख्या आहे, हे तिने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. गत अनेक वर्षांत तिची जिद्द आणि दृढनिश्चय किंचितही कमी झालेली नाही.

### महिला बुद्धिबळ विश्वचषकात पहिल्यांदाच भारतीय विजेती होणार



बुद्धिबळ चाहत्यांसाठी हा सर्वात आनंदाचा क्षण आहे कारण आता विजेतेपद निश्चितच भारताकडे जाणार आहे. पण अर्थातच, एक खेळाडू म्हणून, उद्याचा सामनाही खूप कठीण असेल . दिव्याने या संपूर्ण स्पर्धेत जबरदस्त खेळ केला आहे, असे हम्पी म्हणाली. हम्पीच्या अर्ध्या वयात, आंतरराष्ट्रीय मास्टर दिव्या देशमुखने या स्पर्धेत अव्वल दहामध्ये स्थान मिळवलेल्या तब्बल तीन खेळाडूंना आधीच धक्का दिला आहे. तिचा पहिला बळी चीनची दुसरी मानांकित जिनर झू होती, तिने डी. हरिकाला स्पर्धेतून बाद केले.

नागपूरची १९ वर्षीय दिव्या देशमुखने नंतर उपांत्य फेरीत माजी महिला विश्वविजेती चीनची झोंगी टॅन हिला हरवले.

मला कतेवळ थोडी झोप व काही जेवण हवे आहे, हे दिवस माझ्यासाठी खूप चिंताजनक आहेत, असे दिव्या देशमुखने अंतिम फेरीत प्रवेश केल्यानंतर सांगितले.

मला वाटतं मी खूप चांगलं खेळू शकले असते. मी एका विशिष्ट टप्प्यावर जिंकत होते आणि नंतर परिस्थिती गुंतागुंतीची झाली. मला वाटतं मी मधल्या गेममध्ये चूक केली आणि मला आणखी सहज विजय मिळवायला हवा होता, पण शेवटी मी भाग्यवान ठरली, असे ती आपल्या उपांत्य सामन्याबद्दल म्हणाली.

शनिवारचा अंतिम सामना दोन क्लासिकल गेममध्ये खेळला जाईल आणि जर निकाल १-१ असा राहिला तर विजेता निश्चित करण्यासाठी कमी कालावधीचे सामने खेळवले जातील. पुढील महिला कॅण्डिडेट्स स्पर्धेसाठी दोन्ही भारतीयांनी आता आपल्या जागा राखीव ठेवल्या आहेत. ८ खेळाडूंच्या कॅण्डिडेट्स या स्पर्धेत पुढील जागतिक महिला विजेत्या चीनच्या वेनजुन जूसाठी आव्हान निश्चित होईल. (वृत्तसंस्था)

# इंग्लंडची सामन्यावर मजबूत पकड



फलंदाजी करताना ऑली पोप



फटका मारताना शतकवीर जो रूट

### ऑली पोप, जो रूटची जोरदार फटकेबाजी

**मॅन्चेस्टर, २५ जुलै**

ओल्ड ट्रॅफर्ड क्रिकेट मैदानावर सुरु असलेल्या अॅण्डरसन-तेंडुलकर चषक कसोटी मालिकेलीत चौथ्या कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी इंग्लंडने भारताच्या पहिल्या डावातील ३५८ धावांना चोख प्रत्युत्तर दिले. जो रुटच्या शतकी खेळीच्या बळावर इंग्लंडने शेवटचे वृत्त हाती आले तेव्हा १०८.४ षटकांत ४ बाद ४५८ धावांपर्यंत मजल मारली होती. त्यावेळी जो रूट नाबाद १३२ धावांवर, तर बेन स्टोक्स नाबाद ४६ धावांवर खेळत होते. इंग्लंड सध्या १०० धावांनी आघाडीवर आहे. रुटने स्टोक्सबाद नाबाद शतकी भागीदारी केली.

इंग्लंडने २ बाद २२५ धावांवरून पुढे तिसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली. कालचे नाबाद खेळाडू ऑली पोप व जो रुटने भारतीय गोलंदाजांचा संयमाने सामना करत आपल्या संघाची धावसंख्या वाढविली आणि आपापली अर्धशतके साजरी केली. उपहारापर्यंत दोघांनी इंग्लंडला ७४ षटकांत २ बाद ३३२ धावांचा टप्पा गाठून दिला. उपहारानंतर दोघेही शतकी खेळीच्या वाटेवर होते, मात्र वॉशिंग्टन सुंदरने ऑफ स्टम्पवर चेंडू टाकून ऑली पोपला स्लीपमध्ये केएल राहुलकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. ऑली पोपने १२८ चेंडूंचा सामना करत ७१ धावांचे योगदान दिले. ऑलीने जो रूटसोबत तिसऱ्या गड्यासाठी १४४ धावांची भागीदारी केली. नंतर हॅरी ब्रुक वॉशिंग्टन सुंदरच्या चेंडूला फटकावण्यासाठी क्रीजच्या पुढे सरसावला, मात्र त्याचा वेध चुकला व बदली यष्टिरक्षक ध्रुव जुरेलने ब्रुकला (३) यष्टिचीत केले.

पुढे जो रूट आणि कर्णधार बेन स्टोक्स ही जोडी खेळपट्टीवर चांगलीच जमली. यादरम्यान जो रूटने आपले कसोटी शतक पूर्ण केले आणि इंग्लंडला ४०० धावांपर्यंत मजल मारून दिली. जो रुटने १७८ चेंडूचा सामना करत १२ चौकारांच्या मदतीने नाबाद १०० धावा पूर्ण केल्या. रुटचे हे कारकिर्दीतले ३७ वे कसोटी शतक ठरले.

सामन्याच्या दुसऱ्या दिवशी झॅक क्रॉवले (८४) व बेन डकेटने (९४) पहिल्या गड्यासाठी १६६ धावांची भागीदारी करून इंग्लंडच्या डावाची झकास सुरुवात केली. (वृत्तसंस्था)

# उन्नती हुडाची घोडदौड अकानेने रोखली

**चांगझोऊ, २५ जुलै**



येथे सुरु असलेल्या चायना ओपन सुपर १००० बॅडमिंटन स्पर्धेत भारताची उदयोन्मुख बॅडमिंटन स्टार उन्नती हुडा हिची विजयी घोडदौड जपानच्या अकाने यामागुचीने रोखली. महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व सामन्यात उन्नतीला जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर असलेल्या अकानेकडून सरळ गेममध्ये पराभवाचा सामना करावा लागला.

आदर्श व दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधूविरुद्ध कारकिर्दीतील सर्वात मोठा विजय मिळवणारी १७ वर्षीय उन्नती हिने ३३ मिनिटे चाललेल्या सामन्यात १६-२१, १२-२१ असा पराभव पत्करला.

उन्नतीच्या पराभवाबरोबरच स्पर्धेतील भारताची एकेरी मोहीम संपुष्टात आली.

सुरुवातीच्या गेममध्ये, हुडाने सुरुवातीच्या सामन्यात यामागुचीसोबत गती राखली, परंतु ती गती टिकवून ठेवण्यात अपयशी ठरली. जपानी स्टार अकानेने एका टप्प्यावर सलग पाच गुण मिळवत २१-१६ असा विजय मिळवला. सामन्यादरम्यान हुडाने सलग तीन गुण मिळवण्याची सर्वोत्तम खेळी केली. (वृत्तसंस्था)

# भारतीय पुरुष हॉकी संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार

**नवी दिल्ली, २५ जुलै**

आगामी आशिया चषकाच्या तयारीचा एक भाग म्हणून, भारतीय पुरुष हॉकी संघ आगामी १५ ते २१ ऑगस्ट दरम्यान पर्थ येथे चार सामन्यांच्या मैत्रीपूर्ण मालिकेसाठी ऑस्ट्रेलियाचा दौरा करणार आहे.

जागतिक क्रमवारीत आठव्या क्रमांकावर असलेला भारतीय संघ १५, १६, १९ आणि २१ ऑगस्ट रोजी त्याच ठिकाणी सहाव्या क्रमांकावर असलेल्या यजमान ऑस्ट्रेलिया संघाशी खेळणार आहे.

आशिया चषक स्पर्धा २९ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर दरम्यान बिहारमधील राजगीर येथे होणार आहे. या महाद्वीपीय संघाने पुढील वर्षी होणाऱ्या एफआयएच विश्वचषकासाठी थेट पात्रता मिळवून दिली आहे.

हा दौरा आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या वेळी येतो, बिहारमध्ये होणाऱ्या हिरो आशिया चषकाच्या अगदी आधी. हे तांत्रिकदृष्ट्या मैत्रीपूर्ण सामने असले तरी, ते आमच्या तयारीच्या टप्प्याचा एक अतिशय महत्त्वाचा भाग आहेत, असे भारतीय हॉकी संघाचे मुख्य प्रशिक्षक क्रेग फुल्टन यांनी म्हणाले आहे.

ऑस्ट्रेलियासारख्या संघाविरुद्ध खेळल्याने आमची सर्व बाजूंनी परीक्षा होईल. आशिया चषक स्पर्धेपूर्वी आम्हाला हेच कौशल्य दाखवण्याची गरज आहे, असेही ते म्हणाले. संघाने १० दिवसांचा सराव पूर्ण केला आहे, असेही त्यांनी सांगितले.

शिबिरातील वातावरण उत्साही आहे, कारण पुढे काय होणार आहे यावर पूर्णपणे लक्ष केंद्रित केले आहे. या दौऱ्यातील आमचे एक प्रमुख ध्येय म्हणजे निवडीच्या उद्देशाने पहिले दोन सामने वापरणे, तर उर्वरित सामने आशिया चषकासाठी निवडलेल्या संघासोबत खेळले जातील, असे ते म्हणाले. दोन्ही संघ अलीकडेच युरोपमधील प्रो-लीगमध्ये एकमेकांसमोर आले होते, यात ऑस्ट्रेलियाने दोन्ही टप्प्यांमध्ये भारतावर ३-२ असा विजय मिळवला होता. गत वर्षी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताने कुकाबुरासवर ३-२ असा विजय मिळवला होता. १९७२ च्या म्युनिक ऑलिम्पिकनंतर ऑस्ट्रेलियावर त्यांचा पहिलाच ऑलिम्पिक विजय ठरला.

अलिकडच्या काळात झालेल्या लढती चुरशीच्या झाल्या असल्या तरी, ऑस्ट्रेलियाने ऐतिहासिकदृष्ट्या या स्पर्धेत आघाडी घेतली आहे, २०१३ पासून दोन्ही संघांमध्ये खेळल्या गेलेल्या ५१ पैकी ३५ सामने त्यांनी जिंकले आहेत. भारताने नऊ वेळा विजय मिळवला आहे, तर सात सामने अनिर्णीत राहिले आहेत. (वृत्तसंस्था)



सिंगापूरमधील जागतिक जलतरण स्पर्धेत कलात्मक जलतरणाच्या सांघिक अॅक्रोबॅटिक अंतिम फेरीत कौशल्य दाखवताना फ्रान्सचे जलतरणपटू

# २०३६ च्या ऑलिम्पिकसाठी एकत्र काम करण्याचा आयओएचा निर्धार

**नवी दिल्ली, २५ जुलै**

भारतीय ऑलिम्पिक संघटनेने (आयओए) गुरुवारी आयोजित बैठकीत २०२६ च्या ऑलिम्पिकसाठी एकत्रितपणे काम करण्याता निर्धार व्यक्त केला आहे.

जवळजवळ १८ महिन्यांत प्रथमच संपूर्ण कार्यकारी परिषदेने सार्वजनिकरित्या एकत्र येऊन रघुराम अय्यर यांची सीईओ म्हणून नियुक्ती केली आणि डोपिंगचा सामना करण्यासाठी एक समिती स्थापन केली.



जानेवारी २०२४ मध्ये आयओए अध्यक्ष पी. टी. उषा यांनी २० लाख रुपये प्रति महिना वेतनावर अय्यर यांची नियुक्ती केली, जी उषा आणि इतर सदस्यांमधील वादाचा सर्वात मोठा मुद्दा होता, तो अमान्य राहिला. गत वर्षी बहुतेक कार्यकारिणी सदस्यांनी उषा यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आणला होता आणि तो रद्द करण्यात आला. अधिकृतपणे पॉवरिंग इंडियाज स्पोर्टिंग अॅस्पिरेशन्स: आयओएज व्हिजन २०३६ शीर्षकाखाली ही बैठक प्रामुख्याने आयओएमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी होती हे नाकारता येत नाही.

मार्च २०२३ पासून कोणतीही वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली नव्हती आणि सप्टेंबर २०२४ मध्ये झालेल्या वादळी ईसी बैठकीला गतिरोध दूर करण्यात अपयश आले. या प्रसंगी उपस्थित असलेले अय्यर यांनी आपले कर्तव्य बजावत राहिले आणि गेल्या महिन्यात लॉसने येथे आयओसीला भेटण्यासाठी आलेल्या भारतीय शिष्टमंडळाचाही ते भाग होते. (वृत्तसंस्था)

# द्रास येथे क्रीडा मंत्री पदयात्रेचे नेतृत्व करणार

**नवी दिल्ली, २५ जुलै**

१९९९ च्या कारगिल युद्धातील भारताच्या विजयाच्या २६ व्या वर्धापन दिनानिमित्त क्रीडामंत्री मनसुख मांडवीय शनिवारी द्रास येथे १,000 हून अधिक युवा स्वयंसेवक, माजी सैनिक, सशस्त्र दलातील कर्मचारी, शहीद सैनिकांचे कुटुंब आणि नागरी समाजातील सदस्यांसह पदयात्राचे नेतृत्व करतील. माय भारत (मेरा युवा भारत) द्वारे आयोजित कारगिल विजय दिवस पदयात्रेमध्ये मांडवीय यांच्यासोबत संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ देखील सहभागी होतील. केंद्रीय युवा व्यवहार व क्रीडा आणि कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांच्या नेतृत्वाखाली पदयात्रेत १,000 हून अधिक युवक, माजी सैनिक, सशस्त्र दलातील कर्मचारी, शहीदांचे कुटुंब आणि नागरी सम ाजातील सदस्यांचा सहभाग असेल, असे युवा कल्याण व क्रीडा मंत्रालयाच्या एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. १.५ किलोमीटर अंतराची ही पदयात्रा सकाळी ७ वाजता द्रास येथील हिमाबास पब्लिक हायस्कूलच्या मैदानापासून सुरू होईल आणि भीमबेट येथील सरकारी उच्च माध्यमिक शाळेच्या मैदानावर संपेल, असे त्यात म्हटले आहे. दोन्ही मंत्री, १00 युवा स्वयंसेवकांसह, १९९९ च्या पाकिस्तानशी झालेल्या संघर्षात सर्वोच्च बलिदान देणाऱ्या सैनिकांना पुष्पहार व श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी कारगिल युद्ध स्मारकाकडे जातील. मांडवीय शक्ती उद्घोष फाऊंडेशनच्या २६ महिला बाईकर्सचाही सत्कार करतील.

# वरिष्ठांच्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धेस सुरवात




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै-**

सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेने अखिल भारतीय लॉन टेनिस संघटना व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या मान्यतेखाली आयोजित केलेल्या वरिष्ठांच्या चौथ्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धेस येथे सुरवात झाली. या स्पर्धेत देशभरातून १७५ खेळाडू सहभागी झाले आहेत .

कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात याचे उदघाटन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी स्पर्धेचे पर्यवेक्षक वैशाली शेकटकर, स्पर्धा संचालक डोसा रामाराव, एम.एस.एल.टी.ए.चे मानद सहसचिव राजीव देसाई, आंतरराष्ट्रीय टेनिसपटू संध्याराणी बंडगर, दिलीप बच्चुवर, पंकज शहा, कर्नल देवानंद मठपती, डॉ. राजू कारंडे, रूपेश बिद्री, कुमार रव्हा व खेळाडू उपस्थित होते.



### तलवारबाजी जिल्हा निवड चाचणी स्पर्धा रविवारी

**सोलापूर, दि. २५ जुलै-**

सोलापूर शहर व जिल्हा तलवारबाजी असोसिएशन यांच्या वतीने २७ वी सब-ज्युनियर जिल्हा तलवारबाजी निवड चाचणी स्पर्धा रविवार २७ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता छत्रपती शिवाजी प्रशाला (नाईट कॉलेज) येथे होईल. या स्पर्धेसाठी खेळाडूंचा जन्म १ जानेवारी २०१२ नंतरचा असावा. या स्पर्धेतून निवडलेला संघ ८ ते १० ऑगस्ट दरम्यान हिंगोली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये सहभागी होईल. इच्छुक खेळाडूंनी पवन भोसले (९६३७९६३७७७) अथवा अक्षय माने (८३२९०७०७६४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संघटनेचे जिल्हा सचिव दीपक शिंदे यांनी केले आहे.

# पंढरपूर रोटरी क्लबच्यावतीने विद्यार्थ्यांना रेबीज विषयी मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२५ जुलै -**

कासेगाव (ता. पंढरपूर) येथील मठ वस्तीच्या जिल्हा परिषद शाळेत पंढरपूर रोटरी क्लबच्या वतीने रेबीज, त्याचे प्रतिबंध आणि प्राण्यांच्या चाव्यानंतर वेळेवर पोस्ट-एक्सपोजर प्रोफिलॅक्सिस (PEP) चे महत्त्व याबद्दल म ार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी डॉ. राजेंद्र सावळकर, डॉ. निरज दोडके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत कुत्रा किंवा इतर प्राणी चावल्यानंतरची स्वतःची काळजी व उपचार याबद्दलची माहिती दिली. राज्यात सध्या भटक्या कुत्र्यांचा वावर गंभीर बाब आहे. कुत्र्याने शाळकरी मुलांना, जेष्ठ नागरिकांना, लहान मुलांना चावा घेतल्याच्या अनेक घटना वारंवार घडत आहेत. याबाबत शाळकरी मुलांना मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी रोटरी क्लब अध्यक्ष डॉ. वैभव सादिगले, सेक्रेटरी मयूर परिचारक, रोटरी क्लब सदस्य सचिन भिंगे, शाळेतील शिक्षक व पालक उपस्थित होते.

रेबीज हा एक घातक विषाणूजन्य रोग आहे जो प्रामुख्याने लाळेद्वारे विशेषतः कुत्र्याच्या चाव्यामुळे पसरतो. रेबीज हा रोग प्रामुख्याने कुत्रे, वटवाघुळ, रॅकून, कोल्हे आणि इतर प्राण्यांच्या चाव्यामुळे पसरतो. विषाणू लाळेद्वारे मानव किंवा इतर प्राण्यांच्या शरीरात प्रवेश करतो. क्वचित प्रसंगी, खरचटणे किंवा जखमेतून लाळेचा संपर्क झाल्यासही रोग पसरू शकतो.

**सुरुवातीची लक्षणे :** ताप, डोकेदुखी, थकवा, चाव्याच्या जागी खाज किंवा वेदना.

**प्रगत लक्षणे :** चिंता, गोंधळ, अस्वस्थता, पाण्याला घाबरणे (हायड्रोफोबिया), लाळ गळणे, श्वास घेण्यास त्रास, अर्धांगवायू. लक्षणे दिसू लागल्यानंतर रोग जवळजवळ नेहमीच प्राणघातक ठरतो.

**प्रतिबंध लस :** चावल्यानंतर त्वरित रेबीजविरोधी लस (पोस्ट-एक्सपोजर प्रोफिलॅक्सिस) घ्यावी. यात रेबीज इम्यून ग्लोब्युलिन आणि लसींचा समावेश असतो. पाळीव कुत्रे आणि मांजरींना नियमित रेबीज लस द्यावी.

**खबरदारी :** संशयास्पद प्राण्यांपासून दूर राहणे आणि चावल्यास त्वरित वैद्यकीय मदत घेणे. एकदा लक्षणे दिसू लागल्यानंतर रेबीजवर प्रभावी उपचार नाही. त्यामुळे चावल्यानंतर त्वरित लस घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जखम स्वच्छ करणे आणि वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे. भारतासारख्या देशांमध्ये रेबीज हा एक मोठा सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे, विशेषतः खेड्यापाड्यांमध्ये जंगली प्राणी आणि बेघर कुत्रे यांच्यामुळे रोगाचा धोका जास्त असतो. जर कुत्रा किंवा इतर प्राण्याने चावले असेल, त्वरित जखम साबण आणि पाण्याने स्वच्छ करा आणि जवळच्या रुग्णालयात जा. रेबीज लसीकरणाचे पूर्ण कोर्स घ्या, जे साधारणपणे चार ,पाच डोस असते. पाळीव प्राण्यांचे नियमित लसीकरण करा आणि त्यांना अनोळखी प्राण्यांपासून दूर ठेवा.

## बार्शीच्या वर्षा कुलकर्णीची मंत्रालयात सहाय्यक कक्ष अधिकारीपदी नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ जुलै-**

येथील वर्षा वंदना विजयकुमार कुलकर्णी हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात आलेल्या सहाय्यक कक्ष अधिकारी (मंत्रालय) पदाच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर तिने हे यश संपादन केले असून, तिची या पदावर नियुक्ती झाली आहे. वर्षा ही बार्शी येथील सुलाखे हायस्कूलची माजी विद्यार्थिनी असून प्राथमिक शिक्षिका वंदना शरद कुलकर्णी यांची कन्या आहे. तिने मंत्रालयातील कक्ष अधिकारी पद मिळवल्याने तिचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.





# केतूरच्या नेताजी सुभाष विद्यालयात स्नेहमेळावा

## ४८ वर्षांनंतर जमले माजी विद्यार्थी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २५ जुलै-**

केतूरच्या नेताजी सुभाष विद्यालयात तब्बल ४८ वर्षांनी पुन्हा दहावीचा वर्ग भरला.तोच वर्ग तेच विद्यार्थी आणि विशेष म्हणजे तेच वर्ग शिक्षक पुन्हा एकत्र दिसले.

उजनी पुनर्वसनाच्या काळात पोमलवाडी येथे नेताजी सुभाष विद्यालयात शिक्षण घेतलेले विद्यार्थी व इयत्ता दहावीचा निकाल सुभाष विद्यालय केतूर (ता.करमाळा) येथून घेतलेले १९७७ चे स्नेहसंमेलन अर्थात गेट-टुगेदरच्या निमित्ताने एकत्रित आले होते. त्यावेळी त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. या वर्गाची सुरुवात सकाळी शाळेचा घंटा वाजून झाली त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी एकत्रित शाळेची प्रार्थना केली. त्यानंतर सरस्वती पूजन आलेल्या गुरुजनांचा सत्कार दीप प्रज्वलन, संस्थेचे संस्थापक बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. अध्यक्षस्थानी शाळेचे विद्यमान प्राचार्य काशिनाथ जाधव हे होते.

माजी विद्यार्थ्यांनी एकत्र करण्यासाठी हरिश्चंद्र जाधव, प्रतिभा कुलकर्णी, दशरथ माळशकारे यांनी पुढाकार घेतला. यावेळी या माजी विद्यार्थ्यांनी शाळेसाठी ६५ हजार रुपयांची मदत म्हणून चेक स्वरूपात भेट दिली.यावेळी प्रतिभा कुलकर्णी /जोशी, मंदा लंके, चंद्रकला जोशी, साधना देशपांडे, सुलोचना जगताप, कांता फाळके, रतन कुकुले, या विद्यार्थिनीसह सुरेश सादगिले, रामचंद्र देवकते,सलीम सय्यद, दत्तात्रय गायकवाड, विठ्ठल मोरे, भागवत शेलार, तानाजी झोळ, मारुती उगले यांचेसह बहुसंख्य माजी विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना बहुसंख्य विद्यार्थी जुन्या आठवणींनी भावनाविवश झाले होते. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक बदडे, पिंगळे यांनी मनोगत व्यक्त केले,कार्यक्रमाचे प्रास्ताविक किशोर जाधवर केले यांनी केले तर सूत्रसंचालन राम काळे यांनी केले.



# रिपब्लिकन पक्षातर्फे प्रांताधिकारी डॉ. विजया पांगारकर यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २५ जुलै-**

उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी डॉ. विजया पांगारकर यांनी म ाळशिरस विभागात प्रांताधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून प्रशासनाच्या विविध कामांमध्ये उत्कृष्ट कार्य केले आहे. संत ज्ञानेश्वर संत तुकाराम महाराज पालखी सोहळा, निवडणूक प्रक्रिया,मुख्यमंत्री १०० दिवस कृती आराखडा, विविध विभागीय योजना यशस्वीरित्या राबवून त्यांनी प्रभावी नेतृत्व दिले आहे. पुणे विभागामध्ये तृतीय क्रमांक तर सोलापूर जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक मिळवला. त्यांच्या उत्कृष्ट व प्रेरणादायी कार्यगिरीचा गौरव म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) माळशिरस तालुक्याच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी एन.के. साळवे, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष, दयानंद धाईंज पश्चिम महाराष्ट्र सचिव, किरण धाईंज, युवक महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष, मिलिंद सरतापे तालुकाध्यक्ष, रमेश धाईंजे जिल्हा सचिव, दशरथ नवगिरे युवक तालुकाध्यक्ष, सुनील ओवाळ तालुका उपाध्यक्ष, प्रवीण साळवे युवक तालुका सरचिटणीस, संतोष बनसोडे उपस्थित होते.

## केतुर प्राथमिक शाळेचे विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या गुणवत्ता यादीत

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२५ जुलै-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केतुर नंबर एक या शाळेतील तीन विद्यार्थी पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत चमकले. प्रेरणा कोकणे गुण २४८, तनुजा गुलमर गुण २३८, श्रीराज खोमणे गुण २२८ हे विद्यार्थी गुणवत्ता यादीत आलेले आहेत.







तसेच प्रेरणा कोकणे या विद्यार्थिनीची नवोदय विद्यालय पोखरापूर येथे निवड झाली आहे. प्रेरणा ही केतुर नंबर एक या गावातील नवोदयसाठी निवड झालेली पहिलीच विद्यार्थिनी आहे. गावातील या विद्यार्थ्यांनी मि ळवलेल्या यशाबद्दल ग्रामस्थांतून कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक संदीप केशव गोडगे, मुख्याध्यापक विलास भोसले शिक्षक साळुंखे, म्हेत्रे, रोडे, देवकते, मोहिते व इंगोले यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती केतुर नंबर एक, करमाळा तालुका गटशिक्षणाधिकारी जयवंत नलवडे, विस्तार अधिकारी नितीन कदम, केतुर केंद्राचे केंद्रप्रमुख विकास काळे यांनी अभिनंदन केले.


## चौकशीची जाहीर नोटीस

**अर्ज क्रमांक :** योजना अर्ज क्रमांक ६१८/२०२५, कलम-५०-ए(१)
**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेचे नाव :** श्री. भगवंत देवस्थान ट्रस्ट बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर
**सार्वजनिक व्यवस्थेचा नोंदणी क्रमांक :** ए-१०९ (सोलापूर)
**अर्जदार** १. **श्री. दिलीप चंद्रकांत बुडुख**
रा. सुभाष नगर, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
२. **श्री. विजयकिशोर मोतीलाल सोमाणी,**
रा. सुभाष नगर, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. धर्मादाय उप आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर हे वर नमूद केलेल्या अर्जात **श्री. भगवंत देवस्थान ट्रस्ट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर,** नोंदणी क्रमांक ए-१०९ (सोलापूर) या देवस्थानसाठी नविन योजना करण्यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ५०-अ(१) अन्वये अर्जाची चौकशी करणार आहेत.

सदरच्या चौकशी प्रकरणांमध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा द्यावयाचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून ३० दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी अथवा समक्ष येऊन कैफियत / हरकत दाखल करावी. त्यानंतर आलेल्या कैफीयतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत हरकत / कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही, असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त, सोलापूर विभाग, सोलापूर यांचे शिक्कयानिशी आज दि. १८/०७/२०२५ रोजी दिली.

शिक्का

**सही/-**
**(वि. सि. कांबळे)**
**अधिक्षक (न्याय),**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**सोलापूर विभाग, सोलापूर.**

## जाहीर प्रसिध्दीकरण

अर्ज - वारस प्रमाणपत्र मिळणेचा
दि.कि. अर्ज नं. ७२/२०२५ नि. ५

### बार्शी येथील मे. सि.ज. ज्यु.डि. सो. यांचे कोर्टात
### मे. एच.यु.यु. पाटील कोर्ट

१) **चंद्रकांत भगवान बुरगुटे**
वग - ५५ वर्षे, धंदा - शेती
रा. उपळे (दु), ता. बार्शी, जि. सोलापूर,
२) **रामहरी भगवान बुरगुटे**
वय - ६१ वर्षे, धंदा - शेती, रा. सदर
३) **संगीता सुरेश बुरगुटे**
वय - १५ वर्षे, धंदा - शेती, रा. सदर
४) **श्रीनाथ सुरेश बुरगुटे**
वय - २४, वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सदर
५) **सुवर्णा मंगेश गलांडे**
वय - वर्षे, धंदा - शेती,
रा. मु.पो. जवळगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर
६) **स्मिता सुहास घाडगे**
वय - २७ वर्षे, धंदा - शेती
रा. मु.पो. खैराव, ता. माढा, जि. सोलापूर
— **अर्जदार**
विरुध्द
**कोणी नाही** - **सा.वाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार नं. १ व २ हे एकमेकांचे सख्खे भाऊ आहेत, तर अर्जदार ३ हि अर्जदार नं. १ व २ यांचे मयत भाऊ सुरेश यांची पत्नी आहे. तर अर्जदार नं ४ हा अर्जदार नं. १ व २ यांचा पुतण्या तर अर्जदार नं. ३ चा मुलगा आहे. अर्जदार नं. ५ व ६ ह्या अर्जदार नं. १ व २ यांच्या पुतणी तर अर्जदार नं. ३ यांच्या मुली व अर्जदार नं. ४ यांच्या बहिणी आहेत. कै. भगवान निवृत्ती बुरगुटे हे दि. २१/०१/२०१९ रोजी उपळे (दु.) येथे मयत झाले आहेत. अर्जदार यांचे शिवाय मयतास अन्य कोणीही कायदेशीर वारस नव्हते व नाहीत. मयत कै. भगवान निवृत्ती बुरगुटे यांचे वारस प्रमाणपत्र महसूल व शासकीय अधिकारी यांनी आणायला सांगितल्याने वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्जदार यांनी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळवण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, वा अन्य कोणाचे काही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस वा कुणाचे हक्कात काही दस्त असलेस संबंधितानी हि नोटीस प्रसिद्ध झाले पासून ३० दिवसांचे आत वा पुढील नेमलेले तारखेस २५/०८/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः व वकीलामार्फत हजर होऊन आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रार, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे योग्य ते आदेश होतील. आज दि. २४/०७/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपिक**
**दिवाणी न्यायालय**
**क. स्तर बार्शी**

शिक्का

**सही/-**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क. स्तर बार्शी**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज नं. २७/२०२५
पुढील नेमलेली दि. १६/०९/२०२५
निशाणा न. ५

### बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज सि.डि. सो. यांचे कोर्टात
### मा. आर.एम. कंटे, सह. दि. न्यायाधिश व स्तर, बार्शी

**श्री. देविदास शिवाजी कोकाटे,**
वय - ४६ वर्ष, धंदा - मजूरी,
रा. ज्ञानेश्वर मठ, अलीपुर रोड, बार्शी,
ता. बाशी, जि. सोलापूर
— **अर्जदार**
विरुध्द
**कोणीही नाही** - **सा.वाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांचे वडिल शिवाजी रामचंद्र कोकाटे हे दि. १४/०५/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार यांचा भाऊ भैरवनाथ शिवाजी कोकाटे हा दि. २४/०९/२०१९ रोजी मयत झालेला आहे. तसेच मयत भैरवनाथ यांची पत्नी मनिषा भैरवनाथ कोकाटे, मुलगी प्रतिक्षा भैरवनाथ कोकाटे, मुलगा प्रशांत भैरवनाथ कोकाटे हे दि. २४/०९/२०१९ रोजी मौजे बार्शी, येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार यांची आई कुसुम शिवाजी कोकाटे हे देखील दि. २०/१२/१९८६ रोजी, मांगडे चाळ, बार्शी, ता. बार्शी, येथे मयत झालेले आहेत. यातील मयत शिवाजी रामचंद्र कोकाटे व भैरवनाथ शिवाजी कोकाटे यांना अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारस असून त्यांच्याशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. यातील अर्जदार यांना अर्ज कलम १ मधील मिळकतीच्या हक्कपत्रकी वारस नोंद होणेकामी यातील अर्जदार यांनी महसूल अधिकारी यांचेकडे दि. २०/०५/२०२५ रोजी मयत व्यक्तीचे नावे कमी करून, मिळण्याबाबत विनंती केली असता संबंधीत महसूल अधिकारी यांनी वारस प्रमाणपत्र घेऊन येण्याबाबत कळविलेले आहे म्हणून यातील अर्जदार यास अर्ज कलम १ मधील मिळकतीचे हक्कपत्रकी असलेली मयताची नावे कमी करुन मिळण्यासाठी तसेच शासनामार्फत भविष्यात मिळणाऱ्या सर्व सेवासुविधांचा लाभ मिळावा म्हणून यातील अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांचे व्यतिरीक्त मयत शिवाजी रामचंद्र कोकाटे व भैरवनाथ शिवाजी कोकाटे यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत किंवा नेमली ता. १६/०९/२०२५ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी. मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल. हे जाहिर प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सहि शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे दि. २४/०७/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर, बार्शी**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर, बार्शी**

## सावधानतेची जाहीर नोटीस

डि. सोलापूर सब डि व ता. माढा पैकी मौजे उपळाई खुर्द येथील परिसरातील तमाम सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे आमचे अशिल भागवत दादा कांबळे, रा. उपळाई खुर्द, ता. माढा, जि. सोलापूर यांनी सांगितलेल्या व दिलेल्या लेखी व तोंडी माहितीवरून या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना सुचित करण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व तालुका माढा पैकी मौजे - उपळाई खुर्द येथील शेतजमीनी गट नं. १००/२ क्षेत्र ०१ हे. २० आर. आकार ०१ रू. २० पै. व गट नं. १००/३ क्षेत्र ०३ हे. ८२ आर, आकार ०२ रू. २५ पै. या जमिनी आमचे अशिल भागवत दादा कांबळे, लक्ष्मण दादा कांबळे व मयत अनुसया राजाराम क्षिरसागर यांच्या सामाईक अविभक्त प्रत्येकी १/३ हिस्से असलेल्या होत्या व आहेत. सदर जमिनीचे कायदेशीरपणे सरस-निरस मानाने वाटप झालेले नव्हते व नाही असे असताना यातील मयत अनुसया राजाराम क्षिरसागर याचे वारस विनायक राजाराम क्षिरसागर, गणेश राजाराम क्षिरसागर, संगीता भरत मोरे, योगिता जॉर्ज उरणकर, पुजा आनंद क्षिरसागर, राधिका आनंद क्षिरसागर, दिक्षा आनंद क्षिरसार, अथर्व आनंद क्षिरसागर हे कायदेशीर अधिकार नसताना हस्तांतरीत, लिज, लिन, दान, गहाण, बक्षिस, विक्री करणेचे प्रयत्नात आहेत. सदर नमूद व्यक्तिकडून यामधील उपरोक्त गट नं. १००/२, १००/३ या जमिनीचे आमचे अशिलाचे परवानगी शिवाय कोणीही कोणतेही व्यवहार करू नयेत. अन्यथा असे व्यवहार आमचे अशिल व त्यांचे जमिनीतील अविभक्त हिस्सेवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी व तसेच सदर व्यक्ती बेकायदेशीर व्यवहार करणाऱ्या व्यक्ती ह्या कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहतील. तसेच त्याचे खर्चासह होणाऱ्या परिणामास जबाबदार राहतील कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता. २४/०७/२०२५

**अशिल**
**भागवत दादाराव कांबळे**
**रा. उपळाई खुर्द ता. माढा**
**जि. सोलापूर**

**अशिलतर्फे**
**सही/-**
**श्री. प्रकाश सु. वाघमारे**
**ॲडव्होकेट, मोहोळ**
**श्री. व्हि.सी. लुंडे ॲडव्होकेट, बार्शी**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः रातंजन, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :** डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे रातंजन हद्दीतील शेतजमीन याचा गट नं. २२८ व गट नं. २६३ मधिल समाईक न विभागलेली १/४ हिस्सा यात पडीक डबर (विहिर) त्या डबरातील व पाण्यातील १/४ (४ था) हिस्सा या हिस्साची खरेदी ही दि. ०४/०६/१९९१ रोजी केलेली आहे. सदरची खरेदी आमचे अशिल यांनी विनोद लक्ष्मण देशमुख यांचेकडून केलेली आहे. सदरचा खरेदी दस्त हा वैराग दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये खरेदी दस्त क्र. ८३२/१९९१ अन्वये नोंदला गेलेला आहे. गट नं. २२८ क्षेत्र २ हे. २७ आर, आकार ४ रु.१९ पैसेया क्षेत्रावर ७/१२ सदरी आमच्या आशिलाच्या नावाची नोंद खरेदीखताप्रमाणे झालेली आहे. पुर्वी सदरची जमीन गट नं. २६३ मधिल विहिर व पाण्यातील हिस्सा हा दत्तू आबा राऊत यांचा होता त्यांनी त्यांचा १/४ हिस्सा हा खरेदी दस्त क्र. ९७४/१९८२ दिनांक १४/१२/१९८२ अन्वये विनोद लक्ष्मण देशमुख यांना कायम खरेदी दिलेला आहे त्यामुळे त्यांचे नाव ७/१२ उताऱ्यावरुन कमी होणे गरजेचे असताना अनावधानाने तसेच राहून गेलेले आहे. त्यामुळे आमच्या अशिलाच्या नावाच्या नोंद गट नं. २६३ च्या हक्कपत्रकी झालेली नाही. आमच्या अशिलाची नावाची नोंद खरेदीखताप्रमाणे होणे हे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे.

तरी वरील गट नं. २६३ मधिल विहिर व पाण्यातील हिश्याची नोंद करणेकामी आमचे अशिल हे ग्राममहसूल अधिकारी यांच्याकडे रितसर कार्यवाही करीत आहेत. तरी सदर नोंदीस कोणाची हरकत असल्यास त्यांनी तात्काळ खालील पत्यावर संपर्क साधून लेखी हरकत नोंदवावी. ही जाहीर नोटीस दिली असे. ता. २५/०७/२०२५

**सही/-**
**ॲड. रोहित राजेंद्र घोडके**
**बी.एससी., एलएल.बी.**
**वैराग नगरपंचायतजवळ,**
**वैराग ता. बार्शी, जि. सोलापूर**
**मो. ९८८१८४१५९५**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## सद्गुरु ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर

### स्थावर मालमत्तेचा तिसरा फेर जाहीर लिलाव

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७ मधील तरतुदीनुसार सद्गुरु ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., मोहोळ ता. मोहोळ, जि. सोलापूर या पतसंस्थेच्या ज्या थाकबाकीदार कर्जदार व जमीनदार यांचेविरुद्ध कलम १०१ अनुसार वसुली दाखले प्राप्त झालेले होते अशा कर्जदार / जमीनदारांच्या जप्त केलेल्या खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेचा तिसरा फेर जाहीर लिलाव संस्थेच्या कार्यालयात शुक्रवार, दिनांक ०१/०८/२०२५ रोजी दुपारी १ वाजता ठेवण्यात आलेला आहे. तरी इच्छुक व्यक्ती व संस्था यांनी सदर लिलावात भाग घ्यावा.

| अ. नं. | कर्जदार / जामीनदार यांचे नाव व पत्ता | जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन गाव, गट नं. व क्षेत्र (हे.आर.) | कर्जदाराकडील येणे बाकी (मुद्दल, व्याज व इतर) | राखीव किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. अनिल जनार्दन गोरे रा. औंढी - कर्जदार | औंढी, ता. मोहोळ येथील गट नं. २०५/१ क्षेत्र १.९२ हे. आर | ७,१६,४२९/- | २९,८०,०००/- |
| २ | श्रीमती मनीषा रामचंद्र कोकाटे, रा. तांबोळे - कर्जदार | तांबोळे येथील गट नं. ७७ क्षेत्र ०.७९ हे. आर. | १३,०२,७२५/- | ६,००,०००/- |

**टीप :-** लिलावाच्या अटी व शर्ती संस्थेच्या कार्यालयात पहावयास मिळतील.

**ठिकाण - मोहोळ**
**दिनांक : २५/०७/२०२५**

**सही/-**
**(नितीन रोहिदास जाधव)**
**विशेष वसूली व विक्री अधिकारी**
**सद्गुरु ग्रामीण बिगरशेती**
**सहकारी पतसंस्था म. मोहोळ**

## सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर-अकलूज

**पो. यशवंतनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर - ४१३११८**
**फोन नं. ०२१८५-२२२०४८, २२२२४८ फॅक्स नं. (०२१८५)२२२२४९, Email :- smsmpssk@gmail.com**

### कंत्राटी कामाची टेंडर नोटीस

कारखाना हंगाम २०२५-२६ करीता खालील कामे कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने देणेची आहेत. त्याकरीता इच्छुक कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून सिलबंद टेंडर गुरुवार, दि. १४/०८/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत मागविण्यात येत आहेत.

| अ. नं. | कामाचे स्वरुप | विभागाचे नांव |
|---|---|---|
| १) | बॉयलरला बगॅस पुरविणे, बगॅस वाहतूक इत्यादी कामे करणे. | इंजिनिअरींग |
| २) | साखर पोत्यावर छपाई व नंबरींगचे काम करणे. | मॅन्युफॅक्चरींग |
| ३) | स्विपींग व इतर शुगर रिप्रोसेसिंग व मेल्टींगचे काम करणे. | मॅन्युफॅक्चरींग |
| ४) | हॉपर, ग्रेडर, शुगर हाऊस साफसफाई करणे व प्रोसेस कामासाठी मजूर पुरविणे. | मॅन्युफॅक्चरींग |
| ५) | गोडावूनमधून चुना व गंधक प्रोसेससाठी आणणे तसेच चुन्याची निवळी तयार करणे. | मॅन्युफॅक्चरींग |
| ६) | प्रेसमड भरणी-उतरणी व वाहतुकीचे काम करणे. | वाहन |
| ७) | ई.एस.पी. व को-जन बॉयलरकडील राख विक्री करणे. | सिव्हील |
| ८) | गव्हाण चालविणेचे काम करणे. | शेती |
| ९) | सेंद्रीय व जिवाणू खत तयार करणेचे काम करणे. | शेती |
| १०) | बैलगाडी रबरी टायर दुरूस्ती कामी वाहन भाडोत्री लावणे (२४ तासाकरीता) | शेती |
| ११) | कारखाना रबरी टायर गाड्यांचे पंक्चर काढणेचे काम करणे. | शेती |
| १२) | कामगारांचे सायकल / मोटार सायकल स्टॅन्ड सुरक्षिततेसाठी चालविणेचे काम करणे. | सुरक्षा |
| १३) | स्टोअर माल भरणी-उतरणी व इतर कामे करणे. | स्टोअर |
| १४) | शुगर हाऊसमधील साखर अंतर्गत वाहतूक करणेचे काम करणे. | गोडावून |
| १५) | शुगर हाऊस साखर भरणी व इतर हमाली अनुषंगीक कामे करणे. | गोडावून |
| १६) | साखर पोती गोडावूनमध्ये वाहतूक करुन थप्पी मारणे तसेच साखर डिलीव्हरी देणे इ. अनुषंगीक हमाली कामे करणे. | गोडावून |

१) सदर कामाकरीता पॅन, जीएसटी नंबर व इतर कायदेशीर बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे.
२) कामासंबंधीच्या नियम-अटी, टेंडर, फॉर्म फी, बयाणा रक्कम व सिक्युरिटी डिपॉझीट इ. बाबतची माहिती कारखान्याचे संबंधीत विभागाकडून घ्यावी.
३) मुदतीनंतर आलेले टेंडर स्विकारले जाणार नाहीत.
४) टेंडर मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार कारखान्याने राखून ठेवला आहे.

तरी इच्छुक कॉन्ट्रॅक्टर यांनी कामाचा तपशील नमूद करुन सिलबंद टेंडर्स कारखाना मुख्य कार्यालयाकडे दिलेल्या मुदतीत सादर करावित.

**राजेंद्र केरबा चौगुले** — कार्यकारी संचालक | **शंकरराव रामचंद्र (आबासाहेब) माने-देशमुख** — व्हाईस चेअरमन | **जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील** — चेअरमन

# जनता बँकेतर्फे यंदा सभासदांच्या खात्यात ९ टक्के लाभांश जमा

## बँकेची ६० वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै-**

हिरकमहोत्सवी वार्षिक सर्वसाधारण सभेत ९ टक्के लाभांश देण्याचा ठराव मंजूर झाल्यानंतर सभा सुरू असतानाच सोलापूर जनता सहकारी बँकेच्या सभासदांना लाभांश वितरित करण्यात आला. सभा सुरू असतानाच त्वरित सभासदांना लाभांश जमा झाल्याचा एसएमएस आल्याने उपस्थित सभासदांनी टाळ्यांच्या कडकडाटात बँकेचे अध्यक्ष, संचालक मंडळाचे आणि प्रशासनाचे अभिनंदन केले. यंदाच्यावर्षी बँकेकडून सभासदांना ९ टक्के लाभांश देण्यात येणार असल्याची घोषणाही याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांनी केली. बँकेची ६० वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवारी हुतात्मा स्मृती मंदिरात खेळीमेळीच्या वातावरणात झाली. सभेत कारगिल विजय दिनानिमित्त माजी सैनिक दिवाकर रेळेकर यांचा बँकेतर्फे सन्मान करण्यात आला.



यावेळी व्यासपीठावर सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे, उपाध्यक्ष ॲड. मिलिंद कुलकर्णी, संचालक प्राचार्य गजानन धरणे, मुकुंद कुलकर्णी, वरदराज बंग, विनोद कुचेरिया, संचालिका चंद्रिका चौहान, संचालक रवींद्र साळे, सी.ए. गिरीश बोरगावकर, पुरुषोत्तम उडता, नूतन संचालक ॲड.अमोल कळके, गौरी आमडेकर, डॉ. हर्षल डंबळ, मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे, सरव्यवस्थापक प्रदीप बुट्टे, उपसरव्यवस्थापक अंजली कुलकर्णी, देवदत्त पटवर्धन, मकरंद जोशी, सहाय्यक सरव्यवस्थापक रामदास सिद्दुल, रमेश मामड्याल, तुळशीदास गज्जम उपस्थित होते. प्रारंभी लक्ष्मीपूजन आणि दीपप्रज्वलन झाले. यानंतर विषयपत्रिकेचे वाचन मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे यांनी केले. याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे, उपाध्यक्ष ॲड. मिलिंद कुलकर्णी आणि संचालक मंडळाने सभासदांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली. बँकेच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर सभासदांसाठी आणि सोलापूरकरांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. यात बँकेचे सभासद, ठेवीदार आणि हितचिंतकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पेंडसे यांनी याप्रसंगी केले. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे यांनी प्रास्ताविक केले. पूनम बोडा यांनी सूत्रसंचालन तर बँकेचे उपाध्यक्ष ॲड. मिलिंद कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले.

### बँकेची घोडदौड राहील अखंड

सोलापूर जनता सहकारी बँकेने यंदाच्या वर्षी ६० वर्षे पूर्ण केली आहेत. मागील आर्थिक वर्षात बँकेला मोठ्या प्रमाणावर नफा मिळाला आहे. सोलापूर जनता सहकारी बँकेची ही घोडदौड चालू आर्थिक वर्षातदेखील अशीच अखंड राहणार आहे.

**- सुनील पेंडसे, अध्यक्ष,**
**सोलापूर जनता सहकारी बँक**

## महत्वाचे...



### निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात 'वॉटर बेल उपक्रम'

**सोलापर, दि. २५ जुलै-**

इंदिरा ज्ञानवर्धिनी संचलित श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात शासन निर्देशानुसार 'वॉटर बेल उपक्रम' राबवण्यात येत आहे. दररोज किमान तीन वेळा वॉटर बेल वाजवली जाते. यामागील उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांना शाळेतील दीर्घ कालावधीत पुरेसे पाणी प्यायची सवय लावणे व डिहायड्रेशनसारख्या समस्या टाळणे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना पाणी पिण्याचे महत्त्व, तसेच त्याचा शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. शाळेत या उपक्रमासाठी विशेष वेळापत्रक आखण्यात आले आहे. उपक्रमाचे यशस्वी आयोजन प्राचार्य डी. डी. गाजरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. संस्थापक अध्यक्षा निर्मलाताई ठोकळ, अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे व संचालिका शिल्पाताई ठोकळ यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.



### सिध्दनाथ कारखाना यंदा सात लाख टन ऊस गाळप करणार : दिलीप माने

**सोलापूर, दि.२५ जुलै -**

तिऱ्हे (ता. उत्तर सोलापूर) येथील सिध्दनाथ साखर कारखान्याचे यंदाच्या १५ व्या गळीत हंगामासाठी रोलर पूजन कारखान्याचे अध्यक्ष तथा श्री सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीप माने यांच्या हस्ते करण्यात आले. या हंगामात साधारणतः सात लाख टन ऊसाच्या गाळपाचे उदिष्ट असून त्यासाठी आवश्यक यंत्रणा तयार असल्याचे माने यांनी सांगीतले. सिध्दनाथ साखर कारखान्याचा १५ वा गळीत हंगाम असून या वर्षात ७ लाख ऊस गाळप करण्याचे उदिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी लागणारी सर्व यंत्रणा उस तोडणी यंत्र,तोडणी कामगार टोळी, वाहने, बैलगाडी तयार असल्याचे माने यांनी यावेळी सांगीतले. यावेळी कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय भोसले, उपाध्यक्ष डॉ.पृथ्वीराज माने, प्रोजेक्ट मॅनेजर विनोद पाटील, मुख्य शेतकी अधिकारी बाळासो काळे, चिफ केमिस्ट धुळा शेबंडे, चिफ इंजिनिअर धनंजय पाटील, इलेट्रिक इंजिनिअर राजेंद्र घोरपडे, सुहास भोसले, पितांबर भोसले आदीसह कारखान्यातील सर्व विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# इंडस्ट्री एक्सलन्स पुरस्कार डॉ. कुलकर्णी यांना प्रदान




**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.२५ जुलै-**

श्रीपूर (ता.माळशिरस) येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी यांना शुगर टेक्नॉलॉजीस्ट असोसिएशन ऑफ इंडिया नवी दिल्ली यांचा देशपातळीवरील इंडस्ट्री एक्सलन्स पुरस्कार माजी सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील व माजी गृहमंत्री जयंतराव पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. वसंतदादा शुगर इन्स्टीट्युटचे महासंचालक संभाजी कडू-पाटील, द शुगर टेक्नॉलॉजीस्ट असोसिएशनचे अध्यक्ष संजय अवस्थी यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. कुलकर्णी सुमारे १२ वर्षापूर्वी कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत आहेत. या कार्यकाळात साखर उद्योगात काम करताना कर्मयोगी साखर कारखान्यास आपल्या व्यवस्थापन कौशल्याच्या जोरावर सुपंत बायो फर्टीलायझर, रेन वॉटर हार्वेस्टिंग, वृक्ष लागवड, प्रदुषण नियंत्रण, आसवनी व को-जनरेशन प्रकल्प, सौर उर्जा प्रकल्प याच्या माध्यमातून कारखान्यास अत्युच्य शिखरावर नेले आहे. याचबरोबर एकूणच साखर उद्योगाचा अभ्यास करत या क्षेत्राचे बळकटी करणासाठी नव नवीन संकल्पना राबविणे, आधुनिकी करण याविषयी अनेक सेमिनार घेतले. त्यांच्या या कामगिरीची दखल घेऊन शुगर टेक्नॉलॉजी असोसिएशन ऑफ इंडिया या देशपातळीवर अग्रगण्य संस्थेकडून देशपातळीवरील मनाचा समजला जाणारा इंडस्ट्री एक्सलन्स पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक, व्हा.चेअरमन कैलास खुळे, सर्व संचालक मंडळ, सर्व अधिकारी व कामगार यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील कार्याच्या शुभेच्छा दिल्या.

### दुग्ध शर्करा योग

डॉ. यशवंत कुलकर्णी यांना दिल्लीमध्ये इंडस्ट्री पुरस्कार मिळत असतानाच राज्याच्या डेक्कन शुगर टेक्नॉलिस्ट अशोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेच्या कॉन्सिल मेंबर्स म्हणून बिनविरोध निवड झाली हा एक दुग्ध शर्करा योगच आहे. राज्याचे साखर आयुक्त यांच्या विविध अभ्यास गटावर डॉ. कुलकर्णी यांनी तज्ञ म्हणूनही काम केलेले आहे.



# दिलीप माने यांच्या दीर्घायुष्यासाठी अकरा मंदिरात महिलांनी केली प्रार्थना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर ,दि. २५ जुलै -**

श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीपराव माने यांच्या दीर्घायुष्यासाठी जिल्ह्यातील अकरा मंदिरामध्ये उत्तर सोलापूर तालुक्यातील भागाईवाडीच्या ५५ महिलांनी साकडे घातले आहे अशी माहिती सरपंच परिषदेच्या अध्यक्ष कविता घोडके पाटील यांनी दिली.

जिल्ह्यातील शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिक, युवावर्ग व महिलांच्या प्रगतीसाठी, प्रश्नासाठी, सभापती माने हे सदैव कार्यरत असतात. माने यांच्या कार्याला अधिक बळ शंभू महादेवांनी द्यावे, असे साकडे देवाचरणी घातल्याचेही महिलांनी सांगितले. यावेळी विजयश्री घोडके, सिमिंता चौधरी, पद्मीनी घोडके, अर्चना चौधरी, वंदना घोडके, राजश्री घोडके, चित्रा जाधव, प्रज्ञा घोडके,अलका हावळे, रुपाली घोडके,रुक्मीणी पाटील,अनिता घोडके, शिला घोडके,भाग्यश्री हावळे, इंदूमती घोडके, पद्मीनी घोडके, वेणूबाई हावळे, प्रिती घोडके,माधुरी घोडके, मंगल हावळे, लता घोडके, राणी घोडके, विजया घोडके, रेखा हावळे, अश्विनी घोडके, पुजा घोडके, जयसिंह चौधरी, विजय घोडके उपस्थित होते.

माने यांच्या वाढदिवस व श्रावणमासनिमित्त भागाईवाडी येथील ५५ महिलांना धामणगाव, बार्शीतील भगवंत मंदिर, येरमाळा येथील येडेश्वरी देवी मंदिर, रामलिंग, तुळजाभवानी, सिध्देश्वर मंदीर, बाळेमधील खंडोबा मंदिर, मार्डी येथील यमाई मंदिर व रानमसले येथील ब्रह्मदेव या मंदीरास खास बसद्वारे ५५ महिलांना देवदर्शन घडविण्यात आले आहे. यापूर्वी माजी आमदार माने यांनी तिरुपती-बालाजी, अष्टविनायक येथे अनेकदा कार्यकर्त्यांना अनेकदा देवदर्शनाची संधी उपलब्ध करून दिली होती.

गतवर्षी १५ लक्झरी बसेसद्वारे ७५४ महिलांना अष्टविनायक दर्शन घडवून आणले होते. त्याप्रमाणे आम्हीही भागाईवाडी येथील महिलांना देवदर्शन घडवून आणण्याचा प्रयत्न केला असल्याचे घोडके-पाटील यांनी सांगितले.

बाजार समिती, जिल्हा बँक, दुध संघ, ब्रह्मदेवदादा माने बँक, साखर कारखाना या माध्यमातुन शेतकऱ्यांना आर्थीक बळ, देण्याबरोबर त्यांच्या करिता उजनीच्या पाण्यासाठी, विजेसाठी, शेतीमालाला योग्य दर मिळवून देण्यासाठी, माने हे सदैव कार्यरत असतात. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती असे नाम करण ही माने यांनी केले आहे.




### निर्मिती विहारमधून ४० हजारांचा लॅपटॉप चोरीस

**सोलापूर, दि. २५ जुलै -**

शहरातील विजापूर रोडवरील निर्मिती विहारमधील घरातून चोरट्याने ४० हजार रुपये किंमतीचा लॅपटॉप चोरून नेला. याबाबत तेजस विजय जाधव (वय २८, रा. ७९, निर्मिती विहार, विजापूर रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २३ जुलै रोजी रात्रीच्यावेळी चोरट्याने तेजस जाधव यांच्या घरातून बेडरूमच्या उघड्या खिडकीमधून येऊन ४० हजार रुपये किंमतीचा लॅपटॉप चोरून नेला. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार शिर्के पुढील तपास करीत आहेत.

# काँग्रेसच्या शहर कार्याध्यक्षपदी सुशील बंदपट्टे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै-**

सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या शहर कार्याध्यक्ष पदी युवा नेते सुशील बंदपट्टे यांची निवड करण्यात आली आहे.

काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार माजी केंद्रिय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या शिफारसीनुसार, तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या कार्याध्यक्ष खासदार प्रणिती शिंदे यांच्या सूचनेनुसार सुशील बंदपट्टे यांची सोलापूर शहर कार्याध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. निवडीचे पत्र माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते देण्यात आले, काँग्रेसमध्ये एकनिष्ठ राहून कोणत्याही पदाची अपेक्षा न करता माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे व खासदार प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबवत लोकांच्या अडीअडचणी सोडवण्याचा प्रयत्न केला आहे. यापुढेही काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून पक्ष वाढीसाठी प्रयत्न करणार असून, जनतेचे काम करणार असल्याचे बंदपट्टे यांनी सांगितले. यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, दत्ता सुरवसे, सुनील रसाळे, गणेश डोंगरे, राजाभाऊ कलकेरी, दीपक जाधव, महेश अलकुंटे, दत्तात्रय अलकुंटे, संतोष इरकल, पाथरूट, श्याम मुद्दे, अशोक यमपूरे, भीमाशंकर बंदपट्टे, श्रीनिवास यमपूरे, जयवंत यमपूरे, राहुल भरले, अतिश अलकुंटे कुणाल भांडेकर, नरेंद्र अलकुंटे व चंद्रनील मित्र परिवारातील सदस्य उपस्थित होते.



# संगीतमय महाशिवपुराण कथेनिमित्त शोभायात्रा भक्तीभावात

## उत्तमजी महाराज यांचे मार्गदर्शन : श्रावण मासानिमित्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जुलै-**

मारवाडी युवा मंच मिडटाउन महिला शाखा आणि राजश्री लड्डा परिवारातर्फे श्रावण मासानिमित्त आयोजित संगीतमय भव्य महाशिवपुराण कथेनिमित्त शुक्रवारी शोभायात्रा भक्तीभावात काढण्यात आली. शोभायात्रेनंतर उत्तमजी महाराज यांनी तुळजापूर वेस येथील माहेश्वरी सांस्कृतिक भवनात भाविकांना मार्गदर्शन केले.

संगीतमय भव्य महाशिवपुराण कथेनिमित्त प्रारंभी मीठ गल्ली येथील श्री बालाजी मंदिरात पूजा करण्यात आली. यानंतर शोभायात्रेस प्रारंभ झाला. सजवलेल्या बग्गीमध्ये उत्तमजी महाराज विराजमान होते. तर मंगल कलश घेतलेल्या शेकडो महिला शोभायात्रेत सहभागी झाल्या होत्या. ढोल ताशांच्या गजरात ही शोभायात्रा निघाली. तेथून ही शोभायात्रा बलिदान चौक, तुळजापूर वेसमार्गे भवानी पेठेतील माहेश्वरी सांस्कृतिक भवनात विसर्जित झाली. याप्रसंगी अध्यक्षा राणी होलाणी, कार्यक्रम प्रमुख ज्योती चंडक, सुनिता बजाज, नंदा लाहोटी, शोभा मालू, विजया भैय्या, राजश्री लड्डा, रामेश्वर करवा, गोविंद लाहोटी, गोविंद चंडक, श्रीकांत बजाज, विलास बजाज, श्रीकांत लड्डा, लक्ष्मीकांत लड्डा तसेच मारवाडी युवा मंचचे सदस्य सहभागी झाले होते.





### ३१ जुलैपर्यंत भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

मारवाडी युवा मंच मिडटाउन महिला शाखा आणि राजश्री लड्डा परिवारातर्फे श्रावण मासानिमित्त आयोजित संगीतमय भव्य महाशिवपुराण कथा दररोज दुपारी २ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत माहेश्वरी सांस्कृतिक भवनात होणार असून भाविकांनी याप्रसंगी उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

श्री सिध्देश्वर देवस्थान ट्रस्ट संचलित

**श्री सिध्देश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक, सोलापूर**

रुपाभवानी मंदिर रोड, भवानी पेठ, सोलापूर

**Programmes Accredited by NBA, New Delhi.**

**डिप्लोमा प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका प्रवेश**

**Facilitation Center : 6458**

**Online Option Form Filling ची मोफत सोय**

**कन्नड भाषिक अल्पसंख्यांकासाठी ५१% जागा राखीव**

| Sr. No. | Courses | Choice Code |
|---|---|---|
| 1 | Civil Engineering (Women) | 645819150F |
| 2 | Computer Engineering (Women) | 645824550F |
| 3 | Information Technology (Women) | 645824650F |
| 4 | Electrical Engineering (Women) | 645829350F |
| 5 | Electronics & Tele. Engg (Women) | 645837250F |

**प्रथम वर्ष** - CAP Round I I I करीता ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची तारीख २६ जुलै ते २७ जुलै २०२५.

**थेट द्वितीय वर्ष** - CAP Round I I I करीता ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची तारीख २८ जुलै ते २९ जुलै २०२५.

**कार्यालय स. ०९ ते सा.०५ वाजेपर्यंत आणि रविवार व इतर सुट्टीच्या दिवशीही खुले राहील.**

- प्रवेशासाठी संपर्क -

**प्रा. श्रीशैल मळेवाडी ९९२२३६२०३५ प्रा. प्राजक्ता सप्तश्वा ९८२२२६१४८६**
**प्रा. सुचेता चौधरी ९८९०८६९८२६ प्रा. प्रविण गौडा ८४२१८६२६४५**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)